Chapter-3



प्रकरण तिसरे

## आधुनिक आत्मचरित्रांचा

## परिचय.

: १ : मी फक्त वाटाड्या.

आता या प्रकरणात काही आधुनिक आत्मचरित्रांचा परिचय करुन देतो. 'काही' असे म्हणायचे कारण हे की सर्व आत्मचरित्रांचा परिचय करुन देणे दुरापास्त आहे. शिवाय त्याची आवश्यकताही नाही. कारण शितावरुन भाताची परीक्षा होते. तद्वत या काही आत्मचरित्रांच्या परिचयावरुन एकूण आत्मचरित्रांची कल्पना यायला पुष्कळ मदत होईल.

ही माहिती देताना शक्य तोवर आत्मचरित्रांचाच आधार घेतलेला आहे. त्यामुळे आपली माहिती खुद्द आत्मचरित्रकार कशी सादर करतो याची वाचकांना कल्पना येईल. कारण प्रत्येक आत्मचरित्रकार हा वेगळा, त्याने अनुभविलेले प्रसंग वेगळे, त्याला आलेल्या अडचणी वेगळ्या, त्यातून उडालेल्या ठिणग्या वेगळ्या, एकीकडे ध्येय आणि एकीकडे भोवतालची परिस्थिती यांच्या विरोधामुळे त्याच्या जिवाची जी लाहीलाही झाली ती वेगळी, अशाही परिस्थितीत ज्यांनी मदतीचा हात दिला त्या व्यक्ती वेगळ्या, प्रगती पथावरुन पुढे पुढे गेल्यावर विजयश्रीने जेव्हा गळ्यात माळ घातली तो प्रसंग वेगळा, त्या वेळी अंतःकरणात ज्या आनंदाच्या उर्मी उठल्या त्या वेगळ्या आणि म्हणूनच

त्या आत्मचरित्रकाराने सादर केलेली माहितीही वेगळीच. यास्तव त्यांच्या विषयींची माहिती सादर करताना मी शक्यतोंवर त्यांनाच बोलूं दिलें आहे.

ज्याप्रमाणें पुराण वस्तु संशोधन खात्याचे अधिकारी अजिंठ्याची किंवा वेरूळची लेणीं आहे तशीच सांभाळून ठेवण्याचा प्रयत्न करीत असतात. कारण पाहणारांना मुळची शिल्पकृति आणि तींतून डोकावणारें सौंदर्य जसें होतें तसेंच दिसावें अशी कुतुहलयुक्त जिज्ञासा असते. त्या जिज्ञासेला धक्का लागू नये असा कटाक्ष पुराणवस्तुसंशोधन खात्याच्या अधिकाऱ्यांचा असतो आणि असायलाच पाहिजे. त्यांनी फक्त पाहणाऱ्याला एखाद्या वाटाड्याप्रमाणें हवी ती माहिती पुरविली म्हणजे पुरे. या वाटाड्याचेंच काम मी या प्रकरणांत करण्याचें ठरविलें आहे.

## २ प्रोफेसर ना. सी. फडके यांचा प्रश्न

आता अज्ञात,हेने आत्मचरित्रांची ओळख करून देण्यापूर्वी प्रोफेसर ना.सी.फडके यांनी उपस्थित केलेल्या एका मुद्याकडे मी वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों. ते म्हणतात (१) " आपल्या मराठींतल्या नामांकित लेखकांचा या दृष्टीनें विचार केला तर त्यांपैकी कुणाचें आत्मचरित्र अतिशय चित्तवेधक ठरेल या प्रश्नाचें उत्तर देणें कठीणच म्हटलें पाहिजे. श्री. केळकर यांच्या जीवितांत सुध्दा कोणाच्याही मनाला चटका लावून सोडतील असे प्रसंग कुठे घडून आले ? किंबहुना या धोरणानें विचार केला तर आमच्या एकंदर जीवनांत वैचित्र्याचें आणि साहसाचें जें दारिद्र्य आहे त्याचा परिणाम

(१)' कोंदणें ' प्रो.ना.सी.फडके.
' आत्मचरित्र वाचनीय केव्हां होतात ?' हा लेख.

आमच्या भाषेतल्या आत्मचरित्रावर झाल्यावाचून रहात नाही, व मराठीतल्या आत्मचरित्रपर ग्रंथांना एक प्रकारच्या सामान्यत्वाचा जो दोष चिकटलेला आहे तो लवकर दूर होण्यासारखा नाही, असाच निष्कर्ष काढावा लागेल."

या प्रमाणें प्रो. फडके यांनी आपल्या मराठी आत्मचरित्रांत वैचित्र्याचें आणि साहसाचें दारिद्र्य आहे असें जें म्हटलें आहे तें सर्वमान्य होण्यासारखें आहे. कारण रशियन, अमेरिकन किंवा इतर पाश्चात्य लोकांच्या ठिकाणी जी साहसप्रियता आहे तिच्यामुळे त्या लोकांच्या जीवनांत वैचित्र्याची आणि रोमांचकारी प्रसंगांची रेलचेल असते यात बिलकूल शंका नाही.

३

## पारतंत्र्याचा पाश हेंही एक कारण.

एखाद्या मोठ्या वृक्षाखाली दुसरें रोपटें फोफावत नाही. त्याची वाढ खुरटून जाते. त्याप्रमाणें एकोणीसशें सत्तेचाळीस पूर्वी दीडशे वर्षे पर्यन्त हिंदुस्थानला पारतंत्र्याच्या पाशानें ग्रासलें होतें. त्यामुळें भारतीयांच्या महत्त्वाकांक्षा खुरटून गेल्या होत्या. आणि वाङ्मय हें समाजाचें चित्र असल्याने त्याचीही वाढ जेवढी व्हायला हवी तेवढी झाली नसल्यास नवल नाही. अर्थात्च आत्मचरित्रावरही त्याचा परिणाम होणें अपरिहार्य आहे.

परंतु आता हिंदुस्थानांत स्वातंत्र्यसूर्य उगवला आहे. त्यामुळें समाजांतील सर्वांच्या इच्छा आकांक्षा फोफावल्या आहेत. आपलें कर्तृत्व, कौशल्य आणि धडाडी दाखवायला व्यापारउद्दीमाची, उद्योगधंद्यांची, कलाकौशल्याची, सहकारी संस्थांची अशी झाडुन सारीं क्षेत्रें मोकळीं झालेली आहेत. तेव्हां अर्थात्च समाजांतील सर्व थरांतून शिक्षणाचा फैलाव हळुहळू होऊन पुढील दोनचार पिढ्यांत

सामाजिक, राजकीय आणि आर्थिक समता स्थापन होऊन सर्वांच्या कर्तबगारीला सर्व क्षेत्रांत पूर्ण वाव मिळेल असा भरवसा वाटतो. तेव्हां मग त्याचें प्रतिबिंब वाङ्‌मयांतही पडल्याशिवाय राहणार नाही हें सांगायला नकोच.

## ४ घोंडो केशव कर्वे .. यांचें आत्मवृत्त.

परंतु याचा अर्थ मात्र असा नव्हे की असामान्य आत्मचरित्र मराठींत लिहिलेच गेलें नाही. अगदी हाताच्या बोटावर मोजण्या इतकीं का होईनात पण उत्कृष्ट आत्मचरित्रें मराठींत आहेत असें म्हणायला प्रत्यवाय नाही. याचें उदाहरण म्हणून डॉक्टर धोंडो केशव उर्फ अण्णासाहेब कर्वे यांच्या आत्मवृत्ताकडे बोट दाखविता येईल.

मराठी सहावीच्या परीक्षेकरिता मोठ्या अडचणीने गांवी पोहोचल्यावर केवळ कृशपणामुळे वय लहान आहे असें समजून ज्याला परीक्षेला बसूं दिलें नाही असा साधारण शरीरप्रकृति धारण करणाऱ्या व्यक्तीने पुढील आयुष्यांत अनेक आपत्तींना तोंड देऊन शिक्षण पुरें केल्यावर सार्वजनिक कामासाठी स्वतःला वाहून घेतले, आणि साधनें अनुकूल नसतांना, पाठीशी पैसा नसतांना, चांगल्या चांगल्या सुधारक म्हणविणाऱ्या सुशिक्षितांचाही विधवांच्या शिक्षणाला विरोध असतांना, प्रत्यक्ष ज्या स्त्रियांना शिक्षण देण्याचें त्यांनी ठरविलें त्या स्वतःही फारशा उत्सुक नसतांना, म्हणजे अडचणींचे डोंगर समोर अज्ञात.हेने उभे असतांना पद्मभूषण डॉक्टर धोंडो केशव उर्फ अण्णासाहेब कर्वे यांनी मोठ्या धडाडीने, चिकाटीने आणि विरोधकांची पर्वा न करितां महाराष्ट्रांत स्त्रीशिक्षणाचें अमोलिक कार्य केलें आहे. म्हणूनच त्यांचें आत्मवृत्त आदर्शवत आहे असें आम्हाला वाटतें.

विधवांना आणि स्त्रीयांना शिक्षण देण्याचें कार्य करतांना त्यांना ज्या अडचणी आल्या त्याचें वर्णन त्यांनी आपल्या आत्मवृत्तात थोडक्यात दिलें आहे. पण तेवढ्या वरूनही त्यांच्या आत्मवृत्तात साहस आणि वैचित्र्य नाही असें म्हणता येणार नाही. आज स्त्री शिक्षणाला लोक अनुकूल असल्यामुळे साठसत्तर वर्षांपूर्वी स्त्रीयांच्या शिक्षणाला हिंदुस्थानात किती विरोध होता हें कोणी मुद्दाम सांगितल्याशिवाय पुढील पिढ्यांना समजणार नाही. हें कार्य थोड्याफार अंशाने अण्णासाहेब कर्व्यांच्या आत्मवृत्ताने केलें आहे हें कोणालाही मान्य करावें लागेल.

५

## प्रोफेसर अ. ना. देशपांडे यांचें उत्तर.

साहसाने आणि वैचित्र्याने युक्त अशी हाताच्या बोटावर मोजता येण्यासारखी जीं आत्मचरित्रें आहेत त्यापैकी एकाचा वर उल्लेख केल्यावर, अशी साहसाने आणि वैचित्र्याने भरलेलीं अनेक आत्मचरित्रें मराठींत केव्हां निर्माण होतील याचाही उहापोह अगदी थोडक्यात पण येथेच करतो.

प्रोफेसर अ.ना.देशपांडे म्हणतात....

(१) "महाराष्ट्र शारदेच्या उपर्युक्त दरबाराकडे जरा स्थूल दृष्टिक्षेप टाकला असता असें दिसतें की, या दरबारातले बहुतांश मानकरी हे ब्राम्हण वर्गातले आहेत. हा निष्कर्ष जातीयवादी भूमिका स्वीकारून काढलेला नाही, हें नीट ध्यानात घेणें आवश्यक आहे. या निष्कर्षाकडे लक्ष वेधण्याचा हेतु, अजून कितीतरी निर्माण शक्ति सुप्तावस्थेत पडलेली आहे हें दाखविण्याचा आहे. ब्राम्हणवर्ग हा समाजातला अत्यंत अल्पसंख्य वर्ग आहे.

---

(१) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग दुसरा..अ.ना.देशपांडे पृष्ठ ८०५

या दृष्टीने पाहता असें दिसून येतें की, समाजाच्या बहुसंख्य वर्गातले साहित्य निर्मितीचे अपरंपार सामर्थ्य अभिव्यक्तीची संधि न मिळाल्यामुळे, अद्यापि अव्यक्त अवस्थेत गेऊन कुजत पडलें आहे. महाराष्ट्र समाजातील प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्तीची संधि आणि साधने सहज उपलब्ध होण्या इतका शिक्षणप्रसार जेव्हा सार्वत्रिक होईल, तेव्हाच मराठी वाङ्मयांत मराठी समाज मनाचें खरेखुरें प्रतिबिंब उमटण्यास अनुकूल परिस्थिती उत्पन्न होईल आणि मराठी प्रतिभा तिच्या सर्व कलासह पूर्ण कांतीने युक्त होऊन प्रकट होण्याच्या पर्वकाळास प्रारंभ होईल !"

प्रोफेसर अ.ना.देशपांडे यांचें म्हणणें अगदी सोप्या शब्दांत सांगायचें तर असें म्हणता येईल की तेली, तांबोळी, अस्पृश्य, नवबौध्द, भिल्ल, कातकरी, इत्यादि सहित बहुजन समाजातले सर्वच्या सर्व स्त्रीपुरुष जेव्हा सुशिक्षित होतील तेव्हा इतर कलांच्या प्रमाणेंच वाङ्मयालाही अधिक बहर येईल.

म्हणजे याचा अर्थ असा की मग आत्मचरित्र हा जो वाङ्मयाचा एक प्रकार आहे तोही अधिकाधिक साहसाने आणि वैचित्र्याने युक्त असा होऊन त्याकडे अधिकाधिक लोक आकर्षिले जातील. कारण वाङ्मयाच्या इतर सर्व प्रकारांत जशी सर्वतोपरी वाढ होईल तशीच आत्मचरित्रांतही होईल. आणि मग त्यांत साहस आणि वैचित्र्य यांनी युक्त अशा आत्मचरित्रांची कमतरता भासणार नाही. याचें एक गमक म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांनी 'महाराष्ट्र व्यापार व औद्योगिक परिषद' या संस्थेचें उद्घाटन करतांना जे उद्गार काढले ते येथें देण्यासारखे आहेत.

नामदार यशवंतराव चव्हाण म्हणाले (१) "भांडवल उभारण्याच्या बाबतीत सहकारी क्षेत्रांत किती कार्य होऊं शकते हें पुढील उदाहरणावरून दिसून येईल. या राज्यामध्यें १३ सहकारी साखर कारखाने स्थापन झाले असून त्यांनी

(१) रविवारची लोकसत्ता .. दिनांक १९ जून १९६० पृष्ठ १०

साखरेच्या उत्पादनास सुरुवातही केली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत अशा प्रकारचे आणखी १२ कारखाने उभारण्यांत यावयाचे आहेत. आपल्याला नवल वाटेल, पण सबंध भारतात पहिला सहकारी कारखाना उभारण्याच्या कामीं अहमदनगरच्या एका गरीब शेतकऱ्याचेच प्रयत्न कारणीभूत झाले आहेत. इतरांशी सहकार्य करून त्याने हा कारखाना उभारण्याच्या कामीं अतिशय खटपट केली."

हें वाचून वाटतें की तो अहमदनगरचा गरीब शेतकरी सुशिक्षित असता तर ..........! आणि त्याला लिहिण्याचें तंत्र ठाऊक असतें तर..... आणि त्याने आत्मचरित्र लिहिलें असतें तर ..........! तें खात्रीने साहसाने आणि वैचित्र्याने अगदी खचोखच भरून गेलें असतें. म्हणजे मग प्रोफेसर अ.ना. देशपांडे यांचे म्हणणें अगदी अक्षरशः खरें ठरलें असतें. आणि आज जरी अशी स्थिती नसली तरी पुढे काही वर्षांनी समाजातले सर्व लोक सुशिक्षित झाल्यावर अशी स्थिति निर्माण होणार नाही का ! म्हणजे प्रो. फडके यांच्या प्रश्नाला प्रो. देशपांडे यांनीच उत्तर दिलें आहे असें म्हणायला काय हरकत आहे ! कारण झाडून सारा समाज सुशिक्षित झाल्यावर ज्या आत्मचरित्रांत साहस, वैचित्र्य, रोमांचकारी घटना आणि चित्तवेधकता आहे, अशांची संख्या वाढणार नाही असें होणेंच शक्य नाही

## ६ अर्वाचीन काळांतील पहिलें आत्मचरित्र.

आता अर्वाचीन काळांतील आत्मचरित्रांचा परिचय करून घेऊं. असा विचार करतांना नाना फडणवीस यांच्या आत्मचरित्रापासून सुरुवात करायला कांही हरकत नाही. कारण ज्याला आत्मचरित्र म्हणून म्हणता येईल असें .. ,

मराठीतील हेंच प्रथम आत्मचरित्र होय. एक मनाची प्रबळ इच्छा असली म्हणजे मनुष्य आपल्या अंतःकरणातील भाव कसे व्यक्त करू शकतो आणि त्याला भाषाही कशी सुचते याचा सर्वांत पहिला नमुना म्हणून नाना फडणवीस यांच्या आत्मचरित्राकडे बोट दाखविता येईल. आधुनिक मराठी वाङ्मयातील हें पहिलें आत्मचरित्र म्हणण्याचें आणखी एक कारण असें की आपण आपलें चरित्र इतरांना सांगावें ही भावना लेखकाच्या ठिकाणी आहे. तसेंच हें आत्मचरित्र जरी अपुरें असलें तरी तेवढ्या वरूनही नानांच्या स्वभावाचे काही पैलू आपणास पाहता येतात. म्हणजे आत्मचरित्रकाराने 'आत्मदर्शन घडवावें' असें जें आपण म्हणतो त्याचा प्रत्यय नाना फडणवीसांचें आत्मचरित्र वाचल्याने येऊ शकतो.

## ७ नाना फडणवीस यांचें आत्मचरित्र.

नानांच्या आत्मचरित्रांतील पुढील उतारा पहा ...

(१) " मी ल्हानपणीं अज्ञानेंकरून आवृत. परंतु पूर्व संस्कारें करून देवाची पूजा करावी हा छंद फार. याजकरिता मातोश्रींनीं मारही दिला. परंतु संस्कार दृढ, विद्याभ्यासाकरिता मातापितर जे यांची शिक्षा, तेणें करून ल्हानपणीं अज्ञानाकरिता चित्तास वाईट वाटून त्याचेंही अनिष्ट चिंतीत असें.

दहावें वर्षी विवाह झाला. विघ्नें पडली असता निर्विघ्न केलें. मध्यें घोड्यावरून पडलों, अति अवस्था कठिण, दोन दिवस शरीरभान नाही. या प्रमाणें जालें असता गोविंद जो त्याचे कृपेनें बरें केलें. पुढे पंधरावे वर्षी

(१) ऐतिहासिक पत्र बोध .. गो.स.सरदेसाई.
पृष्ठ ७० ते ७२ , नानांचा जन्म माघ कृष्ण ४ शके १६६३ तारीख १२ फेब्रुवारी १७४२.

पित्याचा काळ झाला (१) त्याचें औध्र्वदेहिक ईश्वरें करविलें. पुढे परंपर सेवाधर्म चालावा या योगें व श्रीमंतांची कृपा पुत्रवत असे जाणून कर्नाटक प्रांतीं श्रीरंगपट्टण पर्यंत गेलों. मातोश्री व कुटुंब सहवर्तमान भाऊ बरोबर हिंदुस्थानात जाऊन स्वर्गंगा, त्रिपथगा भागीरथीचें स्नान त्रिस्थळी यात्रा करावी, अंत:करण शुध्द होईल या भावनेवरून गेलों. त्या काळीं चित्तास अतिवैराग्य. याचें कारण शरीरीं किंचित पीडा. परंतु चित्तास नाही. मातेच्या ठायी भक्ति होत्साता चाललों. ते नर्मदा महागंगेमध्ये स्नान करून एका वृत्तीनें ध्यान केलें. त्या दिवसा पासून उत्तरोत्तर वैराग्य अंत:करण शुध्दीच होत चालली. भाऊची ममता विशेष व आवेची व्यथा बहुत जाहाली. उठावयास शक्ति नाही. रेचन, बहुत, ग्लानी फार. तेव्हां कूच जहालें असता मुक्काम श्रीमंतांनी करवावा. त्या काळीं ईश्वरें आरोग्य केलें.

पुढे दरमजल चरमण्वती (चंबळ नदी) तीरीं गेलों. तेथे ग्रहण पडलें. स्नानदानादिकें करून आत्मा पवित्र होत्साता ध्यानें करून कालक्षेप चालत असे. पुढे सूर्यकन्या यमुना इचे तीरीं गौघाटाजवळ गेलों. तेथे क्षौर प्रायश्चित्त श्राध्दादिक करून तदनंतर पुढे भगवान पूर्ण ब्रम्ह राधाकृष्ण याणें सकळ लीला केल्या असें जें वृंदावन त्या स्थळास गेलों. तेथे कालिया डोहीं कदंबवृक्ष ज्याजवर भगवान बसून वस्त्रहरण करिता जाहाला. त्याच्या शाखा अद्यापि यमुनेत गेल्या आहेत, त्या खाली जाऊन स्नानतर्पण करून तदनंतर गोपीचंदनाचे टिळे व तुळसीच्या माळा घालून भगवंताचें ध्यान करीत होत्साता वृंदावनात अटलबिहारी, व कुंजबिहारी, व बालबिहारी, राधाकिशोर, गोविंदजी या भगवंताच्या मूर्ती यांची दर्शनें घेतली त्यांत कुंजबिहारी मध्यान्हकाळी चौपाळ्यावर निद्रिस्थ,

(१) पित्याचें नांव जनार्दन बल्लाळ भानु

कंपाट लागलेलें, परंतु चोपाळ्याची दोरी बाहेर ओढीत असत. ती आपले हातीं ओढून भगवान जो यास आंदोलन लीला केली. तेथोन शृंगारवट जेथें भगवंते राधेस शृंगार केले तेथे जाऊन वटदर्शन घेऊन पुढे वंशीवट म्हणजे जेथे भगवंते मुरलीवादन केलें, तेथे जाऊन वटाचें दर्शन केलें. तेथून सेवाकुंज, कुंजवन हीं स्थळें, कुंज असें की भगवान लीला करतो असाच भास होत असावा. सर्वही वृक्ष छत्राकार, ठेंगणे, भूमिस्थ पल्लव कंटक वृक्षासही परंतु कंटक नाही. हे पाहून आनंदमय होत्साता यमुना तीरीं रेतींत भगवान जो यानें बाळरूपि लीला केली. पादारविंद संबंधि रेणु रजःकण त्याची प्राप्ति मस्तकी वंदाव्याकरिता ब्रह्मादिक देव इच्छितात. तेथे जाऊन लोळून ती रेती मस्तकावर घेतली. तेथोन ज्ञानगुदडीस (१) गेलों.

------ तेथे थोरथोर संत, महंत बैरागी भगवत्पर होत्साते, सायंकाळचे साहा घटिका दिवसास येऊन बसून पुराणश्रवण करीत आहेत. भगवंताच्या कथा नामें गाताहेत. त्यांचें दर्शन घेऊन चार घटका पाहून चित्त बहुत शांत जहालें. तदनंतर धीरसमीर जे या प्रति कालिंदीतीरीं जाऊन सायंकाळ संध्या करून भगवान सांबसदाशिव जो याचें एकाग्र मनें करून ध्यान करून येता जाहलों. या प्रमाणें तीन चार दिवस क्रमिले. अनेक जन्माचें पुण्य की असें वृंदावन दृष्टीस पडलें. तेणें करून भगवंताच्या मूर्ती व भगवद्भक्त त्याचें दर्शनेंकरून नेत्र पवित्र झाले. पादें करून चालत गेलों, तेणें करून पायाचें सार्थक झालें. हस्तें करून नामस्मरण करिता जाहालों, तेणें करून हस्त पवित्र झाले. मुखेंकरून नामस्मरण केलें तेणें करून मुख पवित्र जाले. कर्णें करून भगवत्कथा श्रवण केलें, तेणें करून श्रोत्र पवित्रता पावले. स्नानें करून सर्व देह पवित्र झाला. ज्या वृंदावनांत बैरागी एकाग्र वृत्ति करून ध्यानस्थ होत्साते कुंजाखाली जागा जागा बसले आहेत, कोणी पर्णेच भक्षून, कोणी जलप्राशन मात्र करून, कोणी दुग्धसेवन करून, कोणी सिद्धान्त आणून घालील तेंच खाऊन राहिले आहेत.

(१) गोसाव्यांचा मठ किंवा आखाडा.

अंशांचें दर्शन घेऊन सत्समागमाचें माहात्म्य किंचित आनंदातें पावलों. त्यांत एका वैराग्यानें कृपा करून एक मंत्र भगवंताचे नामाचा सांगितला कीं याचा जप करीत जावा. तो भगवंतेंच सांगितला असा मानून, सर्वांस यथाशक्ति देणें देऊन, संतोषानें पावलों."

वरील उताऱ्यावरून दिसून येईल की हें आत्मचरित्र मोठें वाचनीय असें आहे. म्हणूनच तें अखेर पर्यंत लिहिलें जाऊन आपणास वाचावयास मिळालें असतें तर बरें झालें असतें. वर उद्धृत केलेल्या थोड्याशा उताऱ्यावरूनही नाना फडणवीस यांच्या आत्मचरित्राला सत्याची बैठक आहे हें दिसून येतें.

ते म्हणतात " विद्याभ्यासाकरिता मातापितर जे यांची शिक्षा, तेणे करून ल्हानपणीं अज्ञानाकरितां चित्तास वाईट वाटून त्यांचेही अनिष्ट चिंतीत असे." म्हणजे आपल्या आई वडिलांचें अकल्याण व्हावें यास्तव नाना मनातल्या मनांत तसें म्हणत असत असा याचा सरळ अर्थ आहे. तसेंच नाना फडणवीस यांचा ईश्वरावर मोठा भरंवसा होता असें दिसून येते.

या आत्मचरित्राबाबत सरदेसाई म्हणतात तें अगदी बरोबर आहे. (१) " नाना फडणवीसांच्या आत्मचरित्राचा हा उतारा अनेक दृष्टींनी मनोरंजक वाटेल. त्यांत तत्कालीन भाषेचें प्रतिबिंब आहे. हें आत्मचरित्र अखेर पर्यंत पोचविलें गेले नाही ही खेदाची गोष्ट होय. "

---

(१) ऐतिहासिक पत्रबोध ... गो.स. सरदेसाई
पृष्ठ ७०

८

# अरुणोदय

१

## बाबा पदमनजी यांचा जन्म.

बाबा पदमनजी यांच्या वडिलांचें नांव पदमनजी माणीकजी असें होतें. त्यांचा जन्म सन १८०५ मध्यें झाला. त्यांचें शिक्षण कर्नल टी.बी. जर्वीस साहेब यांच्या इंजिनियरिंग स्कुलांत झालें. आणि शिक्षण झाल्यावर प्रथम दक्षिण कोंकणांत सब असिस्टंट सरवेअर म्हणून त्यांची नेमणूक झाली. नंतर ७ मार्च १८२१ सालीं त्यांची बदली बेळगाव या गांवीं झाली. आणि तेथेच सन १८३१ मध्यें मे महिन्यांत बाबा पदमनजी यांचा जन्म झाला. त्या वेळच्या राहत्या घराची माहिती सांगतांना बाबा पदमनजी म्हणतात ...(पृष्ट १)

" ज्या घरांत मी जन्मलों तें ब्राम्हणाचें असून तेथील प्रसिध्द मारुतीच्या आळींत होतें. त्याच्या मागून एकदोन घरें बदलल्यावर आम्ही त्याच आळींत दुसऱ्या एका घरांत राहावयास गेलों. तेव्हां माझें वय सुमारें ४ वर्षांचें असावें. ह्या घरांत गेल्याची मला बरीच आठवण आहे. हेंही घर ब्राम्हणाचें होतें. तें फार मोठें होते तरी त्याचें भाडें दरमहा केवळ दोन रुपये होते, व ते साल अखेरीस देण्याची चाल होती. माझ्या वडिलांनी त्याला बंगल्या सारख्या खिडक्या वगैरे पाडून ओटीवर खुर्च्या, बाके मांडून बसण्यासाठी चांगली सोय व शोभा केली होती. सोप्याच्या दोन्ही बाजूस बाग लाविली होती. असें शोभायमान घर त्या सगळ्या आळींत नव्हतें इतकेच नाही, तर

साहेब लोकांचे बंगले व एकदोन पारशांचीं घरें खेरीज करून तसें घर त्या सर्व गांवांत क्वचित दृष्टीस पडे. आमच्या दारापुढे मुंबईच्या रीतीप्रमाणें रात्रीं मोठा कंदील टांगण्याची चाल होती, ती पाहून गांवांतील लोकांस व विशेषेकरून आसपासच्या खेड्यापाड्यांतून येणाऱ्या लोकांस फार मौज वाटे. कित्येकांस तर हें देऊळच आहे असा भास होई. दारापुढे जी बाग होती त्यांतील झाडांवर फुलें म्हणून क्वचित राहात. कारण शेजारपाजारचे राहणारे आम्हांस विचारल्यावाचून तीं आपल्या देवपूजेकरितां रात्रीं, पहाटेस, दोन प्रहरीं काढून नेत. हिंदुमताप्रमाणें अशा कृत्यास चोरी समजत नाहींत."

## २ प्राथमिक शाळेंतील अभ्यास.

बाबा पदमनजींचा प्राथमिक शाळेंतील अभ्यास बेळगांव येथील मराठी शाळेंत झाला. त्या वेळची शाळे विषयींची माहिती ते पुढील प्रमाणें देतात ( पृष्ट १० )

"माझा मराठी अभ्यास बेळगांवांतील सरकारी मराठी शाळेंत झाला. ही शाळा सन १८२० साल स्थापली गेली. शाळेची जागा गांवांतील आदितवार पेठेंत होती. तींत खोल्या नव्हत्या. ती लांबचे लांब धोब्याळ किंवा उतार शाळेप्रमाणें होती. शाळेंत घड्याळ नव्हतें. सावलीच्या खुणाकरून सुटी देत असत. मुलांकरितां सरकारी पाट्या होत्या. सणांच्या सुट्या फार असत. शिक्षेचे प्रकार जुन्या गांवठी शाळे प्रमाणें होते. म्हणजे घोडीवर चढविणें, पाठीवर पाट्या ठेवणें, कान धरून उठाबशी करावयास लावणें, जमिनीवर हाताचे एक बोट टेकावयास व एक पाय मागे उचलावयास लावून ओणवे करणें इत्यादि. वेतानेंही मुलास खूप बडवीत. अभ्यास म्हटला तर साधारणच, म्हणजे धूळाक्षर, कित्ते वळविणें, लरडे

लिहिणें, मोडी कागद वाचणें असा होता. त्याकाळीं मुलें परवचा म्हणत. वरच्या वर्गात काही भूगोल, व्याकरण, गणित शिकवीत. वाचना करिता बाल गोष्टी, मनोबोधकथा, इसापनीति, लघुहितोपदेश, सिंहासनबत्तीशी, वेताळपंचविशी, पंचोपाख्यान, मराठ्यांची बखर, इंग्लंडचा इतिहास, बाळमित्र, बेडकांची वडी, जागती जोत, इत्यादि पुस्तकें होतीं."

**३ "माझें पहिलें बक्षीस."**

बेळगाव येथें शाळांची तपासणी करण्यासाठी प्रोफेसर बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर हे आले होते. त्यांच्या कडून बक्षीस मिळालें. त्या विषयी बाबा पदमनजी म्हणतात (पृष्ट १२)

"ह्यांनी आमच्या शाळेची परीक्षा घेऊन मुलांस जीं बक्षिसें वाटलीं त्यांत मला दादोबाकृत मराठी नकाशांचें पुस्तक व कर्यांडीकृत भूगोलखगोलाचें पुस्तक अशी दोन बक्षिसें मिळाली होतीं. त्यावर माझें नांव मोडींत लिहिलें असून खालीं शास्त्रीबावांची इंग्रजी सही होती."

**४ बेळगावच्या मिशन स्कूलांत प्रवेश.**

या मिशन शाळेत बाबा पदमनजींचा १८४३ सांत प्रवेश झाला. त्या शाळेबद्दल ते बोलतात (पृष्ट १९)

"या शाळेंत मराठी शाळेप्रमाणें मुलास शिक्षा करण्याचे क्रूर प्रकार नव्हते. तरी मास्तर लोक मुलास बरीच कडक शिक्षा करीत. त्या प्रत्येकाच्या हातांत छडी असायचीच. शाळेच्या आसपास अडुळशाचीं झाडें होतीं. त्यांच्या फांद्या मोडून मुलें त्यास छडी आणून देत व ती त्यांच्याच अंगावर व हातावर

जोराने पढत असे. ' छडी लागे छमछम विद्या येई घमघम ' ह्या म्हणीचा वारंवार आम्हास अनुभव येत असे. मुलांचे कान पिळण्याची, व गालावर चपडाका मारण्याचीही चाल होती. चोरी वगैरेच्या अपराधास किंवा फार दिवस धडा न केल्याच्या अपराधास ' डन्सकॅप ' नावाची कागदाची टोपी करून मुलाच्या डोक्यात घालून त्याला शाळेत फिरवीत. शाळेत मुलांचें बुक, स्लेट, चाकू वगैरे जिन्नस हरवले असता संध्याकाळी शाळा सुटतेवेळी दाराशी प्रत्येक मुलाचा झाडा घेत. धडा न शिकणाऱ्या मुलास सुटी झाल्यावर तासभर कोंडून ठेवीत. शाळा सुटण्याचे वेळी पाद्री साहेब प्रार्थना करीत. प्रार्थना झाल्यावर मास्तर मुलांची कॉपी पाहत. ज्याने कॉपी लिहिली नसेल त्याला व वाईट अक्षर लिहिणारास शिक्षा होत असे. "

## ५ : मिशनरी साहेबांच्या प्रार्थनेचें अनुकरण.

बाबा पदमनजी ख्रिस्ती धर्माचें कसें न कळत अनुकरण करू लागलें ते पहा (पृष्ट २६ )

" या शाळेत मिशनरी साहेब जी प्रार्थना करीत ती पाहून तिच्या प्रमाणें मी उगीच मौजेकरिता घरीं मेज मांडून त्यावर " बाय मी " चें पुस्तक ठेवून त्यांत जी शेवटची प्रार्थना होती ती वाचावी. हें पाहून माझ्या वडिलास काही वाईट वाटत नसे. परंतु कोणी बाहेरचा गृहस्थ त्यास भेटावयास आला व माझ्या अभ्यासाच्या गोष्टी निघाल्या म्हणजे मला कधीकधी पाद्रीसाहेब प्रार्थना करितात तशी करून दाखवावयास सांगत. तेव्हां मी तें बुक मेजावर ठेवून त्या समोर उभे राहून व मेजावर दोन्ही हात टेकून खाली मान करून ती प्रार्थना

वाचून दाखवीत असे.

## = ६ = ।मुंबईतील एल्फिन्स्टन स्कूलांत अभ्यास ।

मुंबईतील अभ्यासाबाबत बाबा पद्मनजी बोलतात (पृष्ट ११.१२)

" या तिसऱ्या वर्गाचे मास्तर रा.रा. बाबाजी अमृत हे होते. हे गृहस्थ स्वभावाने फार शांत असून मुलास फार प्रिय असत. त्यांची शिकविण्याची हातोटी चांगली होती. मी नित्य शास्त्रीबोवांच्या बरोबर शाळेस जावें. त्यांची जाण्याची वाट काळबादेवीच्या रस्त्यावरून होती. देवळाजवळ आले म्हणजे उभे राहून देवीस नमस्कार करीत, तसें मीही करी, हीच सवई जोपर्यंत मी शाळेंत होतो तों पर्यंत मला लागली होती. एल्फिन्स्टन स्कूल पाहून मला फार आश्चर्य वाटलें. शाळेची इमारत, मुलांची संख्या, त्यांचे मुंबईशाई पोषाक, पारशांच्या मुलांची दांडगाई, धिंगाणा व मारामारी, वर्ग बसायाच्या मोठमोठाल्या खोल्या वगैरे पाहून मी फार भयचकीत झालों. या शाळेंतही वेतकाठीने झोडपणें, कानसुळावर चपडाका मारणें, बाकावर उभे करणें, शाळा सुटल्यावर अटकेंत ठेवणें इत्यादि शिक्षेचे प्रकार चालू होते. प्रिन्सिपॉलसाहेब तर कधी कधी मुलावर विलायती बुटांची लाथ उचलीत. पारशांच्या मुलास दोन प्रहरी सुटीच्या वेळी जें जेवण येत असे तें पाहून मला आश्चर्य वाटावें. तसें मी बेळगावास कधीच पाहिलें नव्हतें. ती मुलें पिवळ्याधमक खिचडीचे घास तोंडास हात न लाविता फक्की मारून खात व लोटा न लावता पाणी पीत. अन्नाचा तर फार नाश करीत, एकमेकांच्या अंगावर खिचडी फेकीत, आणि जेवायाच्या जागी सर्व खरकटें पसरीत, तें पाहून मला फार किळस येई. "

*** *** ***

## /७/ फ्री चर्च विद्यालयांतील धर्म शिक्षण.

इ.स. १८५०.५२ मध्यें बाबा पद्मनजी यांना फ्री चर्च विद्यालयांत जें धर्मशिक्षण मिळालें त्याविषयीं आणि नंतर बैबल शिकविण्यासाठीं शाळेंत त्यांची जी नेमणूक झाली त्याविषयी ते म्हणतात ( पृष्ठ ८१.८२ )

" त्या काळीं फ्री चर्च विद्यालयांत जें ख्रिस्ती धर्मशिक्षण मुलास मिळत असे तें फारच उत्तम प्रकारचें होतें. एक गणिताचा व रसायनशास्त्राचा वर्ग खेरीज करून इतर सर्व विषयांच्या वर्गात धर्मसंबंधी चर्चा थोडीबहुत चालायचीच, आणि ती अशा प्रकारची होती की तिचा कोणास कंटाळा येत नसे. सकाळचा व संध्याकाळचा धर्मोपदेश खेरीज करून प्रत्येक वर्गास बैबल किंवा त्यासंबंधी तोंडचे धडे नित्य पूर्ण एक तास शिकवीत. जेव्हां मला शिक्षकाचें काम मिळालें तेव्हां मी ख्रिस्ती नसताही मला बैबल मास्तरची जागा दिली होती. ही गोष्ट मला फारच हितावह झाली. पूर्वीच्या मिशन शाळेंत संपादन केलेलें बैबलचें ज्ञान माझ्या उपयोगी पडूं लागलें.

मी आपल्या वर्गास बैबल पद्धतवार शिकवीत असें. मी धड्यांची घरी चांगली तयारी करावी. मुलास शास्त्रांतील ओव्या पाठ करावयास लावाव्या. धड्यावर प्रश्न लिहून आणावयास सांगावें. हुशार मुलास नंबर द्यावे. कित्येक मुलें बैबल शिकण्याचा कंटाळा करीत. तरी दुसरी आवडीनें व हुशारीनें आपले धडे तयार करून आणीत. कधी कधी शास्त्रा संबंधी विषयाची फोड करण्यात व त्यावरून बोध करण्यात मी इतकी आस्था दाखवावी की ती पाहून मुलांनी मला म्हणावें कीं " जर तुम्हाला ह्या गोष्टी खऱ्या वाटतात -

तर तुम्ही ख्रिस्ती का होत नाही ?" मुलास शास्त्रार्थ सांगते वेळी कधी कधी देवाने मला असा प्रकाश द्यावा की तेणें करून माझें मन अगदी वेधून जावे व माझे नेत्र अश्रूंनी भरावे. एकदा " अहो कष्टी तुम्ही सर्व मजकडे या " ह्या ओवीचा अर्थ सांगताना माझी अशीच अवस्था झाली. मुलेंही काही वेळ तटस्थ व सदगदित होऊन त्यांनी पुन्हा वरील प्रश्न मला विचारला. ह्या प्रसंगाची मला चांगली आठवण आहे. ही गोष्ट १८५१ सालांतली आहे."

८

## बाबा पदमनजी ख्रिस्ती झाले

बाबा पदमनजी ख्रिस्ती झाले त्या वेळी ते लिहितात ( पृष्ठ १६९)

" रविवार ता. १२ ऑगष्ट १८५४ या रोजी मी ख्रिस्ती भजनालयास जाण्यास निघालों. घरांतून निघतेवेळी मी रोजचा साधारण पोषाख केला होता. माझ्या पाशी घरचे १०० रुपये रोख होते. त्यांतून काही बरोबर घेतले नाही. आईला बाजाराचें काही सामान वगैरे पाहिजे काय असें विचारलें. बायको एका कोपऱ्यांत बसली होती तिला न्याहाळून पाहिलें. हिंदुधर्माच्या संबंधाने ही सर्वांची शेवटची भेट असें मनाला वाटलें. अंगणांत लहान भावंडें खेळत होतीं त्यांची भेट घेतली. आणि देवाची प्रार्थना करून बाहेर पडलों."

" शेवटी माझ्या बाप्तिस्म्याचा दिवस नेमला व त्या विषयी मी आपल्या वडिलांस सांगितलें. ते मला म्हणाले की पाद्री साहेबास काही दक्षिणा द्यावी लागत असल्यास आपण देऊं. कारण तो विधी फुकट करून घेऊं नये. हें त्यांचे बोलणें थट्टेचे नव्हतें. खरोखरीचें होतें. परंतु मी त्यास सांगितलें की

तशी काही रीत नाही. बाप्तिस्म्याच्या दिवशी आपण ख्रिस्ती देवळांत येऊं असें ते म्हणाले होते परंतु ता. २ सप्टेंबर १८५४ या दिवशीं ते आले नाहीत. प्रथम माझ्या वडिलांनी मला घरीं बोलावयास पाठविलें. पण तो दिवस ईश्वरसमागमांत व पारमार्थिक चिंतन करण्यात घालवावा असें माझ्या मनांत होतें म्हणून मी गेलों नाही. त्या दिवशी मला घरचा असा निरोप आला कीं "तूं प्रकाशांत गेलास पण आमच्या घरांत अंधार पडला." माझ्या आईनें तर फार शोक केला. बाप्तिस्मा झाला नव्हता तो पर्यंत तिला आशा होती कीं मी परत येईन. परंतु ती आशा त्या दिवशीं अजीं बुडाली."

*** *** *** ***

# १ दादोबा पांडुरंग.

## १ दादोबांचें बालपण

मुंबईत शेंतवाडींत दादोबा पांडुरंग यांचा जन्म वैशाख वद्य ४ शके १७२६ म्हणजे ९ मे १८१४ रोजीं झाला.

दादोबांना ल्हानपणापासूनच गरिबांविषयीं कळवळा वाटत होता असें दिसतें. ते म्हणतात ( पृष्ट १९ )

"मी अगदीं ल्हान होतों, म्हणजे सुमारे पांच सहा वर्षांचा होतों तेव्हा पासून माझ्या मनांत गरीब अनाथांविषयीं फार दया येऊं लागली. गरीब भिकारी पुरुष बायको अथवा पोरगे, आपल्या दारापुढे येऊन भीक मागूं लागले म्हणजे मला त्या वेळीं वाटत असें कीं देवा याला कां खायला आणि पांघरायला मिळत नाहीं हे इतके गरीब कां? अरे याला कोणी कां देत नाहीं ?"........

नाना नारायण नांवाच्या बालमित्राविषयीं दादोबा लिहितात ( पृष्ट ४१)

"मी शाळेंत विद्यार्थी असता आणि पुढे आम्हीं रोजगारास लागल्यावरही नाना प्रमाणें मला दुसरा मित्र नव्हता. त्याने मला नेहमी आपल्या आजाच्या घरीं न्यावें आणि आपणही नेहमी आमच्या घरीं यावें. त्याचे आमचे त्या वेळेस लोकसुधारणे विषयीं विचार होत असावे. हिंदु लोक सुधारण्यास जात मोठी अडचण आहे असे त्याच्या भाषणांत केव्हा केव्हा यावें."

दादोबा आपल्या लग्नाबद्दल लिहितात ( पृष्ट ४२) " सन १८२८ मध्यें माझें लग्न झालें. जगन्नाथ पांडुरंग यांची मुलगी कृष्णाबाई हिची मागणी ती उपजल्यापासूनच बहुतकरून झाली असावी."

दादोबा आपल्या वडीलांच्या नियमीतपणाबद्दल म्हणतात (६९)....
" आमच्या तीर्थरूपांचा हा मोठा नियम होता की, जे काही लिहिले त्याची नक्कल आपल्यापाशी ठेवावी. मग त्यांत कितीही क्षुल्लक प्रकारचा मजकूर का असेना. असा त्यांचा उद्योग असे. एक क्षणभर ते उगीच बसले आहेत असे म्यां कधीच पाहिले नाही."

+ + + + + + + + + + + + + + + + + + + + + +

२ दादोबांची सांपत्तिक स्थिती

+ + + + + + + + + + + + + + + + + + + + + + ++

सुरुवातीस दादोबांची स्थिती बरीच गरीबीची होती. ( ८४ )
" या वेळी मी असिस्टंट मास्तर असता माझा वीस रुपयांचा दरमहा पगार होता. तो फार थोडा म्हणून मी काळजींत होतो. पुढे आमचे मास्तर Mr. Henderson यांनी माझी चाल व गरीबी जाणून उगीच निमित्त करून " मला मराठी शिकवायास सकाळी बंगल्यात येत जा. मी तुला दहा रुपये देत जाईन." असे म्हणून काही महिने ते मला दहा रुपये देत असत. आणि पुढे Mr. Murphy हे त्या वेळेस कुलाब्याच्या दांडीजवळ राहात होते. आणि ते मोठ्या कोर्टाचे Chief Inspector होते. त्यांची ओळख करून दिली, आणि त्याजकडे माझी शिफारस केली. त्यावरून ते मजपाशी काही भक्तिविजयाचे अध्याय वाचू लागले. मी नेहमी इतका दूर चालून त्यांच्या बंगल्यात जात असे. त्या वेळेस कुलाब्यास जायास ल्हानशी खाडी उतरावी लागत असे.

*+*+*+*+*+*+*+*+*+*+*+*+*

३ दादोबांची निरीक्षण शक्ति

*+*+*+*+*+*+*+*+*+*+*+*+*+*

पुढील प्रसंगावरून दादोबांची निरीक्षणशक्ति दिसून येते. ( ५५ )
" जावऱ्यास जातांना (१) आम्ही सिंधव्याचा ( सैंधव्याचा घाट )

(१) जावरा हे मध्य प्रदेशांत रतलाम जवळ अजमेर खंडवा या वेस्टर्न रेल्वेवर एक स्टेशन आहे.

चढत असता आम्हास तेथील भिल्लांचा मोठा नाईक भेटला. त्याने आमच्या बरोबर सरकारचे पट्टेवाले पाहून तो आम्हास पुढे सामोरा आला आणि त्याने बोलून चालून आमचे चांगले आगतस्वागत केले. तो रंगाने काळा कुळकुळीत व दोंदील, सुमारे पन्नासीच्या वयाचा होता. त्याच्या गळ्यांत सोन्याची कंठी व कानांत सोन्याच्या कुडक्बाळ्या होत्या. त्यास इंग्लीश सरकारने वेतन करून लुटारू लोकांपासून या घाटांत वाटसरूंचें रक्षण करण्याकरिता आता ठेवला आहे. या घाटांत व आसपास चोरी चपाटी व लूट झाली असता त्याची जबाबदारी त्याच्या माथ्यावर आहे. तो येथे पूर्वीपासून आपल्या जातीचे लुटारू व मारेकरी यांजवर आपली देखरेख ठेवतो.

पहा इंग्लीश लोकांचें कसें शहाणपण तें ! चोरांच्याच हाताने चोरांचा बंदोबस्त. काट्यानेच काटा काढण्याचें चातुर्य तें हें ! आपण राजे व सरदार असता दरसाल मुलुखावर स्वारी करून भिल्लाप्रमाणें लुटून वैराण करू लागलो तर आपल्या हातून भिल्लांचा बंदोबस्त कसा व्हावा ? शेपन्नास भिल्ल धरून त्यांची दावण बांधून त्यांच्या माना कापल्याने त्यांचा बंदोबस्त कसा होतो ? हीच पूर्वी राजाकडून अनाडी व गरीब लोकांचा बंदोबस्त ठेवण्याची रीत होती. त्यास कामकाजें व वेतनें देऊन राजी राखण्याची रीत अगदी नव्हती. ती रीत शहाण्या इंग्लीश लोकांनी चालविली."

४

## जावरा येथील वास्तव्य

जावरा संस्थानचे नबाबास शिकविण्याकरिता नोकरीवर रुजु झाल्यावर दादोबा नबाबाविषयी लिहितात (१०५).." जावऱ्याचे नबाब सुमारे चौदा पंधरा वर्षांच्या वयांत असून फार देखणे मुलगे होते. भुवया दाट

व कमानदार, डोळे मोठे चंचल आणि केतकीच्या वर्णासारखा त्यांचा वर्ण गोरा होता. मलाही त्यांचा तो चंचलपणा व खुबसूरत पाहून आनंद वाटला. कारण चंचल मुलगे बहुतेकरून बुद्धिमान असतात. मग शेखजींशी व नबाबसाहेबांशी काही इकडल्या तिकडल्या गोष्टी होऊन दोनतीन दिवसांच्या आत नबाबसाहेबांचा मजपाशी नित्य पढण्याचा दिवस मुक्रर झाल्यावर मी रुखसत मागितली आणि बिऱ्हाडी आलो. "

## ५ गुजराथेतले नागरलोक.

गुजराथेतल्या नागर लोकांबद्दल दादोबा लिहितात (१९२.१९३)

" हे मेहेते नागर मोठे दरबारी व फारच देखणे असतात. यांच्या बायका तर अति लावण्यवती व बहुतकरून सडपातळ असतात. यांचा पेहराव स्वयंपाक व गर्बे तर फारच सुंदर आणि मधुर असतात, व या बायकाही मोठ्या चतुर असतात. पुऱ्या तर नागरांच्याच खाव्या. त्या इतक्या मुलायम असतात की एकेक आसामी सत्त्यास पन्नास पाऊणशे पुरी खातो. सुरतेंत असता मला यांजकडेस जेवणाचा फार प्रसंग येत असे. अशी सुंदर पक्वान्नें तर मी कुठेच जेवलो नसेन. यांच्या बायकास बहुधा लिहिणें वाचणें येत असते. नागरिणी या नागकन्याच खऱ्या आणि नागर हे मोठे आर्जवी कार्यसाधक गोडबोले असे असतात. यांजपासून आपल्या जातीशिवाय इतर जातीच्यास आश्रय मिळणें फारच दुर्मिळ. हे गुजराथ देशातले शुद्ध चित्पावन समजावेत. सुरतेंत माझा सहवास याच लोकांबरोबर फार होता. त्या देशांत व काठेवाडांत मोठे दिवाण, मुत्सद्दी व कारकून हेच लोक बहुधा असतात. नागर हे शंकर आणि नागरिणी या गौरी ..., रमाशंकर, शिवशंकर, पार्वतीशंकर, गिरिजाशंकर, नर्मदाशंकर, दिनमणीशंकर, जटाशंकर ही पुरुषांची नांवे आणि शिवगौरी, हरगौरी, ललितागौरी, विजयागौरी, लक्ष्मीगौरी हीं स्त्रियांचीं नांवें. "

* १० *

आमच्या आयुष्यांतील

आठवणी

## १ न्यायमूर्ती रानडे यांचें बाल्पण.

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या जन्माबद्दल रमाबाई लिहितात .....

" स्वतःचा जन्म माघ शुद्ध ६ शके १७६२ म्हणजे तारीख १८ जानेवारी १८४२ रोज मंगळवार या दिवशीं संध्याकाळीं झाला.

स्वतःस तेरावें वर्ष लागताच मोरोपंत दांडेकर नांवाच्या वाईतील एका कुटुंबवत्सल सद्गृहस्थाची मुलगी सखूबाई इच्याशीं सन १५५४ मध्यें स्वतःचा विवाह झाला.

१८५९ सालीं मुंबई युनिव्हरसिटीची मॅट्रिक्युलेशन परीक्षा पास झाले. मॅट्रिक्युलेशन परीक्षेपासून स्वतःचा नंबर पुढील सर्व परीक्षेंत पहिला असे. १८६१ सालीं स्वतःची लिटलगोची परीक्षा होऊन १८६२ सालांत बी.ए.ची परीक्षा पास झाली व त्याच सालीं इतिहास व अर्थशास्त्र या विषयांची ऑनर्सची परीक्षा होऊन सोन्याचें पदक व दोनशें रुपयांचीं पुस्तकें बक्षीस मिळालीं. आणि १८६४ सालांत एम.ए.ची डिग्री मिळाली. पुढे स्वतःच्या एल्.एल्.बी.च्या परीक्षा ऑनर्ससुद्धां पास होऊन त्यांतही नंबर पहिला आला. या पूर्वी एल्फिन्स्टन कॉलेजांत इंग्लिश शिकविण्याचें जें काम केलें त्याबद्दल त्या कॉलेजचे प्रिन्सिपॉल मि. चॅटफील्ड, इतर प्रोफेसर व विद्यार्थी यांनी मिळून एक तीनशें रुपयांचें सोन्याचें घड्याळ दिलें आहे. "

*** +++ ***

## : आईनें सांगितलेल्या गोष्टी :

आपल्या माहेरची थोडीशी माहिती सांगताना रमाबाई रानडे लिहितात ( १९ ) " माझ्या आईनें पूर्वयात बराच जाच सोसला. पण आपल्या मर्यादेच्या वागणुकीने व शांत आणि सोशिक स्वभावाने तिने त्यांची मर्जी सदोदित संपन्न ठेविली. तिची समजूत अशी असें की बायकांचा देव व गुरु सर्व काही पति आहे. म्हणून तिने गुरुमंत्रही माझ्या वडिलापासून घेतला होता, व त्याचा ती मोठ्या निष्ठेने जप करी. ती आम्हा मुलांशी फार मोकळ्या मनाने अगदी प्रेमळ मैत्रिणीसारखी वागे. दररोज संध्याकाळी पुराण आटोपल्यावर आम्हा सर्व मुलांना बोलून मोकळ्या अंगणांत बसे व पुराणांतील देवादिकांच्या कथा व कहाण्या सांगे. हें पाहून आमच्या आत्याबाई थट्टेने म्हणत " आमच्या उमावहिनीला वाटतें की आपली मुलें फारच शहाणी आहेत. आपण सांगितलेल्या पुराणांतल्या गोष्टी त्यांना सगळ्या समजतात. येवढ्याल्या कथा त्यांना काय सांगत बसतेस? मोठ्या माणसांच्या सुध्दा त्या लक्षांत रहायला कठीण पडतात. " तेव्हां ती म्हणे " मला त्या कुऱ्या मांजरांच्या गोष्टी येत नाहीत मी काय करूं? तुम्ही सांगा पाहिजे तर. पण मला वाटतें की चांगलें बीं आपलें पेरीत असावें. जशी जमीन मिळेल तसें तें मूळ धरील. यामुळें निदान आपल्या तोंडाने तरी रोज देवादिकांच्या कथांचा उच्चार होऊन आपल्याला पुण्य लागेल तेवढेच. दुसरें काय आम्हाला घ्यावयाचें आहे ! "

" पण चमत्कार हा की त्या वेळी आम्हा भावंडांचीं वयें अनुक्रमें चार, सहा, आठ, दहा, अशा वर्षांची होती तरी पण तिनें सांगितलेल्या एकूण एक गोष्टी नुकत्या ऐकल्यासारख्या आम्हाला वाटतात. नवीन वाचलेल्या,

व ऐकलेल्या गोष्टींचा विसर पडतो पण आईने सांगितलेल्या या सर्व गोष्टी अगदी कोरल्यासारख्या स्मरणांत राहिल्या आहेत."

: ३ :

## जीभेची कधीतरी तृप्ति व्हावयाची आहे काय?

थोर पुरुषांचें थोरपण प्रत्येक बारीकसारीक गोष्टींतूनही दिसून येते. त्याचा पुढील नमुना पाहा (२१८) " एके दिवशी पुष्कळ दिवसांत न मिळालेली अशी काळी द्राक्षें उत्तम मिळालेली होती. स्वतःला द्राक्षें फार आवडत असत. म्हणून मी दहाबारा द्राक्षें बशींत घालून मुलद्धींकरितां ठेविली. पण जेवण झाल्यावर यापैकी पांच सहा द्राक्षें खाऊन बाकीची तशीच वगळून ठेविली. हें पाहून मी म्हटलें " द्राक्षें आज फार चांगली मिळालीं आहेत, व तीं आज किती दिवसांनी तरी मिळालीं आहेत. मग त्यांतील वगळावयाचीं काय म्हणून? तेवढी तरी खावीत. "

तेव्हां म्हणाले "तुझा स्वभाव चमत्कारिक आहे. पुष्कळ खावें पुष्कळ खावें असें तुला वाटतें. पण असें पुष्कळ खाल्ल्या पिल्याने जिभेची कधीतरी तृप्ती व्हावयाची आहे काय? तृप्ति करण्याच्या नादीं लागलों तर तिची तृप्ति एकीकडे राहून लालसा मात्र अधिक वाढेल. हीं मी माझीच गोष्ट सांगत नाहीं. पण प्रत्येक माणसाने या संबंधी थोडे बहुत नियम ठेवावेत हे चांगलें." असें सहज म्हटलें.

: ४ :

## चांगल्या गोष्टी करण्यास फार कष्ट पडतात.

चांगल्या गोष्टी मोठ्या प्रयासाने साध्य होतात असें न्यायमूर्तींचें म्हणणें आहे. (२२०, २२१) "तेव्हां स्वतः म्हटलें " अग आवडत नाही कोणाला ?

चांगला पदार्थ असला म्हणजे कोणालाही आवडणारच. मी सुध्दा आंब्याच्या फोडी खाल्या नाहीत काय ? "

तेव्हा मी म्हटलें " याचेंच मला नवल वाटतें की आंब्यासारखी वस्तु पचण्यास फार अवघड नाही. प्रकृतीही यावेळी चांगली आहे. शिवाय आंबे उत्तम असून मित्राकडून आलेले आहेत. इतक्या सगळ्या बाजू चांगल्या असून फक्त दोनच फोडी खाल्या ना ! या साऱ्या फोडी एकाच आंब्याच्या आहेत. आजच्या दिवस तेवढ्या सगळ्या खाल्या असत्या तरी चाललें असतें. मी चाखून पाहिला तेव्हाच माझ्या मनांत आलें की आजचा आंबा फार आवडेल व कदाचित् आणखीही मागणे होईल. "

तेव्हा म्हटलें " फळ खरोखरच चांगलें आहे. म्हणून मी मुद्दाम राखून ठेवलें आहे. तूं खा आणि मुलांना दे. आणखी एकदोन फोडी सहज खाल्या असत्या. पण आज मी माझ्या जिभेची परीक्षा पाहिली. लहानपणीं आम्ही मुंबईस शिकत होतों. आमच्या शेजारच्या खोलींत मायदेव नावाचा मित्र व त्याची आई अशी दोघे असत. त्याचें घराणें पूर्वी फार संपन्न होतें. खाल्लीं प्यालेलीं तीं माणसें होतीं. पण त्याचा तो काळ आता राहिलेला नव्हता. मायदेवाचा बाप वारल्यावर त्याचें इनाम होतें तें खालसा झाल्याने त्यांची अतिशय ओढ झाली होती व या वेळी तर या मायलेकांना पंचवीसतीस रुपयांच्या स्कॉलरशिपवरच निर्वाह करावा लागत असे. ही बाई पहिली श्रीमंती भोगलेली होती. तिला हे दिवस फारच कठिण असत. ती एखादे वेळेस मुलाने भाजी आणली नसली तर मोठ्याने आमच्या देखत म्हणे की ' ही जीभ मोठी सोकावलेली आहे. मी तिला पुष्कळ सांगतें की सात आठ भाज्या, सात आठ कोशिंबिरी, दोन तीन पक्वान्नें वाढलेलें ताट व त्याच्याच शेजारी शिकरण, तूप, खीर, मठ्ठा,

वौरैनी भरलेल्या वाट्याचे दिवस आता गेले. त्यांची आठवण काढून आता काय उपयोग ? पण नाही, चारसहा पदार्थ केल्यावाचून तिचे चालतच नाही व माला तर भाजी सुध्दा आणण्याचा कंटाळा ! याचें आपलें चालतें भाजीशिवाय, पण माझें चालत नाही, इत्यादि बोलायाची. यावरून पहा की जिला सवड दिल्याने एकदा का तिची चटक वाढली म्हणजे दिवस अनुकुल नसले तरी अगदी आवरत नाही. या करिता मनुष्याने चालतील त्याच सवयी ठेवाव्यात. म्हणजे कोणतीही स्थिती जड जात नाही. नाही तरी प्रत्येक मनुष्याने जसजसे वय होईल व समजू लागेल तसतसे आपल्या मधील पशुवृत्ति कमी करण्याकडे व दैवी गुण वाढविण्याकडे आपल्या मनाचा ओढा ठेवावा. चांगली गोष्ट साध्य करण्यास फार कष्ट लागतात म्हणून तिच्या साहास आपल्याला थोड्या बहुत तरी यमनियमांचे अवलंबन करावें लागतें. "

| | |
|---|---|
| १ | आपण जर ईश्वराचे अंश आहोत ... |

ईश्वरावर दृढ श्रध्दा ठेवून चांगल्या कामासाठीं त्याचें सहाय्य मागावें असें न्यायमूर्ति रानडे सांगतात. ( २२१.२२२ )

"दिवसभर काम करून निजतेवेळी आज आपल्या हातून चांगली कामें किती झाली ! याचा ताळा आपल्या मनाशी पहावा. तेव्हां मी म्हटलें " एवढासा नियम धरला तरी त्याचा केवढा बोभाटा होतो. "

तेव्हां म्हटलें " तुम्ही बायका मुली लोकांना कळण्याकरिता व भूषणाकरिताच चातुर्मासांत हे नियम करता. अशा गोष्टी करावयाला अमुकच दिवस कशाला पाहिजे ? मनांत येईल तेव्हा न बोलता त्या कितपत साधतात

तें पाहावें. ह्या गोष्टींचा बोभा न करता मुकाट्यानें करता येतात. रोज थोडथोड्या तरी या गोष्टी करावयाच्याच असा आपण मनाने निश्चय केला म्हणजे त्या उशीरा तरी साध्य होतीलच. दुसऱ्याच्या या असल्या गोष्टी कदाचित् लक्षात आल्या तरी त्यांचा इतका बोभाटा व वाच्यता कां करावी फार झालें तर एकीकडे विचारावें. असल्या गोष्टी सगळ्यांच्या देखत व सदोदित बोलण्याच्या नसतात. दिवसभर काम करून निजतेवेळीं आज आपल्या हातून चांगलीं कामें किती झालीं यांचा ताळा आपल्या मनाशी पहावा. चांगलीं कामें वाढविण्याकडे मनाची प्रवृत्ती ठेवावी व वाईट कामें न करण्याचा आपल्या मनाशी निश्चय करून त्याबद्दल देवाचें सहाय्य मागावें. प्रथम प्रथम या गोष्टी जड जातात. मन इकडे खुषीने वळत नाही. पण निश्चयाने ही सवय लावून घेतली म्हणजे पुढे पुढे या गोष्टी मनाला आवडू लागतात. आपण ईश्वराचे अंश आहोंत असें जर म्हणवितों तर त्याचे गुण दिवसेंदिवस आपल्यामध्यें यावयास नकोत काय ? जे अधिकारी भाग्यवान पुरुष आहेत ते कडकडीत यमनियम व योगसाधन करतात. पण आमचें तितकें भाग्य नाही. हजारो व्यवसायात गढून गेलेली आम्ही माणसें, त्यांत कानाने व डोळ्याने अधु. तेव्हां त्यांच्या इतकें आम्हाला जरी साधणार नाही तरी आपल्या अल्प सामर्थ्याप्रमाणें बारीक बारीक कांहीतरी गोष्ट करीत असावें झालें. यांत विचारावयाचें काय ?"

***       ***       ***       ***

## ११ निवेदन

### १ तुकाराम महाराजांच्या चरित्राचा परिणाम.

धर्मानंद कोसंबी यांचा जन्म गोव्यामधील सासष्ट प्रांतातील साखवाळ या गांवीं ता. ९ ऑक्टोबर १८७६ या दिवशीं पहाटेस चार वाजण्याच्या सुमारास झाला. आईचें नांव आनंदीबाई व वडिलांचें नांव दामोदर असें होतें.

धर्मानंदांना वाचनाचा नाद लागला तेव्हां ते लिहितात (१३.१४)

" वाचनाचा मला फारच नाद लागला. पण पुस्तकांचा पुरवठा आमच्या खेडेगांवीं पुरेसा कोठून असणार ? मुद्राराक्षस वगैरे सर्व पुस्तकें वाचून संपलीं. आता पुढे काय करावें अशा विवंचनेत पडलो. घरांत इंदु प्रकाश छापखान्याने प्रसिद्ध केलेली एक तुकाराम महाराजांच्या गाथेची प्रत पडली होती. माझी बहीण तीतील अभंग कधी कधी वाचीत असे. ती मी सहज वाचावयाला घेतली. अभंग त्या वेळी मला फारसे आवडले नाहीत. पण आरंभीच्या तुकाराम महाराजांच्या चरित्राने माझ्या मनावर इतका पगडा बसविला की तें चरित्र मी कित्येक वेळा वाचलें, व त्यांतील काही अभंग पाठ केले. या चरित्र वाचनाने माझा रोग बरा झाला. मी निर्धन म्हणून शोक करतों, पण तुकाराम बोवांचें तर दिवाळेंच निघालें होतें. मी अविद्वान् म्हणून शोक करतो पण तुकोबांना माझ्या दशांशाने देखील विद्येचीं साधनें उपलब्ध नव्हतीं. प्रपंचामध्यें मजहून अधिक अडचणी असता परमार्थामध्यें तुकोबांनी केवढी आघाडी मारली होती ! विद्या आणि धन हीं जरी मिळविता न आलीं तरी तुकोबांच्या अंगचे -

सद्गुण प्रयत्न केला असता मिळविता येणार नाहीत काय ! एकांतांत बसून माझ्या विचारांना मी दृढता आणू लागलों."

: २ :

## अज्ञानासारखी भयंकर गोष्ट जगांत दुसरी नाही

धर्मानंद कोसंबी यांनी मुलांना उपदेश केला आहे. त्यांच्या डायरीतील पुढील उतारा पाहा (२५. २६) " मुलांनो तुम्हास माझ्या मागे काही राहावें असा माझा उद्देश आहे. तुम्हास ठेवावयास माझ्यापाशी संपत्ती तर नाही. तेव्हा या जगातील अत्यल्प अनुभव तुम्हां करिता टिपून ठेवतों. त्याचा तुम्ही चांगल्या त.हेनें उपयोग करावा असा माझा हेतु आहे. ही वही कालचक्राच्या फेऱ्यांतून टिकल्यास तुमच्या प्रौढपणी तुम्हास सापडेल. तेव्हा मी लिहिलेलें टिपण व इतर विषय तुम्ही वाचून पाहावें. त्यांत तुम्हास कित्येक ठिकाणी संसारोपयोगी गोष्टी दिसून येतील.

मुलांनो तुम्हाला जरी चांगले पालक मिळाले नाहीत तरी तुम्ही तुमच्या मुलांचे चांगले पालक व्हावे असें मी मनापासून इच्छितो. तुम्हास जरी तुमच्या पालकांनी योग्य उद्योग शिकविला नाही तरी तुम्ही तो आपल्या बुद्धीने शिकावा. योग्य मार्गानें जाऊन तुमच्या मुलास व मित्रमंडळीस तुम्ही कित्ता द्यावा आणि आपणापेक्षा अज्ञान व गरीब अशा लोकांस तुम्हाकडून सहाय्य व्हावें अशीही माझी मनापासून इच्छा आहे.

पहिली गोष्ट म्हणजे आपल्या पालकांच्या अज्ञानाने तुम्हास योग्य शिक्षक न मिळाल्यामुळे तुम्ही अज्ञान रहाल ही होय. अज्ञानासारखी दुसरी

भयंकर गोष्ट या जगांत नाही म्हटलें तरी चालेल. दुसरी गोष्ट कल पाहून कला शिकविली नाही तर सारा घोटाळा होईल. मी माझ्या तीर्थरूपास मला संस्कृत शिकविण्याविषयी सांगत असताही त्यांनी मनावर घेतलें नाही. तिसरी गोष्ट कुसंगती. पालकांनी जर तुम्ही कोणत्या सोबत्याबरोबर फिरता याची नीट चौकशी राखली नाही तर कुसंगतीचे वाईट परिणाम तुम्हास भोगावे लागतील. भलत्याच वेळी तुमच्या मनांत कामविकार उद्भवतील. तुम्हास गुडगुडी सारखें व्यसन लागेल. अशा कित्येक गोष्टी ज्या पुढील आयुष्यांत त्रासदायक होतील त्या तुम्हास लागतील. चौथी गोष्ट बालविवाह. तुमचे पालक अज्ञान असून त्यांना थोडेसें जर द्रव्यसहाय्य असेल तर ते तुम्हाला बालपणातच विवाहपाशांत बद्द करतील. विवाह झाल्यावर तुम्ही जरी लहान असला तरी सासरची मंडळी तुम्हाला बहुमान देतील. त्या योगें तुम्हाला वृथागर्वाची बाधा होण्याचा संभव आहे."

## २ भक्तीवाचून कोणतीच देवता प्रसन्न होत नाही

विद्या मिळविण्यासाठी विद्येविषयी तळमळ लागली पाहिजे असें धर्मानंद कोसंबी सांगतात (२७) "मुलांनो तुम्ही प्रौढ झाल्यावर जर अज्ञान असाल तर त्यायोगें तुम्हांस फारच वाईट वाटेल. आपलें अज्ञान घालवावें असें तुम्हास वाटेल. पण तुम्ही दृढनिश्चयी नसाल तर तुमच्या हातून तुमचें अज्ञान दूर होणार नाही. कित्येक माणसांनी आपल्या प्रौढ पणी विद्या शिकण्यास आरंभ केला. पण तो फारच थोड्यांच्या हाताने शेवटास गेला. असें कां बरें व्हावें? कोणी म्हणतात बाळपण हेंच विद्या शिकण्यास योग्य आणि ते बहुतेक अंशी खरें आहे.

यावरून असें मात्र म्हणता येत नाही की तरुणपणीं मुळीच विद्या येणार नाही. तरुणपणीं विद्येची आवड असून विद्या न येण्याचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे लाज हें होय. ' मी एवढा थोर झालों आता काय शिकणार ?' अशा त-हेच्या विचारांनी आपलें मन विद्येपासून मागें हटतें. ज्ञान प्राप्तीला पहिल्याने विद्यादेवीची अत्यंत भक्ति जडली पाहिजे. भक्तीवाचून कोणतीच देवता प्रसन्न होत नाही. हें तुम्हांला ठाऊक असेलच. या शिवाय तुम्ही लज्जा टाकली पाहिजे. विद्यादेवीच्या भक्तींत विघ्न करणारी लज्जा ही आसुरी आहे असें समजा. सत्य व हितकारी गोष्टींत लज्जेस हात घालू देणे म्हणजे दुःख विकत घेणें असें समजा. लज्जेचा वाईट कृत्याकडे उपयोग करा. म्हणजे ती करण्यास लाजा. ज्ञान संपादन करण्याची मर्यादा म्हटली म्हणजे मरण हीं होय. मरणापर्यंत ज्ञान संपादून करण्यांत अंतर पडू देऊं नका. "

४

## रिकामपणासारखें दुसरें पाप नाही.

धर्मानंद कोसंबी यांचें म्हणणें असें की माणसाने कधीही वेळ रिकामा घालवू नये (२०) " आपण अज्ञान आहों तों पर्यंत आपल्या आईबापांच्या आज्ञेत राहावें; नंतर शेवटपर्यंत त्यांना मान द्यावा. त्यांना दुखवू नये. अंधपरंपरेने चालत आलेल्या ज्या दुष्ट चाली असतील त्या वेळाशक सोडाव्यात. दुसऱ्यास दुःख न होईल अशारितीने आपला धंदा चालवावा. कधी रिकामे राहू नये. रिकामपणा सारखें दुसरें पाप नाही. ऋणको होऊं नये. ऋणको आपली उन्नति कधी करू शकत नाही. "

धर्मानंद कोसंबी यांनी महाराष्ट्रांतून निघतांना बुद्ध धर्माचें ज्ञान

मिळवायचें आणि नंतर तें मराठी बोलणारांना द्यावयाचें असा निश्चय केला होता. ब्रम्हदेश, नेपाळ, सिलोन इत्यादि ठिकाणी मोठा खडतर असा प्रवास धर्मानंदांनी केला. या प्रवासांत मंडाले येथे असतांना ते पुढील माहिती सादर करतात.

( १६६.१६०. )

५

## कायदा सर्वांपेक्षा उच्च आहे.

कायद्याचें पालन करणें हे प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य आहे. कारण कायदा हा सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे. या विषयीं पुढील उतारा पहा.

" मंडालें येथे मी ऊ त्रिलोक या नांवाच्या स्थविराच्या आश्रमांत रहात असे. त्याला पाली भाषा शुध्द बोलता येत असे, व सुदैवाने त्याचे उच्चारही आमच्याच सारखे असत. आपलें व्रत पाळण्या विषयीं त्याची फार ख्याती असे. एखादा भिक्षु सकाळी उशीरा उठला तर तो म्हणत असे कीं " मंडाले शहरांतील लहान लहान पोरी पहाटेला उठून तुमच्यासाठी अन्न शिजवीत असतात. आणि तुम्ही त्या अन्नावर निर्वाह करुन खुशाल झोपा घेता. याची तुम्हाला लाज वाटाव्यास पाहिजे."

"उशीरा उठणाऱ्या भिक्षूसाठी त्याने एक दंड ठेवला होता. तो असा की आश्रमांतील झाडांना त्याने पाणी घालावें, व बुध्दाच्या मूर्तीसमोर अमुक घडे पाण्याने भरुन ठेवावेत. एके दिवशी सकाळी स्वतः त्रिलोकाचार्यच हें कर्म करीत होते. तेव्हां मी म्हणालों.

" गुरुजी आज आपण दंडकर्म करीत आहा हें काय ? "

ते म्हणालें " आज मी उशीरा उठलों म्हणून हें कर्म करीत आहे." ,

मी म्हणालो " पण हा नियम आपण शिष्यांना पाळण्यासाठी केला आहे. तो आपणा स्वतःस कसा लागू पडेल ? "

आचार्य म्हणाले " आयुष्मन आपण जो कायदा करतो तो मोडण्या साठी नव्हे. जो पर्यंत चांगल्या कायद्याला मान देऊन आपण चालतो तो पर्यंतच आपली उन्नति होते. कायदा आपणा सर्वांपेक्षा उच्चस्थानी आहे असें समजून त्या प्रमाणें आम्ही सर्वांनी मनःपूर्वक वागलें पाहिजे. "

*** *** ***

१२

# आत्मवृत्त

## १ बाबा हरकसबी गृहस्थ होते.

डॉक्टर धोंडो केशव उर्फ अण्णासाहेब कर्वे यांचे वडील मेहनती गृहस्थ होते. त्याबद्दल ते म्हणतात (१) " बाबा हरकसबी गृहस्थ होते. काथ्याचा पिळवा काढून त्याचें सुंभ तयार करणें व त्यांचीं गुरांचीं दावीं, रहाटाच्या माळा वगैरे वळणें, यांत ते चांगले वाकबगार होते. यांना चित्रें काढण्याचीही हौस असे. हे पागोटीं चांगलीं बांधीत. मुंबईला जाऊन पगडबंदाचा धंदा करावा, असेंही एकदां यांच्या मनांत आलें होतें, पण तें त्यांनी केलें नाहीं. बाबा मुरूडला आले म्हणजे लोकांचीं पागोटीं बांधून देण्याचें त्यांना एक मोठें काम असें. ते पागोट्या बद्दल कधीं कोणाकडून पैसे घेत नसत, व नकाराचें उत्तर देऊन ते कधीं कोणाचें मन दुखवीत नसत. त्यावेळीं हल्लींच्या सारख्या मुलांनी टोप्या घालण्याचा प्रघात नव्हता. आठ दहा वर्षांचे मुलगे सुद्धां लग्नामुंजींना पागोटीं घालून जात. लहान मुलगे बाबांकडे पागोटीं घेऊन यायाचे, तेव्हां त्यांशीं गोड बोलून त्यांनीं तीं त्यांना बांधून द्यावयाचीं. त्यांच्या कामांत अंगचोरपणा बिलकूल नसे. कोणतेंही काम ते मनापासून चांगलें करीत. आई आणि बाबा यांना कामाच्या आणि काटकसरीच्या उत्तम सवयी लागल्यामुळें यांचा सर्व जन्म सुखांत गेला. माझे वडील बंधु, दादा आणि मी यांना शाळेंत घालणें जेव्हां भाग पडलें, तेव्हां मुरूडचें वडिलोपार्जित जुनें घर मोडून पार नाहींसें झालें होतें, म्हणून त्यांनी चारशें रुपये खर्चून मुरूडला आपल्या ठिकाणांत नवीन घर बांधलें व त्यांत आईला व आम्हां तिघां भावंडांना आणून ठेवलें. हेतु हा कीं आमच्या शिक्षणाची हयगय होऊं नये. दरसाल पंचवीस रुपये वेतन आणि मुरूडच्या जमिनीचें वगैरे सालीना

---

(१) ' आत्मवृत्त ' - १९१५ - धोंडो केशव कर्वे पृष्ट ५४

वीस पंचवीस रुपयांचें उत्पन्न एवढ्या प्राप्तींतून घर बांधण्याला चारशें रुपये शिल्लक टाकणाऱ्या गृहस्थाचें धोरण आणि दूरदर्शीपणा हीं किती असली पाहिजेत हें कल्पनेनेंच जाणलें पाहिजे. "

## २ माझा सार्वजनिक कामांतला पहिला धडा.

आपल्याला सार्वजनिक कामाचा धडा लहानपणापासून मिळाला या बद्दल अण्णासाहेब म्हणतात (८०)" देशकार्याचें बाळकडू पाजणारे माझे गुरुजी सोमण मास्तर होत. आमच्या गांवीं दाजी बाळ नांवाचे एक गृहस्थ मोठे हुशार, कर्तबगार, सरकारी दरबारी कामांत शहाणे असे असत. त्यांजकडे बरीच वर्तमानपत्रें येत. यांचा व गुरुजींचा बराच स्नेह जमला. मी रिकामा असल्यामुळें वर्तमानपत्रें वाचणें हा एक माझा वेळ घालविण्याचा मार्ग झाला. वर्तमानपत्रांतील कांहीं निवडक भाग गांवांतील लोकांना वाचून दाखविला असता त्यांना सार्वजनिक प्रश्नांची बरीच माहिती करून देता येईल असा विचार गुरुजींच्या मनांत आला, व या कामावर त्यांनीं माझी योजना केली. गुरुजींचा मी अगदी आवडता शिष्य होतों. ते सांगतील तें काम मी बिनहरकत करावयाचा. या आमच्या संबंधामुळें लोक व इतर विद्यार्थी मला थट्टेने ' कल्याण ' म्हणत. गुरुजींना अर्थात् ' रामदास ' म्हणत. पुढे आमचे आम्हीच परस्परांमधील पत्रव्यवहारांत त्या नांवांनीच सह्या करूं लागलों. श्री दुर्गादेवीच्या देवाल्यांत लोकांची दर्शनाला जाण्याची वेळ सायंकाळीं पांच वाजल्यापासून दिवे लागण्या पर्यंतची असे. या वेळीं मी वर्तमानपत्रें घेऊन देवळांत बसावें आणि वाचनाला सुरुवात करावी, व येणारा जाणारांनीं वाटल्यास कांहीं वेळ बसून ऐकावें असें चालत असे. हा क्रम महिन्या दोन महिन्यापलीकडे चालला नाहीं. पण हा माझा सार्वजनिक कामांतला पहिला धडा होता. "

## २ भित्रेपणाला अजून औषध नाही.

स्वतःच्या लहानपणचे भित्रेपणा विषयीचें वर्णन अण्णासाहेब किती निःसंकोच मनाने आणि सहजासहजी करतात तें पाहा. पृष्ठ (११) " मनी-स्कुलांत गेल्यावर लवकरच माझ्या भित्रेपणामुळें मजवर एक प्रसंग गुदरला. या शाळेंत दर दोन महिन्यांनी परीक्षा होत, व परीक्षेच्या नंबरा प्रमाणें स्कॉलरशिपा होत्या. या दरमहाच्या नसून प्रत्येक परीक्षेनंतर एकदा मिळावयाच्या असत. या वर्गांत आठवड्यांतून एकदा घरी कॉपी लिहून शाळेंत नेऊन दाखवावयाची असे. गणित, इतिहास, वगैरे विषयांना जसे शंभर मार्क असत तसे इंग्रजी कॉपीलाही शंभर मार्क ठेविले होते. माझें अक्षर अतिशय वाईट, त्यामुळे मला स्कॉलरशिप मिळण्यात अडथळा येईल असें मला दिसून आलें. म्हणून मी अक्षर सुधारण्याचा नेटानें प्रयत्न केला व तो काहींसा साधला. चवथ्या इयत्तेंतले स्कॉलरशिप मिळविणारे जे विद्यार्थी पांचवींत चढून आले होते, त्यांना असें दिसून आलें कीं, हा आपल्या बरोबर स्कॉलरशिपच्या कामांत चढाओढ करणार. त्यांची मजवर बारकाईची नजर होती. माझ्या पहिल्या कॉप्या फारच वाईट आल्या होत्या व त्यावर एफ (F) असा शेरा मिळाला होता व या वेळची कॉपी बरी निघून तिजवर जी (G) असा शेरा मिळाला. दोन महिन्यांतले शेरे एकत्र करून त्यांजवरून मार्क देत असत. परशुराम पंत दामले यांचे बंधु माझ्या वर्गांत होते, त्यांचें अक्षर चांगलें होतें. दामले यांनी मला कॉपी काढून दिली असली पाहिजे असा प्रतिस्पर्धी मुलांनी तर्क केला. जॉंक्सनसाहेब आमच्या कॉप्या पहात, व इंग्रजी कविता शिकवीत. कॉप्या पाहून झाल्यावर ते आपल्या टेबलावरच त्या ठेवीत व नंतर इंग्रजीच्या तासाला मुलें आली म्हणजे त्या परत देत.

मध्यंतरी ते कोठें गेले म्हणजे एखादा धीट मुलगा अगोदरच जाऊन आपणाला व दुसऱ्या कित्येक मुलांना काय शेरा मिळाला तो पाही. माझ्या एका प्रतिस्पर्धी मुलानें मला ' जी ' मिळालेली पाहिल्या बरोबर मी लबाडी केली असावी असें त्याला वाटलें व ती उघडकीला आणण्यासाठी त्यानें कंबर बांधली. इंग्रजीच्या तासासाठी मुलें जमल्या बरोबर कॉप्या परत देणार, तों हा मुलगा उठला व त्याने माझी व दामले यांची अशा दोन्ही कॉप्या जॉक्सनसाहेबांना दाखविल्या. त्यांची मुद्रा उग्र होती व ते फार कडक असल्याबद्दल मुलें बोलत नसत. त्यांनाही तसाच संशय आला व त्यांनी मला उभें केलें. त्यांच्या वर्गांत मराठी कोणी बोलावयाचें नाही इंग्रजीतच बोललें पाहिजे, असा नियम असे. मराठींत बोलावयाचें असते तरी माझ्या तोंडून शब्द निघाले असते की नसते, ह्याबद्दल शंकाच आहे ! त्यांनीं दामले यांना विचारता आपण कॉपी काढून दिली नाही असें त्यांनी सांगितलें. तथापी त्यांना तें खरें वाटेना. मी तर घाबरून गेलों व तोंडातून शब्द निघेना. साहेबांनी एका मुलाला पाठवून वेताची छडी आणविली, व अतिशय रागानें मला जवळ बोलावून हात पुढें करण्यास सांगितलें. वयाच्या एकविसाव्या वर्षी असल्या अपराधाबद्दल सगळ्या वर्गासमक्ष अशी शिक्षा भोगावी लागणार, अशा स्थितींत माझ्या अंतःकरणांत जें काहूर उठलें त्याचें वर्णन शब्दांनी करणें अशक्य आहे ! अशा स्थितींत नशीबाला बोल लावण्यासाठी मी आपल्या कपाळाला हात लावला व तोच छड्या घेण्यासाठी पुढे केला. या अंगविक्षेपाकडे साहेबांचें लक्ष गेलें व मी कदाचित् निरपराधी असेन अशी शंका त्यांना आली. ' तू पुन्हा कापी काढून दाखवितोस काय ?' असा इंग्रजींत त्यांनी मला प्रश्न केला व मी ' होय ' असें त्याचें उत्तर दिलें. तेव्हां लागलेच वर्गांत

जाऊन वर्गाच्या शिक्षकासमक्ष कॉपी काढण्यास त्यांनीं मला पाठविलें. मी घाबरलों होतों. त्यामुळें कॉपी तितकी चांगली आली नाही. तथापि पहिल्याने ज्या अगदी वाईट कॉप्या लिहिलेल्या त्याच वहींवर होत्या त्यापेक्षां कितीतरी चांगली आली. त्यामुळें कॉपी मला कोणी काढून दिलेली नसून माझी मीच काढली असें सिद्ध झालें व तो प्रसंग टळला. माझ्या अंगीं प्रसंगावधान अगदी नाही. । मी येथे कॉपी काढून दाखवितो । एवढे शब्द जर आरंभीच धैर्यानें उच्चारले असते तर सर्व काही ठीक झालें असतें. परंतु माझ्या भित्रेपणाला अजून औषध मिळालेलें नाही. "

## ४ मन कठोर बनविण्याचा गुण.

विशेष कठिण प्रसंगीं मन कठोर बनविण्याबद्दल स्वतःच्या आणि मातोश्रीच्या धैर्याबद्दल अण्णासाहेब काय म्हणतात तें पाहा. पृष्ठ १३७.
" राधाबाई फार थोर मनाची बायको होती. बिऱ्हाडाची जागा अगदी लहान आणि घरांत मंडळी पुष्कळ यामुळें तिला निवांतपणा अगदी मिळत नसे. दगदगीला ती कंटाळली नाही, व कोणत्याही गोष्टीबद्दल तिने कधी कुरकुर केली नाही. तिला थोडें स्वास्थ्य द्यावें असें माझ्या मनांत होतें. पण तसा योग येण्यापूर्वीच बिचारीला हा लोक सोडून जाणें भाग पडलें. ती एकदोन वेळां आजारी पडली तेव्हा तिला मुरुडला ठेविलें. त्यावेळीं लांबलचक पत्रें लिहून आम्ही एकमेकांना संतुष्ट करण्याचा यत्न करीत असूं. नंतर ती चांगली बरी होऊन मुंबईला आली परंतु पुन्हा कांही महिन्यांनीं तिला दुखण्यानें पछाडलें, तेव्हा तिला मुरुडला पाठविलें. ही आता जगत नाही

असें कळल्यावर मी तिला परमार्थपर पत्रें लिहून तिचें मन मरणाला तयार व्हावें असें करीत होतों, व त्या प्रसंगासाठीं स्वतःच्या मनाचीही तयारी करीत होतों. आमच्या कुटुंबांतील मनुष्यांमध्यें अशा प्रसंगीं मन कठोर बनविण्याचा गुण विशेष प्रमाणांत आहे. बाबा वारले त्या वेळीं आईनें विशेष प्रकारचें धैर्य दाखविलें होतें. शेवटच्या दोन दिवसांत शुश्रूषेसाठीं जरूर तेवढें त्यांच्याजवळ बसून बाकीचा वेळ तिनें देवापुढें बसून आपलें मन तयार करण्यांत घालविला होता. जेव्हा अखेरची वेळ आली तेव्हा कोणत्याही प्रकारचा आरडा ओरड न करितां ज्या गोष्टी करावयाच्या त्या तिनें निमूटपणें केल्या."

## ५. हें गूढ मनुष्याला कधीं उकलेल काय !

विधवांच्या उद्धारासाठीं अण्णासाहेबांनीं जें सत्कार्य केलें तें सर्वांना परिचित आहे. त्या विषयीं त्यांची तयारी हळूहळू कशी होत होती हें दाखविणारीं अनेक उदाहरणें आहेत. त्यांतील एक असें ( पृष्ठ १८४.१८५ )

"माझ्या थोड्याशा परिचयांतलें वयोवृद्ध भिक्षुकाचें एक सुशील घराणें होतें. ही बाई कांहीं आप्तपणामुळें त्या घरीं रहात असे. तिचा नवरा नाहीसा होऊन फार वर्षें झालीं होतीं. माझ्या अगदीं लहानपणापासून मीं तिला तशीच पाहिलेली होती. नवरा मेला की जीवंत होता हें कांहीच न कळल्या मुळें ती सुवासिनीच्याच वेषानें राहत असे. या बिचारीची कोणा नरपशूच्या कामाग्नींत आहुती पडली. असल्या पापाचें बाह्यस्वरूप बहुधा आजूबाजूला राहणाऱ्या बायकांच्या लक्षांत आधीं येतें. तसें होऊन शेजारीपाजारी कुजबुज सुरू झाली, व ती या बाईच्या घरच्या मनुष्यांच्याही कानीं गेली. अर्थात् हिला घर सोडावें लागलें. सभोंवती जिकडे तिकडे चळवळ उडून गेली. या

व्योवृद्ध भिक्षुकाच्या घरावर बहिष्कार घालण्यासाठी देवळांत गांवकी ( गांवांतील ब्रम्हवृंदांची सभा ) जमली. जो पापात्मा या कृत्याचा मुख्य चालक, तो उघडकीला आला नाही, आणि येता तरी त्याचें कोण काय करणार होतें ! त्या वृद्ध भटजींनी 'अशी बाई आपल्या घरी कांहीं महिने राहिली या पापाच्या क्षालनार्थ गांवकी ठरवील ती शिक्षा भोगावयाला मी तयार आहे ' असें कबूल केलें. व गांवकीने एक मण तेल देवाच्या उत्सवाच्या प्रसंगीं त्यानें द्यावें ही शिक्षा ठरविली. अशा रितीने या प्रकरणाचा येथे बरवर निकाल लागला, पण या कृत्याचे परिणाम ज्या एका अगर दोन जीवांना जन्मभर भोगावे लागले, त्याचा योग्य विचार करणारी गांवकी अगर देशकी कोठें आहे काय ? नसली तर अशी कोठे उत्पन्न होईल काय ? त्या बाईने आपल्या पापाचें क्षालन कोठें केलें असेल? व बिचाऱ्या अर्भकाचें काय झालें असेल ! ते तिचें तिलाच माहीत ! बा निसर्गा ! कसली अजब मोहिनी तूं जीवसृष्टींत भरून ठेवली आहेस ! आणि सुधारलेल्या मनुष्य कोटींत पापपुण्याच्या कल्पनेशीं तिचा संबंध जोडून देऊन केवढ्या दुःखपरंपरेचें अमोघ बीज तिच्या कोशांत लपवून ठेवलें आहेस ! हें तुझ्या कृतीचें गूढ मनुष्याला कधीं उकलेल काय !"

## ६ परोपकार करणें तो असा असावा

लेखनाबद्दल स्वतः अण्णासाहेब म्हणतात कीं " हा कामाची माझ्या अंगीं पात्रता नाही, व हा मी फारसा केलाही नाही." परंतु त्यांनीं जें कांही लिहिलें आहे तें 'आधी केलें मग सांगितलें ' अशा अनुभवाचें असल्यामुळें मोलाचें आणि सरळ सोप्या भाषेतलें आहे. त्यांतला हा लहानसा नमुना पहा..

पृष्ठ ( २२९ ) " दुसरा ल्हानसा लेख मुंबईला असतांनाच लिहिला.' परोपकार ' या विषयावर नरहरपंत व मी यांजमध्यें पुष्कळ वादविवाद होत असे. स्पेन्सरच्या उन्नत स्वार्थाच्या (enlightened selfishness) - बाजूनें ते नेहमी बोलत, व निव्वळ परोपकाराच्या तर्फे मी मांडत असे. या सुमाराला अमेरिकेंतील सुप्रसिध्द दानशूर गृहस्थ ॲान्ड्यू कार्नेजी यांचा या विषयावर एक निबंध वर्तमान पत्रांतून आला होता, तो त्यांनी मला दाखविला. तो मला फारच आवडला. कारण त्यांतील विचार मला तंतोतंत पटले. परोपकार करणें तो असा असावा की त्याचें पर्यवसान उपकृत मनुष्य आळशी बनण्यांत होऊं नये, शिडीप्रमाणें वर चढत जाण्याच्या कामीं त्याचा त्याला उपयोग व्हावा, हा त्यांतला सारांश होता. नरहरपंतांच्या प्रोत्साहनाने या निबंधाचें मी भाषांतर केलें, व तें त्यांनी श्रीयुत हरिभाऊ आपटे यांच्या मार्फत त्या वेळचें पुण्यांतील मासिक पुस्तक 'मनोरंजन' व 'निबंध चंद्रिका' यांत प्रसिध्द करविलें. "

+++ +++ +++

## ११ माझें पुराण.

### १ दुसऱ्याचें लेणें लाजिरवाणें.

आनंदीबाई कर्वे यांचें पहिलें लग्न झाल्या नंतरची आठवण त्या पुढील प्रमाणें सांगतात.

(१३)" मला दागिने वगैरे रीतीचे सर्व होते. त्यांत गोंडेबोरांची वेणी होती. ती माझ्या नणंदेची होती. मी मंगळागौरीसाठी गेलेली परत जेव्हा माहेरी आलें तेव्हा माझ्या हातातली काकणें व पायातले वाळे सासूबाईंनी काढून घेतले. कारण तेही माझ्या नणंदेचे होते. मला थोडेसें वाईट वाटलें. पण दुसऱ्याचें लेणें अन् लाजिरवाणें. हवें कशाला तें ? हा विचार मी मनाशीं केला व गप्प बसलें. अमुक एक दागिना नाही म्हणून मला कधीच वाईट वाटलें नाही. हें वाचून कदाचित् पुष्कळांना आश्चर्य वाटेल, कित्येकांना खोटें वाटेल. पण तें अगदी खरें आहे. कारण मला वयाच्या मानाने फार कळे. आपल्या माहेरची गरीबी आहे एवढें तरी आपल्याला मिळालें हें भाग्यच. आपण जर दागिन्यासाठी रडलो तर आईला दुःख होईल असें मला वाटे."

### २ डोळ्यांत केर गेला.

(२०)" मी लहान असल्याने कामाचा कंटाळा वाटावा व आईची आठवण होऊन अगदी रडू येई. पण तिने बजावून सांगितलें होतें की ' काही कागाळी आली तर मी तुला भेटणार नाही. मुलींना आईपेक्षा सासूच जवळची ! सासूचा ' चांगलं काम करते, असा निरोप आला म्हणजे बोलावीन.' हें मनांत ठेवून मी हौसेने काम करावें व रडू आलें तरी पाणी पुसून डोळ्यांत केर गेला असें खोटें बोलावें. "

## ३ : वहिनीचें काम दिसतेय हें

(२२) " माझ्या सासूसासऱ्या सारखी माणसें मिळणें विरळा. मला एका गोष्टीची पक्की आठवण आहे. मला लहानपणी गूळ फार आवडे आणि अजूनही आवडतो. मी नवी घरात गेलें, तेव्हां घरात गुळाच्या ढेपा होत्या. त्याचा गूळ मी नखाने खरडून खाई. म्हणून एकदा नख सुजलें. सासूने तें कारण ताडलें. तिने मला विचारलें "गूळ तुला कसा आवडतो?" मी म्हणालें " जरा चिकट " तेव्हा तिने एक लोटा घेऊन त्यात चिकट गूळ ठेवून शिंके माझ्या हाताला पोचेल असें बांधलें व "वाटेल तेव्हा त्यातला खा, म्हणजे नख दुखायचे नाही" असें सांगितलें. तेव्हा चोरी उमगल्याबद्दल मला फार लाज वाटली. गुळाप्रमाणें दूध पोहे व पाव्याची उसळ हीं मला फार आवडत. ते जिन्नस सुध्दा अंधेरी उजेडी मी खात असे. माझे दीर म्हणायचे "वैनीचेंच काम दिसतें आहे हें" सासूबाईंच्याही तें लक्षांत यायचें सारें. पण त्या तिकडे कानाडोळा करीत. अशा कैक गोष्टी."

## ४ : गेलें ओठाबाहेर तें गेलें कोटा बाहेर

पुढे लौकरच आनंदीबाई यांचे पति निवर्तले आणि त्या विधवा झाल्या. तरीही त्या बऱ्याच दिवस सासरीच होत्या. त्यावेळी त्यांच्या सासूची वागणूक किती समजूतदारपणाची होती यांविषयी त्यांनी लिहिलेला पुढील उतारा पहा

(२४)

" एखादी बालविधवा म्हणजे लोकांना एक गमतीची बेवारशी वस्तु वाटे त्यावेळी. कोणी वेडेवाकडे बोलावे, कोणी उगीचच खोडी काढावी, कोणी माझ्याकडे पाहून वाकुल्या दाखवाव्या. मला राग येई अशा गोष्टींचा. मी तें घरीं येऊन सासूबाईंना सांगे. त्यांनी मला एक गोष्ट सांगितली. " हे बघ तुझी जर कोणी गोष्ट काढली तर तूं माझ्याशिवाय ती दुसऱ्या कोणाजवळ बोलत जाऊ नकोस. हातून खरीच वाईट गोष्ट घडली तर ती बाहेर आल्यावाचून रहात नाहीं. कोऱ्या मडक्यात पाणी ओतलें की तें बाहेर दिसतेंच. तसेंच विधवेचें आहे. आपण जोरदार असलों तर पुरुष आपलें काहीएक वाईट करू शकत नाहीत. एवढी तेवढी क्षुल्लक गोष्ट लोकांना सांगू नये. दातखीळ होते आणि उगीच पसरते. म्हण आहे ना की गेलें ओठाबाहेर तें गेलें कोटाबाहेर ! "

## ५ सर्टिफिकेट मिळविण्यासाठी धडपड.

पुढें आनंदीबाईंचा डॉ. धोंडो केशव कर्वे यांचे बरोबर पुनर्विवाह झाला. नंतर त्यांना एक मुलगा झाल्यावर त्या नर्सच्या ट्रेनिंगसाठी नागपूर येथे गेल्या. त्या वेळच्या परिस्थिती आणि मनःस्थिती विषयी त्या लिहितात (६०)

" तेथें वर्गात शिकवीत तें मला लिहून घेता येत नसे. बोलता थोडेसें येई. काही डॉक्टर इंग्रजी बोलत तें तर्काने सरासरी समजे. माझी कोणतीच बाजू पुरी नव्हती. प्रसंग आला तर मुलेंबाळें वाढविण्यासाठी पैसे मिळविण्याचें साधन हातीं असावें या हेतूने मी सर्टिफिकेट मिळविण्यासाठी धडपडत होते. कारण मी पुनर्विवाह केल्याने आपल्या माणसांना अंतरले होते. आणि सर्टिफिकेट असल्यावाचून काम कोण देणार ?

तेथे वर्षभर मला बराच त्रास सहन करावा लागला. सहा खोल्यांत आम्ही बाराजणी होतो. माझा मुलगा लहान होता. मी कामाला गेले असता त्याला कोणीतरी बाळगावा लागे. तो तसा खेळकर होता आणि सगळीकडे हिंडे. डॉ. हरिस यांच्या घरीही जाई. तेही त्याचें कौतुक करीत. त्यांनी त्याला एक तुटकें थर्मामिटर दिलें होतें. तें लावून तो सर्वांचा ताप पाही. म्हणून त्याला तेथे सर्व लोक छोटे डॉक्टर म्हणू लागले. मलाही वाटे हा डॉक्टर झाला तर बरें. त्याने दवाखाना काढल्यास मलाही त्याला मदत करता येईल आणि दैवयोग असा की तो पुढे डॉक्टर झालाही. पण मला मात्र त्याला नर्स म्हणून मदत करतां आली नाही. "

## ६ ह्यांनी लग्न तरी कशाला केलें ?

आनंदीबाई नर्सचें ट्रेनिंग घेऊन पुण्यास परत आल्यावर अण्णासाहेब कर्वे यांचा एक फलटणचा मित्र आनंदीबाई कर्वे यांना नर्स म्हणून काही दिवस काम देण्यासाठी फलटणास घेऊन जाण्याविषयी म्हणू लागला. तेव्हां त्या गोष्टीला अण्णासाहेब एका पायावर तयार झाले. पण आनंदीबाई मात्र तयार नव्हत्या. त्याविषयी त्या म्हणतात (६१)

" वर्षभराने पास होऊन पुण्यास आलें. त्याच सुमारास कर्व्यांचे मित्र शंकरराव बापट हे फलटणास कारभारी होते. त्यांची बायको व मुलगी दोघीही गरोदर होत्या. तेथे नर्स नव्हती. म्हणून मी तेथे जावें असें त्यांनी सुचविलें. त्यांच्या म्हणण्याला कर्व्यांनीही दुजोरा दिला. कोणी माझ्या जाण्याची गोष्ट काढली की हे आपले मला धाडण्यास तयार असत. शंकर दहा महिन्यांचा असतांना अमेरिकेहून एक हॅमलीन नांवाची बाई ' डॉक्टरी

शिकायला पाठविता का ?' असें म्हणाली. लगेच ते तयार झाले. माझ्या मनांत आले की ह्यांनी माझ्याशी लग्न तरी कशाला केलें ? कोणीही विचारलें की ह्यांची आपली पाठवायची तयारी ! असें कां ? मी गेलेंही असते ह्यांच्या हौसेसाठी. पण कर्वे म्हणालें की 'मुलीला ठेवून जा.' तेव्हा मुलाला पुण्यास ठेवून जायचें माझ्या जिवावर आलें व मी जाण्याचें नाकारलें."

## ७ कर्वे मंडळीकडून इतरांनी घ्यावें

आर्थिक बाबतींत स्त्रीयांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे आणि तसें होण्यासाठी पुरुषांनी सहकार्य करावें असें अण्णांना वाटत होते. त्याप्रमाणें त्यांनी आनंदीबाईंना पुष्कळ स्वातंत्र्य दिलें. त्यामुळें आनंदीबाईंना आनंद झाला आणि जवळ पैसे राहिल्याने तोंड वेंगाडण्याचा प्रसंग तर कधी आलाच नाही पण त्या पाहिजे त्याला वेळी अवेळी मदत करू शकल्या. त्याविषयी त्या लिहितात. ( १२२-१२३ )

" कर्व्यांनी माझा कारभार मला करू दिला. त्यांत ढवळाढवळ केली नाही. ह्याबद्दल मी त्यांचे वेळोवेळी आभार मानतें. कर्वे जर माझ्याशी तसें वागले नसते तर हे स्वतंत्रतेचे दिवस मला दिसले नसते. मला वाटतें माझ्या सारख्या बायकांना त्यांचे नवरे स्वतंत्र वागू देत नसतील म्हणून त्यांच्या मनांत जरी दुसऱ्यांना मदत करावी असें असलें तरी सुद्धां करता येत नसेल. आपल्या बायकांचे गुण दाबून न टाकता त्यांच्या कर्तबगारीला वाव देण्याचें काम कर्वे मंडळीकडून इतरांनी घेण्याजोगें आहे."

+++ +++ +++

## ८ अनुभवाचें सांगणें लक्षांत ठेवा.

आपल्या मुलांनीं मोठें व्हावें आणि नावलौकिक मिळवावा असें सर्वच आईबापांना वाटतें. तेव्हां त्या बाबतींत आनंदीबाईंनीं स्त्रीयांना जो सल्ला दिला आहे तो किती बहुमोलाचा आहे तें पाहा. (१२२)

" माझ्या मागून येणाऱ्या माझ्या पुढच्या पिढ्यांतील सुनांना, मुलींना, नातींना माझें सांगणें आहे की 'तुम्हाला माझ्यासारखा जोडीदार मिळाला तर अंगातील गुणांना वाव मिळेल.' तुम्ही दुसऱ्यांना मदत करा. पण हें माझें अनुभवाचें सांगणें लक्षात ठेवा : नवरा कितीही चांगला असला तरी संसार चांगला व्हायला, मुलें चांगलीं निपजण्यास बायकांनीच कंबर कसून उभें राहिलें पाहिजे."

++ ++ ++

१४ । माझी कहाणी ।

१

## आम्ही सर्वच रामाचीं लेकरें.

पार्वतीबाई आठवले यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील देवरुख गावीं इ.स. १८७० सालीं झाला. ल्हानपणीं त्यांच्या आईवडिलांच्या स्वभावाबद्दल त्या लिहितात (२)

" आमची आई घरांतील सर्व व्यवस्था बघत असे. वडील किरकोळ देवघेवीचा व्यवहार करीत तरी त्यांचें लक्ष प्रपंचांत नव्हतें. त्यांचा बहुतेक वेळ नामस्मरण करण्यात जाई. आमच्या गावांत जे महार मांग लोक भाऱ्या व मोळ्या घेऊन येत असत, त्यांना आमचे वडील नियमाने घरांतील माठांत ठेवलेलें पाणी पाजीत असत व त्यांना ताक लाह्या देत. आमचे गावा पासून नदी दोन मैलावर आहे. गावांतील इतर लोक त्यांची सावली पडेल म्हणून त्यांना जवळ उभे करीत नसत. आमचे वडील मात्र महारमांगांना पाणी मिळण्यास अडचण पडते, म्हणून घरांतील रांजण त्यांच्या करिता मुद्दाम भरून ठेवीत. हे लोक भारे घेऊन आले म्हणजे आमचे घराजवळ थांबून " बाबा घरांत आहेत का?" म्हणून चवकशी करीत व त्यावेळीं वडील पूजा करीत असले तरी अर्ध्या पूजेतून उठून सोवळ्याने पाणी घालीत असत. " महारांना सोवळ्याने पाणी कसें घालता?" असें विचारलें असतां " सर्वच आम्ही रामाचीं लेकरें आहोंत. त्यांचा आत्मा पाणी पिऊन थंड झाला की आमचा होईल " असें ते म्हणत. त्यांना पाणी पाजल्यावर गूळ, भाजलेले वाटाणे व मूठ मूठ चणे देत असत व त्यांनी दिलेली ओली भाजी घेऊन त्यांच्याजवळ सुखदुःखाच्या गोष्टी सांगत असत. "

** ** **

## २ सव्वीसावे वर्षी शिकायला सुरुवात.

पार्वतीबाईंनी बराच उशीरा शिक्षणाला सुरुवात केली. तरीही दृढनिश्चय, तळमळ आणि सतत प्रयत्न यांच्या जोरावर त्यांनी खूप प्रगती केली. ( १२ )

" होम म्हणजे काय व क्लास म्हणजे काय याची मला कल्पना नव्हती. ह्या शब्दांचा मराठी अर्थ बायाने ( आनंदीबाई कर्वे यांनी ) मला सांगितला व माझे वयाचे २६ वे वर्षी मी पुण्यातील गवत्या मारुती जवळ असलेल्या देवांच्या वाड्यात होम क्लास भरत असे त्यात जाण्यास सुरुवात केली. "

## ३ संभाषणाने स्फूर्ति मिळाली.

पार्वतीबाईंची अशी शिक्षणाला सुरुवात झाल्यावर त्या बहुधा शनिवारी किंवा रविवारी अण्णासाहेब कर्वे यांचे बरोबर हिंगणे येथे जात असत. त्यावेळी रस्ता नव्हता म्हणून ते दोघे बोलत बोलत जात. अशा संभाषणातूनच त्यांना स्फूर्ति मिळाली असे त्यांनी नमूद करून ठेवले आहे. ( १४ )

" ट्रेनिंग कॉलेजचा अभ्यासक्रम पुरा करीत असतांना मी पुष्कळ वेळा शनिवारी सुटीचे दिवस घालविण्याकरिता हिंगण्यास जाऊन रहात असे. प्रो. कर्वे ( त्यांना आम्ही अण्णा म्हणतो ) यांचे बरोबर हिंगण्यास चालत जाण्याचा प्रसंग येत असे. हिंगण्याची वाट नीट नसल्यामुळे पाटाने बरेच दूर शेता मधून चालत जावे लागे. त्यावेळी अण्णा माझे बरोबर बोलण्यात वेळ खर्च करीत.

त्यावेळी हिंदुस्थानांतील विधवांची स्थिति व ती सुधारण्याकरिता काय केलें पाहिजे ह्या विषयावर बोलणीं निघत व मला अण्णांनीं विचार करून ठरविलेलीं त्यांचीं मतें ऐकावयास सापडत. अशा रितीनें अण्णा बरोबर मला जे संभाषण करण्याचे प्रसंग येत असत त्यामुळे मला मोठें शिक्षण मिळून माझे मनाची तयारी आश्रमाचें कामाकरिता करण्यात आली. मी जो पुढे आश्रमाचे आजन्म सेवक होण्याचा निश्चय ठरविला, त्याचें सगळें श्रेय गुरुवर्य अण्णा यांचे बरोबर केलेल्या संभाषणांनाच दिलें पाहिजे असें मला वाटतें."

## ४ अण्णांच्या साध्या राहणीचा परिणाम.

अण्णांच्या साध्या राहणीचा परिणाम कसा झाला या विषयीं लेखिका सांगतात. (१७) "कित्येक लोकांना मी आता पुढे काय करणार असा प्रश्न पडला तेव्हा मला मोठें नवल वाटलें. अण्णांच्या घरीं राहून मी बहुतेक बहिणींचा कित्ता लवकरच गिरविणार असें लोक म्हणत असत. पण ह्या बाबतींत माझें कोणतेच मतांतर न होता अण्णांच्या ध्येयाचा व त्यांचे साधे राहणीचा माझ्या मनावर अगदी निराळाच परिणाम होऊन एका कुटुंबाचे उपयोगी पडण्यापेक्षा माझें सर्व आयुष्य विधवांचे सेवेंतच घालवावें असें मी ठरविलें. व एकदा ही गोष्ट निश्चित केल्यावर मी त्या मार्गाला लागलें. ज्या विधवांना एक दोन मुलें आहेत व ज्यांना थोडेंतरी संसारसुख अनुभवास मिळालें आहे त्यांना कोणतेंही मोठें कार्य करणें शक्य असल्यास, त्यांची संसारांत पडण्याची प्रवृत्ति होणार नाही असें मला वाटतें."

## ५ अमेरिकेंतील स्त्रियांचा एक मोठा गुण.

अमेरिकेंत जाऊन इंग्रजी शिकावें व हिंगणे येथील आश्रमासाठीं काही,

मदत मिळवावी अशा दुहेरी हेतूने पार्वतीबाई अमेरिकेत गेल्या. तेथे त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावें लागलें. तेथील वास्तव्यात त्यांना आलेल्या अनुभवावरून त्या सांगतात ( ८७ )

" ओरेयली बाई ही मोठी मातृभक्त होती. आईचा बिछाना करणे व तिची इतर कामें ती मोठ्या भक्तीने करी. सकाळी न्हाऱ्या वेळी ओरेयली आपल्या आई बरोबर दैनिक वर्तमानपत्रातील निवडक बातम्या विषयी चर्चा करीत असे. ही चर्चा ऐकून मला दररोज वर्तमानपत्रे वाचल्याशिवाय बरीच माहिती थोडक्यात ऐकावयास सापडे. ओरेयलीने ल्हानपणापासून विवाहाचा मोह बाजूस ठेवून आपलें सर्व आयुष्य अमेरिकेतील मजूर वर्गाच्या उन्नतिकरिता अर्पण केलें होतें. ती नेहमी निराश्रित मुलांना पाळीत असे. आपलें लग्न झालें नाही म्हणून मी तिला केव्हाही दुःखीकष्टी झालेली पाहिली नाही. आमच्या देशातील विधवा नवरा मेला म्हणून व प्रौढ कुमारिकांचे पालक व नातेवाईक आपल्या मुलींचा काही कारणाने योग्य स्थळाच्या अभावी विवाह होत नाही म्हणून दुःखी कष्टी झालेले दिसतात. पण अशारितीने विवाह होत नाही म्हणून अगर विवाहाच्या नंतर वैधव्य आलें म्हणून हताश व असहाय्य होऊन अमेरिकेतील स्त्रिया व मुलींचे पालक हिंदुस्थानातील स्त्रियांप्रमाणे केव्हाही आपलें जीवन कसेंतरी घालवीत नाहींत, तर प्रसंग येईल त्याला तोंड देऊन आपलें राष्ट्रकार्य करीत राहतात. हा एक त्यांचा मोठा गुण सर्वांनी घेण्यासारखा आहे. अमेरिकेतील उदारधी व कर्त्या स्त्रियांचा एक नमुना म्हणून ओरेयली विषयी माझ्यामध्यें पूज्यभाव जो एकदा उत्पन्न झाला तो दिवसें दिवस वृद्धिंगत होत जाऊन ती मला एखाद्या अधिदेवते प्रमाणे वाटल्यास त्यांत नवल वाटण्याचें विशेष कारण नाही. "

++ ++ ++

## ६ आईने सर्वांना शिस्त लावावी

आपल्या कुटुंबातील मंडळींना आईबापानींच वळण लावलें पाहिजे. यासाठी घरातील वातावरण योग्य पाहिजे. याविषयी पार्वतीबाई काय म्हणतात तें पाहा ( ९६ )

" हल्लीच्या कित्येक कुटुंबात असें दिसतें की घरच्या गृहिणीवर घरातील शहाणे नोकर चाकर आपलाच हुकुम चालवितात. त्या प्रमाणें घरातील मुलें देखील आईचा कोणत्याच प्रकारे मान ठेवीत नाहीत. कोकणात जुन्या परंपरेने चालणाऱ्या घरांमध्यें अशी स्थिती दिसून येत नव्हती. घरातील मुलें आईला वाटेल तशी उत्तरें देऊन घरांत आरडा ओरड करतांना आढळून येतात व आपला सर्व वेळ हुतुतू हमामा करण्यात घालवितात. माझें असें म्हणणें नाही की मुलांनी सदोदित बाहुल्या प्रमाणे कोनाड्यांत बसून राहावें. आईने त्यांना ठराविक वेळेला अभ्यास व खेळ नेमून दिला पाहिजे व तसें त्यांचेकडून वागवून घेतलें पाहिजे. स्वतः आईने आपल्या अंगीं नियमीतपणा व शिस्त आणल्यास घरांतील मुलांच्या व नोकरचाकरांच्या जीवनालाही चांगलें वळण लागेल. कारण घर ही एक शाळा आहे. गृहिणी व गृहस्थ हे त्या शाळेंतील मुख्य शिक्षक आहेत. त्यांनी घरातील मुलाबाळांना व नोकर चाकरांना गृहशिक्षण द्यावयाचें आहे. स्वतः शिक्षकांनीच गांभीर्य सोडून घरातील माणसांना शिस्त लावावयाचें सोडून दिल्यास नोकरचाकर व मुलेंबाळें ह्यांमध्यें बेबंदशाही माजल्याशिवाय राहणार नाही. कित्येक ठिकाणी अशी बेबंदशाही माजलेली माझ्या नजरेस आली. पन्नास वर्षांपूर्वी आमच्या घरात आम्हाला जें शिक्षण मिळून, टापटीप व नीटनेटकेपणाच्या ज्या सवयी लावल्या जात असत तशा रीतीची व्यवस्था सध्याच्या घरांतून फारच थोड्या ठिकाणी आढळून येते. "

१५ स्मृ ति चि त्रैं

## १ विटाळ झालेल्या वस्तु सगळ्या धुवावयाच्या.

पूर्वी समाजांत सोंवळ्या ओंवळ्याचें प्रस्थ कसें होते तें पहा पृष्ट ( ४ )

" हीं जिनसा धुण्याची कामें बहुतकरून आई व आजी ह्यांच्यावर पडत. ते ( म्हणजे नाना ) सांगतील त्या जिनसा त्या धूत किंवा धुतल्याचा बहाणा करीत. मीठ, साखर, धुण्याचें काम जोपर्यंत आई किंवा आजीकडे असे, तोपर्यंत ती कधी विरघळली नव्हती ! त्या पुष्कळ वेळा या धुण्याच्या बाबतींत लबाड्या करीत व आम्हांलाहि खोटें बोलण्यास शिकवीत. त्याचें कारणहि तसेंच होतें. शेतांतून धान्य घरीं आले, कीं ते साठवावयाच्या आधीं धुतलें पाहिजे असा नानांचा कडक नियम असे. आतां वीस मण धान्य आईनें व आजीनें कसें धुवावयाचें ? त्या काय करीत, थोडेंसें धान्य धुऊन त्याचा थर सर्व राशीवर घालीत. नाना घरीं आले म्हणजे त्यांनी सर्व मुलींच्या जबान्या घ्याव्या. मुलें सारीं आधींच पढवून ठेवलेलीं असावयाचीं. तेव्हां तीं बहुत करून एकच गोष्ट सांगत. पण जर का एखादा घाबरून चुकला-म्हणजे खरें बोलला- तर साऱ्या घरांत गोंधळ सुरू व्हावयाचा ! बायकांनीं तेवढ्या रात्रीं नानांच्या नजरेखालीं विटाळ झालेल्या वस्तु सगळ्या धुवावयाच्या. पोरांनीं खोटें बोलल्याबद्दल रगडून मार खावयाचा व पोरांना मारून झाल्यावर त्यांच्या विटाळामुळें नानांनीं पुन्हां आंघोळ करावयाची. ! "

++ ++ ++

## २ तरी ते होते अगदी जागच्या जागी.

स्वतःच्या सौंदर्याविषयी लक्ष्मीबाई पुढील प्रमाणें लिहितात (पृष्ट १०) " मला नवल वाटतें तें मी टिळकांना कशी पसंत पडलें ह्याचें. माझें रूप, रंग अगदीं बेताचेच होतें, बाकी नाक डोळे जरी रेखीव नव्हते तरी ते होते व अगदीं जागच्या जागीं होते. "

## ३ थांब माझी स्नानसंध्या होईपर्यंत मरू नको.

त्या वेळी स्नानसंध्या ह्यातच पुरुषांना मोठेपणा वाटत असे. (पृष्ट ११) " पण दत्त विधानाच्या वेळी दत्तक देण्यास नाना सांपडेनात ! ते आपल्या नित्यनियमाप्रमाणें गेले होते रानांत माती आणायला. संध्याकाळ होई पर्यंत ते परत येण्याचा संभवहि नव्हता. ज्यांनीं बुद्द सख्वी आई मृत्यु शय्येवर पडली असतांना, व " नाना, नाना " म्हणत असतांना तिला निरोप पाठविला की " थांब माझी स्नानसंध्या होई पर्यंत मरूं नको !" ते लेकीच्या दत्तविधानाची थोडीच पर्वा करतात !! "

## ४ मामंजींच्या अंगात देवी येत असे.

पूर्वी अंगात देवी येणें आणि तिने सांगितलेल्या गोष्टी खऱ्या मानणें अशी पुरुषांची समजूत होती. त्याबद्दल लक्ष्मीबाई लिहितात ( १५ ) " दर शुक्रवारीं मामंजींच्या अंगात देवी येत असे. अशा वेळीं त्यांच्याजवळ घरच्या सर्व मंडळीने हजर असलें पाहिजे अशी अपेक्षा असे. जर कोणी चुकलें

तर ते फार रागावत. माझा मात्र असला प्रकार पाहण्याचा माझ्या आयुष्यातील हा पहिलाच प्रसंग होता. मी फारच घाबरले.

त्या वेळी देवीला पुष्कळ प्रश्न विचारण्यात येत व देवीहि अगदीं सरळपणें उत्तरें देत असे. सर्व आठवडांतील घरांतील कटकटींचीहि शहानिशा देवीपुढे होत असे. त्या दिवशी देवीने सांगितलें, की आतां जी मुलगी सून झाली आहे ती फार वाईट पायगुणाची आहे. हिच्यामुळे घरांत सुख व शांती नांदणार नाही. हिच्यामुळें दुसर्‍याचें वाईट होत जाईल. आत्ताच हा 'झाडाची' मुलगी वारली ती हिच्याच पायगुणाने.

देवीचे हे प्रलाप ऐकून टिळकांना फार वाईट वाटलें. देवी घुमूं लागली म्हणजे सर्वांनी तिला हळदीकुंकू व फुलें व्हावीं असा प्रघात होता. त्या दिवशी सर्वांनीं त्या प्रमाणें केलें, पण टिळकांनीं तसें कांही एक केलें नाही. ते मामंजीपुढे तसेच गप्प बसून राहिले. "

५ + सासूबाईनी राम म्हटला. +

त्या वेळी लक्ष्मीबाईच्या सासर्‍यांनी माणूसकीला सोडून कसें वर्तन केलें होतें याचा पुढील नमुना पाहा.

( २४ ) "काय ग आई ! मी काय म्हणालों ? त्यांना काही झालें नाही."

" तुझ्या तोंडांत साखर पडो, तुझे शब्द खरे झाले. आतां तूं बोलल्या प्रमाणें रहा म्हणजे मिळविली." सासूबाईच्या डोक्यावर हंडा, टिळकांच्या कडेवर महादेवभाऊजी, अशारितीने ती मंडळी निघाली.

" मी घेतो तो हंडा."

" नको, तुला तो जड होईल."

" आई, तू दमली नाहीस ?"

" काही इतकी नाही" डोक्यावर हंडा, खांद्यावर धुणे, आतां जाऊन स्वयंपाक करावयाचा असे डोक्यांत विचार. अशा त्या घरी परत आल्या. मामंजी दारा समोरच बसले होते. त्या दाराशी आल्या, " एखादा हंडा उतरावयाचा होता." हे शब्द कानी पडतांच मामंजी वाघासारखे चवताळून त्यांच्या अंगावर आले.

" मी काही तुमचा चाकर नाही." असे म्हणून त्यांनी सासूबाईंची मान धरून त्यांना मागून एक लाथ मारली. त्यासरशी सासूबाईंनी रामाला हाक मारून धरणीवर अंग टाकिलें. हें दृश्य पाहिल्या बरोबर दोन्ही मुलें कावरी बावरी झाली व त्यांनी रडावयास सुरुवात केली.

टिळकांनी महादेवभाऊंनीस खाली ठेवून आईच्या जवळ जाऊन विचारलें. " तुला लागलें का ?" आईनें हातानेंच खूण केली की ' नाही ' व तोंडानें " रामराम " म्हटलें. टिळकांनी कोरडें नेसावयास दिलें. तें कसेंबसें नेसून त्यांनी अंथरूण धरलें. टिळकांच्या मनांत पुन्हा वडिलांची काहीतरी खोड काढण्याचे येई, परंतु पुन्हा आपण आईला दिलेल्या वचनाची त्यांना आठवण होऊन ते गप्प बसत.

शेजाऱ्यांना हा प्रकार पाहून काहीच कळेना. मामंजी बाहेरच शांत बसून राहिले होते. मधून मधून ते घरांत ये जा करीत. सासूबाईंनी आठ दिवस तोंडांतून "राम" ह्या शब्दावाचून दुसरा शब्द उच्चारला नाही, की पाण्यावाचून तोंडांत कांहीं घेतलें नाही. अशा स्थितींत आठव्या दिवशी

मामंजींना विधुरावस्थेत टाकून व मुलांना जगाच्या हवाली करून त्यांनीं राम राम म्हणत प्राण सोडला. "

## ६ आणि मेलात तर तुमच्या वाचून जग ओस पडेल का ?

लक्ष्मीबाईंना सासऱ्याचा पुष्कळ त्रास सहन करावा लागला. त्याचा एक मासला पाहा. ( ४३ ) " लक्ष्मीबाई, शेणगोळा येथें भांड्यांजवळ पडला आहे, तेवढा दूर फेकून या पाहूं. "

कीं मीं जेवण दूर सारून शेणगोळा टाकून यावें. मामंजींचे नेहमीं सांगणें कीं शेणगोळा भांड्याजवळ टाकूं नका. पण मी तेंच नेहमीं विसरें. पुन्हा जेवायला येऊन बसलें, कीं हळूच त्यांनीं म्हणावें " लक्ष्मीबाई, तुळशीला पाणी घातलें का ?" कीं मीं पुन्हा उठावें. हें काम मी रोज विसरें व रोज मला जेवतांना त्या साठीं उठावें लागे.

" तुम्हाला जेवणाची कशी आठवण राहाते- जेवलां नाहीं तर मराल का? आणि मेलांत तर तुमच्या वांचून जग ओस पडेल का ? "

हा दिवसाचा कार्यक्रम. रात्रीचाहि कार्यक्रम होताच. मामंजींनीं सांगावें " लक्ष्मीबाई, तुम्ही जेवायला बसायच्या आधीं माझा बिछाना घालून ठेवा. टिनपाटांत पाणी ओतून ठेवा. विसरूं नका बरं. "

रात्रींचीं जेवणें फार उशिरा होत. मला लागे भूक. बिछाना आधीं टाकावा तर मंडळी नेहमीं बसलेली असायाची. मग टाकावा तर ओंवळें नेसून तो टाकायचा व पुन्हा सोवळें नेसून जेवायास बसायचें हा त्रास. जेवूनच

मग करावें बिछान्याचें काम, असें म्हटलें कीं तें नेहमींच अंगावर उलटे. कारण दोन घास तोंडीत पडताच मामंजींनीं नेमकें म्हणावें, " लक्ष्मीबाई, माझा बिछाना घाला पाहूं ! "

कीं उठल्याचे लक्ष्मीबाई. ओव्हळे नेसावें बिछाना घालावा व पुन्हा सोंवळ्यानें जेवायला बसावें ! "

## ७ दिवाणांच्या उंबऱ्यावरून परत फिरलें.

नागपूर जवळील राजनांदगाव या ठिकाणीं टिळकांना नोकरी होती. टिळक बरेच दिवस मुंबईला गेल्यामुळें त्यांची नोकरी राहणार नाहीं म्हणून लक्ष्मीबाईंनीं नोकरी राहूं देण्याबद्दल दिवाणांना विनंति करावी असा लोकांनीं सल्ला दिला. त्या वेळची इकीकत पुढील प्रमाणें (१६२) " गांवांत सगळे म्हणूं लागले, कीं आता टिळकांचें काम खात्रीनें जाणार. एक हितचिंतक येऊन मला म्हणूं लागले, ' बाई, तुम्हीं जाऊन दिवाणांचे पाय धरा म्हणजे तुमच्या नवऱ्याचें काम राहील. नाहींतर काम खात्रीनें जाणार. ' माझा खरा सल्लागार देव होता. दिवाणांचे पाय धरण्याला माझें मन काहीं घेईना. तरी पण लोकाग्रहास्तव मी दिवाणांच्या घरीं जाण्यास निघालें. अगदीं घराजवळ पोंचलें. तेथें मनांत विचार आला, मी दिवाणांचे पाय धरले आणि त्यानें टिळकांचें काम टिकविलें तर लोक म्हणतील, बायकोमुळें टिळकांचें काम टिकलें. हरकत नाहीं काम गेलें तरी; पण लोकांनीं टिळकांना असें काहीं म्हणतां उपयोगी नाहीं. काम गेलें तर भीक मागण्याचा तर प्रसंग येणार नाहीं. आणि आलाच तर ते भीक मागतील व त्यांच्या मागें मी पदर पसरीन. हे विचार येतांच मी अगदीं दिवाणांच्या उंबऱ्यावरून परत फिरलें."

## ८ नांव लक्ष्मीबाई, अवतार लंकेच्या पार्वतीचा.

लक्ष्मीबाईंचे यजमान नारायण वामन टिळक एकेजागी नोकरी करून फार दिवस राहात नसत. यामुळे त्यांची सांपत्तिक स्थिति यथातथाच होती. म्हणून बहिणीकडे येण्यासाठी लक्ष्मीबाई नाशिक स्टेशनवर उतरताच काय म्हणतात तें पाहा (१६६) भाग पहिला "मला एकटीला घेऊन गाडीनें नागपूर सोडलें. जवळ पैसा नाही. नाकांतल्या मुकल्याशिवाय दागिना नाही. दत्तूची बिंदली मोडून टिळकांना दोन तोळ्याची अंगठी केली होती. तीहि त्यांनी कोणाला देऊन टाकली होती व मला हरवली म्हणून सांगितलें होतें. जवळ तांब्याला सुध्दां पैसे नव्हते.

नाशिक स्टेशनवर दुपारी तीन वाजता गाडी आली. नांव लक्ष्मीबाई, अवतार लंकेच्या पार्वतीचा. फाटकें लुगडें, नाकांत बारीकसें मुकलें, हातांत टिळकांचे नांव मोठ्या अक्षरांत लिहिलेली बॅग. अशा अवतारानें मी स्टेशनवर उतरलें. दोन माणसें माझ्याकडे धाऊन आली ! मी ~~भाबऱ्या भाबऱ्या~~ धाबऱ्या धाबऱ्या त्यांच्या तोंडाकडे पाहूं लागलें. हीं अनोळखी माणसें असें काय करतात, मला कळेना. ते मला म्हणाले, "मावशी, तुम्ही आम्हांला ओळखलें नाही ! आम्ही पेंडशांकडून तुम्हांला नेण्यासाठीं टांगा घेऊन आलों आहों."

## ९ बायकोचें लग्न लावून द्या.

नारायण वामन टिळक ख्रिस्ती धर्मांत गेल्यानंतर लक्ष्मीबाईंना अनेक नातेवाईकांनी सल्ला दिला की तुम्ही टिळकांना सोडून द्या. अशाच एका

प्रसंगी त्या कशा चवताळून बोलल्या त्याचा पुढील मासला पहा. ( पृष्ठ ११ भाग दुसरा.)

" एक दिवस सखाराम भाऊजी मजजवळ येऊन बसले. इकडच्या तिकडच्या बऱ्याच गप्पा गोष्टी झाल्यावर त्यांनी हळूच टिळकांचा विषय काढला. मी निमूच हें हें करीत होत्यें. भाऊजी म्हणाले, " वहिनी तुम्ही आजारी आहां. किती तरी माणसें तुमचें करीत आहेत. तसें तिकडे नानाचें कोणी करीत असेल का ? सांगा ! तुम्ही त्यांना सूटपत्र द्या म्हणजे ते मोकळे होतील. तुमची काळजी घेणारी माणसें आहेत. ! "

हें बोलणें ऐकताच " नि त्यांना नव्हती का काळजी घेणारी?" असें म्हणून मी तटकन उठून बसलें. " आता कुठे ते बांधलेले आहेत ? सूटपत्र कशाचें देऊं? मी का पळून गेले ? का निघून गेले? जसें त्यांचे कोणी नाही तसें माझें कोणी नाही. मला पैसा नाही, विद्या नाही, मूल लहान, मी काय करणार? तुमची सगळ्यांची भीडीच घासणार की नाही? तुमची ही शिष्टाई पुरे. त्यांना पत्र पाठवा. म्हणावें आधी येऊन बायकोचें लग्न नीटनेटकें लावून द्या आणि मग स्वतःचें लग्न करा. तुम्हांला काही वाटत नाही आपण कोणाशीं बोलतों तें ? "

## १० जातिभेदाच्या साखळ्या खळाखळ तुटून पडल्या

नारायण वामन टिळक ख्रिस्ती झाल्यामुळें लक्ष्मीबाईंना फार त्रास सहन करावा लागला. तें सर्व आकलन होण्यासाठी त्यांचीं ' स्मृतिचित्रें ' मुद्दाम पहावीत. दुसऱ्याच्या हातचें पाणी प्याल्यामुळें त्यांना मनस्वी फार दुःख झालें. पण नंतर त्या दुःखमय स्थितींत असतांनाच त्यांच्या अंतःकरणात

ऐकदम प्रकाश पडल्यासारखें झालें आणि त्यांच्या मनातील जातीभेदाच्या साखळ्या खळाखळ तुटून पडल्या. त्याचें वर्णन त्यांच्याच शब्दांत ऐकलेलें बरें. ( पृष्ट ७४ भाग दुसरा.)

" मी अंथरुणावर पडल्या पडल्या उशीला न्हाऊं घालीत होतें. तीन वाजे पर्यंत मजकडे कोणी आलें नाही. टिळकांना आता फार चोरट्या सारखें झालें होतें. मी मनातल्या मनात टाहो फोडून देवाला म्हणत होतें " देवा आज मीं हें काय केलें ? आज माझे पूर्वज मला स्वर्गात काय म्हणत असतील ? ह्या पापाचें मला कोणतें प्रायश्चित्त भोगावें लागणार आहे?" अशा एक ना दोन हजारो विचारांनीं माझें मन व्यग्र होऊन गेलें होतें. त्यावेळीं माझे डोळे मिटलेले होते, परंतु एकदम प्रकाश पडल्या सारखा मला भास झाला. प्रकाश पडला म्हणजे मी काही अलंकारिक भाषेत सांगत नाही. खरोखरच सूर्य प्रकाशासारखा चक्क प्रकाश पडल्या सारखा मला भास झाला. माझी तळमळ नाहीशी झाली व पूर्वी कधीं डोक्यात आले नव्हते असें विचार आता माझ्या डोक्यात थैमान घालू लागले. टिळकांचा देवावर फार भाव. ते एकसारखे माझ्यासाठीं प्रार्थना करीत होते. दत्तूला घरांतील ह्या भीषण शांततेचा अर्थ कळेना. पण थोड्या वेळाने त्यानें आपला धंदा .. म्हणजे खेळण्याचा-सुरू केला व तो आम्हाला पूर्णपणें विसरला.

टिळकांच्या प्रार्थनेला उत्तर आलें. माझ्या मनाला जखडून टाकणाऱ्या जातिभेदाच्या साखळ्या खळाखळ तुटून पडल्या. एका चुटकीसरसें हें झालें. त्या वेळेस माझ्या मनांत आलेले विचार इतके स्पष्ट होते कीं ते मला आता जवळ जवळ आले तसे येथे टिपून काढता येतील. देवानें जाती केल्या का माणसानें ? देवानें केल्या असत्या तर माणसा माणसांत कांही तरी

फरक ठेविला असता ना ? जन्ममरण, हाडमांस, सुख दुःख हीं सर्व, सर्व मानव जातीला सारखीच आहेत ना? आणि मनुष्य प्राण्यांत जर देवाने जाती केल्या तर त्याच देवाने प्राणिसृष्टींत कां निरनिराळ्या जाती केल्या नाहीत ? ब्राम्हण बैल, शूद्र बैल, वैश्य कावळा , अतिशूद्र कावळा असले भेद पशु पक्ष्यांत कोठे आहेत ? ब्राम्हण व शूद्र ह्यांत कोठें फरक आहे ? शूद्राच्या शिरीं नंदीचें शिंग नाही कीं ब्राम्हणाच्या कपाळीं महादेवाचें लिंग नाही. स्त्री व पुरुष ह्या दोन जाती निरनिराळ्या असल्या तर आहेत. बस्स ! माझा जातिभेद गेला. आजपासून माझ्यांतला जातिभेद समूळ गेला. ह्यापुढें मी सर्वांच्या हातचें खाईन, सर्वांच्या हातचें पिईन. "

++ ++ ++

## १६ माझें क्रीडा जीवन.

हें आत्मचरित्र पी. विठ्ठल यांनी लिहिलें आहे. त्यांचे बंधु पी. बाळू हे उत्तम क्रिकेट खेळाडू होते. तसेच पी. विठ्ठल यांचाही क्रिकेट क्षेत्रातील लौकिक नावाजण्यासारखा होता. पी. बाळू यांच्या क्रिकेट कौशल्याबद्दल लेखक म्हणतात (१६)

### १ रा. बाळू यांचें बोलिंगचें कसब.

" रा. बाळू यांच्या बोलिंगच्या पद्धतींतील सहजता हा चटकन लक्षांत येण्यासारखा मोठा विशेष होता. त्यांच्या हाताची हालचाल अगदी सहज झाल्यासारखी दिसे. पण कित्येक बॉल विशिष्ट हेतूने टाकलेला असे. मंदगती डावखोरे बोलर असें त्यांचें सर्वसाधारणपणें वर्णन केलें जात असे. पण गतींत वेळोवेळी फरक करून कधीं कधीं तर मंदगतीचा आविर्भाव दाखवीत असतांनाच मध्येच एकदम जलद गतीने चेंडू टाकून ते बॅट्समनला घोटाळ्यात पाडीत असत. ' राउंड दी आर्म ' व ' ओव्हर आर्म ' अशा दोन्ही तऱ्हांनी ते बोलिंग टाकू शकत असत. आणि लेगब्रेक व ऑफ ब्रेक अशा दोन्ही बाजूंनी चेंडू वळविण्याची कला त्यांना साधलेली होती. अचूक पल्ला (लेंथ) साधण्यावर बोलिंगमध्ये विशेष भर दिला जातो. या बाबतीतही बाळूंची चेंडूवर पूर्ण हुकुमत होती. नव्या चेंडूने ते हटकून ~~विकेट~~ विकेट घेत. पण या सर्वांपेक्षाही बॅट्समनच्या खेळाची तऱ्हा पाहून त्याला कोणत्या रीतीने फसविता येईल हें चटकन ओळखण्याचें कसब त्यांना चांगलेंच साधलें होतें. कसलेल्या पट्टीच्या बॅट्समनशी लढत होण्याचा प्रसंग येई त्या वेळी उभयतांमध्ये चाललेली झटापट पाहण्यासारखी असे. हस्तकौशल्याबरोबरच बुद्धीकलाचीही चढाओढ चालल्याचें तेथे दिसून येई. "

** *** **

## २ खेळातही जातीयता.

पी. बाळू आणि पी. शिवराम हे उत्तम क्रिकेट खेळाडू होते. म्हणूनच त्यांचा इंग्लंडला जाणाऱ्या संघात समावेश झाला होता. बोटीवर चढता चढता त्यांच्या अंतःकरणाला झोंबत राहील असा एक प्रसंग घडला. त्याविषयी पी. विठ्ठल लिहितात. (१७)

"इ.स. १९११ मध्यें जो हिंदी क्रिकेट संघ विलायतेत पाठविण्यात आला होता त्या संघाला बोटीवर निरोप देण्याच्या वेळी एक विचित्र प्रकार घडला. संघातील सर्व खेळाडूंना हार घालून त्यांचा सन्मान करण्यात आला. पण या सन्मानातून दोनच खेळाडूंना वगळण्यात आले आणि हे खेळाडू म्हणजे रा. बाळू व रा. शिवराम हे होत. उच्चनीचत्वाच्या वृत्तीमुळें म्हणा अथवा इतर काही कारणामुळे म्हणा हा जो प्रकार घडला तो माझ्या अन्य बंधूंना साहजीकच जाणवल्यावाचून राहिला नाही. पण या निरोपाच्या वेळी साध्या फुलांचे हार त्यांच्या गळ्यात पडू शकले नाहीत तरी विलायतेत त्यांच्या कर्तृत्वामुळे त्यांच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षावच झाला."

## ३ क्रिकेटला अत्यावश्यक गुण.

क्रिकेट हा आता आंतरराष्ट्रीय खेळ झालेला आहे असें म्हणायला हरकत नाही. निदान हिंदुस्थानांततरी या खेळाची लोकप्रियता हळूहळू वाढतच आहे. अशावेळी क्रिकेटरच्या ठिकाणि कोणते गुण आवश्यक आहेत याची पी. विठ्ठल यांनी केलेली चर्चा खचित उपयोगी पडेल. (२९)

"उत्कृष्ट क्षेत्ररक्षण हे शिवराम यांच्या क्रिकेटगुणांपैकी मुख्य वैशिष्ट्य होते. किंबहुना हा गुण आम्हा सर्वच बंधूंना कमी अधिक प्रमाणांत साध्य होऊ शकला होता. आणि याचें कारण म्हणजे तितकें चापल्य अंगीं

घेण्यासाठी सुरुवाती पासूनच आम्ही केलेली सवय हेच होय. चपळपणा व जल्द धावण्याची सवय हे दोन गुण क्रिकेटरला माझ्या मते आवश्यक आहेत. जल्द हालचाल करता आली नाही तर कोणताही खेळाडू बॅट्समन म्हणून फारसे यश मिळवू शकणार नाही, आणि क्षेत्र रक्षणात तर तो कुचकामीच ठरेल."

४ खेळाडूची मनःस्थिती

(६४) "क्रिकेटच्या खेळात खेळाडूच्या मनःस्थितीवरही यशापयशाचा बराचसा भाग अवलंबून असतो. या उलट आणीबाणीच्या वेळी मनाचा तोल कायम ठेवून आत्मविश्वासाने व हिम्मतीने खेळणारा खेळाडू पराङ्मुख होत असलेल्या विजयश्रीलाही मागे सहजी खेचून आणू शकतो."

-:0:|:0:-

## १७ एका शिपायाचें आत्मवृत्त.

जनरल नानासाहेब गणपतराव शिंदे यांनी आपलें आत्मचरित्र लिहिलें आहे. ल्हानपणी आई वडिलांच्या बोलण्याचा मुलांच्या मनावर फार परिणाम होतो. याचा पुरावा यांच्याही आत्मचरित्रांत पहावयास सापडतो. (१०)

### १ आपल्या कुटुंबाचे पांग फेड.

" माझ्या आईचा मृत्यु झाला त्यावेळी माझे वय सरासरी १० वर्षांचे होते व मी मराठी ४ थ्या इयत्तेत शिकत होतो. आमची सर्वांत वडील बहीण काशीबाई हिचें लग्न झालेलें होतें. या बहिणीवर आमच्या आईचें फार प्रेम होतें. आई फार आजारी झाली तेव्हां या वडील बहिणीस पत्र लिहावयाचें होतें. परंतु पत्र लिहिणारा कोणी मिळेना. आईने मला विचारलें की तुला थोरल्या बाईस पत्र लिहिता येईल काय ? मी एकदम होय म्हटलें. आईनें सांगितलें तसें मी पत्र लिहिलें. तें पाहून माझ्या आईस अत्यानंद झाला. तिने मला जवळ घेऊन तोंडावर हात फिरवून कुरवाळले व म्हणाली की माझ्या बाबा असेंच मन लावून शीक व आपल्या कुटुंबाचे पांग फेड. या गोष्टीस आज इतकी वर्षे झालीं तरी ते शब्द मला अगदी बरोबर आठवत आहेत. मी माझ्या कुटुंबाचे पांग ईश्वरकृपेने यथाशक्ति फेडू शकलों याचें कारण माझ्या आईचा शेवटचा आशिर्वादच होय, असें कोण म्हणणार नाही ! "

~~ल्हानपणीं नानासाहेब यांचा सदाशिवराव यांच्या बरोबर~~

~~घरोबा होता.~~

२ दारुचा व बाहेरख्यालीपणाचा परिणाम.

लहानपणी नानासाहेब यांचा सदाशिवराव यांच्या बरोबर घरोबा होता.

नानासाहेबांना शिक्षण देऊन मोठे करावे अशी सदाशिवरावांची इच्छा होती. परंतु ते व्यसनी होते. त्यामुळे त्यांना काही सहाय्य करता आले नाही. या विषयी नानासाहेब सांगतात (२८)

" एके दिवशी दुपारी सदाशिवराव यांनी मला एकट्याला जवळ बोलाविले व म्हणाले की नाना माझी ही स्थिती का झाली हें तुला समजलें का ? बाबारे दारुचा व बाहेरख्यालीपणाचा हा परिणाम! तू आता माझ्या जवळ होतास, तुला सर्व गोष्टी माहीत आहेत. तू हुशार मुलगा आहेस. चांगला शिकलास तर नाव काढशील. या दोन व्यसनापासून मात्र तू दूर राहा. तुला शिकवून बी.ए.एल.एल.बी. करण्याचा माझा हेतु होता, परंतु आता त्याचें काय? मी थोड्या दिवसांचा सोबती आहे ! ".

सदाशिवराव बोलत असतांना मी सारखा रडत होतो व म्हणालों कीं " दादा असे काय बोलता! आपण लवकरच चांगले व्हाल! " तेव्हां त्यांनी आपलें तोंड भिंतीकडे वळविलें. इतक्यांत त्यांचें कुटुंब आंत आल्याने मी उठून बाहेर गेलों. तो सर्व दिवस मी रडून काढला. वरील त्यांचे शब्द माझ्या कानांत सारखे आज तागायत घुमत आहेत. "

** ** **

## ३ मी दारूला जन्मांत शिवलों नाही.

जनरल सारख्या हुद्दावर असूनही नानासाहेब दारूला शिवले नाहीत म्हणून ते म्हणतात ...

(२१) "सदाशिवराव त्याच आठवड्यात कैलासवासी झाले. त्यांच्या वयोवृद्ध वडिलांस, कुटुंबास व बंधूस अतिशय दुःख झाले. मीही कोपऱ्यात उभा राहून रडत होतो. आता माझ्या शिक्षणाची काळजी कोण घेणार या विवंचनेत मी होतो. सदाशिवरावांचे शेवटचे शब्द माझ्या कानात सारखे घुमत होते. इतकेच नव्हे तर त्या शब्दांनी माझ्या हृदयात कायमचें ठाण केलें. मी पुढे शिकून फौजेंत नोकर झाल्यावर पुष्कळ श्रीमंत लोकांशी माझा स्नेह संबंध आला व त्यांनी मला दारू पिण्यासही पुष्कळ आग्रह करून पाहिला. परंतु माझा निश्चय तिळभरही ढळला नाही. सदाशिवरावासारखेच दारूचे भयंकर परिणाम मला माझ्या आयुष्यांत पुष्कळ पाहण्यास मिळाले व मी आता म्हातारा झालों आहे. तरी दारूपासून काय सुख आहे हें गूढ मला अद्याप उकललें नाही. पोलो, डुकराची शिकार, टेनिस वगैरे खेळ मी पुष्कळ वेळा युरोपियन लोकां बरोबर खेळलों आहे. व खेळ संपल्याबरोबर Have a peg - म्हणून मला पुष्कळ वेळा आमंत्रणें आलीं आहेत. परंतु मी नुसते लेमोनेड घेत असे. युरोपियन लोकांबरोबर मी पुष्कळ वेळा खाना खाल्ला आहे. परंतु तेथेही माझे आवडतें पेय म्हणजे लेमोनेड. मी दारूला जन्मांत कधीही शिवलों नाही. इतकेंच नव्हें तर जन्मांत कधी सिगरेटही ओढली नाही. मी पानही कधी खात नाही. मला

या वस्तूंची कधी जरूरच भासत नाही. ग्वाल्हेरचे कै. श्रीमंत माधवराव महाराज हे मजवर फार प्रेम करीत असत. मला ग्वाल्हेरला मोठमोठ्या समारंभाच्या वेळी मोठ्या आस्थेने व प्रेमाने बोलावीत असत. मोठ्या जलशा मध्ये मी आनंदाने सर्व रात्रभर सामील होत असे. परंतु दारूचा थेंब घेत नसे. अगर सिगरेटचा एक झुरकाही मारीत नसे."

४

## कॅप्टन वॉटसन यांचा उपदेश

एका युरोपियन मित्राने नानासाहेबांना कसा योग्य सल्ला दिला तें पाहा ...

८५ " कॅप्टन वॉटसन यांचें म्हणणे की तुम्ही मुलांच्यासाठी काही पैसा शिल्लक टाकता की नाही ?" मी "नाही" म्हणताच त्यांना मोठें आश्चर्य वाटलें. ते म्हणाले " Then what right have you to bring forth these children if you have not made any provision for them. " - आणि त्या नंतर मला मिळणारे २५ रु. अलाउन्सचे त्यांनी परस्पर पगारातून घेऊन बँकेत जमा करायला सुरुवात केली. त्यामुळें मला पुढे फार फायदा झाला."

५

## मी रजा घेतली नाही

नानासाहेब म्हणतात की मी रजा घेतली नाही. (४७७)

" ल्हानपणापासून मी जरी फारसा सशक्त नव्हतो तरीपण

नियमीतपणे दररोज मेहनत करीत असल्याने माझी शरीर प्रकृति अगदी निकोप राहिली आहे. नोकरीच्या सुरुवातीस मी एकदाच तापाने आजारी पडल्याचें मला आठवतें. त्या नंतर मी कधीही आजारी पडलों नाही. इतकेंच नव्हे तर माझे डोकेंही कधी दुखत नाही. सर्व नोकरीत मी एक दिवसाचीही आजारी म्हणून रजा घेतली नाही. माझी हक्काची व किरकोळ रजाही दरवर्षी फुकट जाते, मग आजारी म्हणून रजेची गोष्ट तर लांबच राहिली. हवाफेर करण्याचे श्रीमंती चोचले मला कधीच सुचले नाहीत किंवा त्यांची जरूरीच भासली नाही, असें म्हटलें असता अयोग्य होणार नाही. दररोज मेहनत करून अंगांतून घाम निघाला, व्यसनापासून अलिप्त राहिला व सर्व गोष्टी नियमितपणे केल्या तर साधारण प्रकृतीचा मनुष्यही चांगली शरीरसंपदा ठेवू शकतो असें मानणारांपैकी मी एक आहे."

## ६ ठरलेल्या वेळीं ठरलेलें काम

ठरलेल्या वेळीं ठरलेलें काम केल्याने उन्नति होते असें नानासाहेबांचें मत आहे.

(४६४) " वेळेचें महत्त्व मला फार वाटतें. मी माझा वेळ केव्हांही फुकट जाऊं देत नाही. जी घडी गेली ती पुन्हा परत येणार नाही, हें तत्त्व मी चांगलें समजतों. मनुष्याचें जीवित फार क्षणभंगुर आहे. करिता आपल्याला जें करावेंसें वाटतें तें करून टाकावें. म्हणून आजचें काम उद्यावर मी केव्हांही ढकलीत नाही. अमक्या कामास मला वेळ नाही असें मी केव्हांही म्हणत नाही. माझे दररोजचे सर्व व्यवसाय करूनही मला बराच वेळ राहतो. मी पुष्कळ वेळा माझ्या मुलास कित्येक दिवस पर्यंत नेमाने शिकवीत असतों. मला भेटीस

येणाऱ्यांच्या मी माझें काम चालत असतांनाच भेटी घेतो. मात्र त्यांना पाल्हाळिक हकीकती सांगण्यास फारसा वेळ देत नाही. एकदम मुद्यावर येण्यास सांगतो. जवळ जवळ साठ वर्षांचे माझें वय झालें आहे तरी मला आळस कसा तो माहीत नाही. माझे कपडे वगैरे सर्व मी सांभाळतो व घालतो. ठरलेल्या वेळी ठरलेलें काम करण्याची मला सवय असल्याने माझें काम तेव्हाच पुरें होतें व अमकें काम करण्याचें बाकी राहिलें आहे असा हुरहुरीचा बोजा निजतांना माझ्या मनावर केव्हांही पडत नसतो. जेथली वस्तु तेथे ठेवण्याबद्दलचा माझा फार कटाक्ष असतो. या कामांत मात्र मला फार त्रास पडतो. कारण कुटुंबातील मंडळीस व नोकरचाकरास त्याचें महत्त्व बरोबर समजत नसल्यामुळे ही पद्धत त्यांच्या अंगवळणी पाडण्यास फार कठिण जाते. रात्री अंधारांत जरी पाहूं लागलों तरी आपली वस्तु जेथली तेथेच सापडली पाहिजे यातच संसाराची दक्षता आहे."

## ७ काम सपाटून केलें पाहिजे.

नानासाहेब म्हणतात की मनुष्याने फार मेहनत केली पाहिजे.

(५०० ) "ज्याला मोठा मनुष्य व्हावयाचें असेल त्याने काम सपाटून केलें पाहिजे. पुष्कळ काम केल्याशिवाय मोठेपणा येत नाही व आलेला टिकत नाही. मनुष्य कोणी कितीही मोठा असला तरी तो निर्दोष किंवा निर्व्यंग असा असत नाही."

** ** **

१८

## ग त गो ष्टी.

१

### माझा कमकुवतपणा

साहित्यसम्राट नरसिंह चिंतामण केळकर स्वतःचा कमकुवतपणा सांगतात ....

(११२) " मी जातीचा फारसा रडवा नव्हतो. संध्याकाळची कातरीत वेळ झाली आहे, घरात अजून दिवा लागलेला नाही, बाहेर आभाळ ढगांनी कुंद झालेलें आहे अशा वेळी मला हटकून रडू येई. एकदा आईने ' अरे कां रडतोस ? ' असें मला विचारलें. तेव्हां मी खरोखरच म्हणालों ' रडावसें वाटतें म्हणून ! ' दुःख नसलें तरी उदासपणामुळे मनुष्य रडकुंडीला येतो हा अनुभव लहानाप्रमाणे थोरांनाही येत असेल. पण प्रौढ वयांत मनुष्य रडत नाही इतकेंच. "

२

### ..आजची नवी पिढी तंबाखु ओढते पण..

त्या वेळी तंबाखू ओढणारे लोक कसे होते त्याचा मासला पहा ..

(१२९) " प्रथम सुरू होणाऱ्या इंजिनासारखे चिलमीवर काही वेळ साफसाफ झुरके मारून झाले म्हणजे शेवटचा दम पुरा करतांना चिलमींतून वर जाळ काढणार नाही तो कच्चा आणि काढील तो पक्का असें समजलें जाई. आजची नवी पिढीही तंबाखू ओढते पण ती मवाळच. "

++ ++ ++

३

## अरे हा तर मराठा

तात्यासाहेब केळकरांना घोड्यावर बसायची सवय होती म्हणून ते म्हणतात.

(१२६) " दिल्लीच्या असेंब्लींत असतांना आम्ही सात आठ सभासद पेशावर कडील सरहद्दीच्या दौऱ्यावर गेलो. वाटेंत एका मुक्कामांत पोलिटिकल अधिकाऱ्याचा बंगला उंच चढणीवर होता. तेथे फराळास जावयाचें होतें. आणि ते चढण्याचे श्रम वाचावेत म्हणून काही लष्करी स्वाराचे घोडे आमच्या करिता आणून उभे केले होते. ज्या कांहींना मुळीच सवय नव्हती ते घोड्यावर बसेनात. पण पंडित मोतीलाल नेहरू व इतर एक दोन गृहस्थ यांच्या बरोबर मी घोड्यावर बसून निघालों. काहींना आश्चर्य वाटलें की मला घोड्यावर कसें बसता येतें. तेव्हां दुसरे म्हणाले "अरे ! हा तर मराठा !" हा घोड्यावर बसणारच. उगीच का मराठ्यांनी मुलुखगिऱ्या केल्या. ? "

४

## मला तरी तेव्हां तसें कोठे वाटलें

स्वतःच्या मोठेपणाचीं स्वप्नें त्यांना पूर्वी पडली नव्हतीं, असें तात्यासाहेब सांगतात (१५१) " कॉलेजांत असतांना मला कोणी निर्बुद्ध म्हटलें नाही हें खरें. पण तरतरीत अशा विद्यार्थ्यांत माझी कधी कोणीच गणना केली नाही हेंही खरें आहे. आणि म्हणूनच पुढील आयुष्यक्रमांत पूर्वीच्या माझ्या बरोबरीच्या बहुतेक सोबत्यापेक्षा मी अधिक नावारूपाला आलों ही गोष्ट

सर्वांनाच मोठी आश्चर्याची वाटली. काही स्नेही अजून म्हणतात की " केळकर ! तुम्ही इतके पुढे सरसावाल असें आम्हाला तेव्हा स्वप्नातही वाटलें नाही." पण त्यांना चसें काय मला तरी तेव्हा असें कोठें वाटलें ? "

५ पण नशीबवान खरा

आपल्याला आयुष्यात जें यश मिळालें त्याचें पुष्कळसें श्रेय योगा योगालाही आहे असें साहित्याचार्य समजत असत. म्हणूनच तर ते म्हणतात, " आयुष्यातील सापेक्ष उत्कर्ष आपण होऊन वेळोवेळी माझ्या पदरात पडत गेला. दैवाने असा हात न देता मला त्याने इतर पुष्कळ लोकाप्रमाणे गोते दिले असते तर माझी होडी कोणत्या किनाऱ्याला लागली असती हें सांगणें कठिण आहे."

६ जाहीर रीतीने सिध्द झालेलें बरें

लोकमान्य टिळक तुरुंगात असताना 'केसरी' साप्ताहिकाचे संपादिकत्व आपणाकडे असावें असें केळकरांना वाटे. त्या विषयी लिहिताना ते म्हणतात (२२९) -" मी परीक्षेला न उतरलों तर टिळक परत आल्यावर मी आपोआप बाजूला सरेन. आणि मग ते स्वतः केसरीचे संपादक होतील किंवा वाटेल त्या दुसऱ्या कोणाला करतील. पण माझ्यामध्ये कर्तृत्व किंवा सामर्थ्य अमुक इतक्यापर्यंत आहे मात्र त्या पलीकडे नाही असें जर खरोखरी असलें तर तें एकदा असा जाहीर रीतीने सिध्द झालेलें बरें. आपल्या आकांक्षा मनात ठेवून 'झुरत' किंवा अहंकाराने फुकट झुलत गप्प बसावयाचें हें मला फार अवघड वाटतें. "

++ ++

## १९ माझी संसारयात्रा.

### १ दृष्ट लागण्याची आठवण

ल्हानमुलींना दृष्ट लागू नये म्हणून स्त्रिया फार काळजी घेतात. परंतु दृष्ट लागते किंवा नाही याबाबत अजूनही दुमत होण्याची शक्यता आहे. इतिहासकार सरदेसाई मात्र दृष्ट लागल्याने कायकाय परिणाम झाले ते सांगत आहेत.

" दुसरी आठवण दृष्ट लागण्याची. कित्येक माणसे ह्या दृष्टी संबंधाने त्या बाजूस ( कोंकणात ) ठळकपणे ठाऊक असत. काही चांगले पदार्थ, पडवळ, दुध्याभोपळा वगैरे भाज्यांची आळीं अशा माणसांच्या नजरेस पडलीं की तीं सर्व लगोलग खराब होऊन जात. "काय हो! तुमचीं हीं पडवळें सुंदर आलीं आहेत" अशी वाहवा त्या माणसाच्या तोंडून निघाली की पुरे. आमच्याच दारातले पडवळीचें आळे त्या माणसानें पाहताच एक दोन दिवसांत सर्व फळें सुकून गळून पडलेली मीं पाहिलीं आहेत. दुष्ट लागणारे हे गृहस्थ आमच्या इतके परिचयाचे असत की ते दुरून दिसताच आई आजी आम्हास सूचना देत की तो ..................येतो आहे बरे, त्याच्यापुढे तुमचे चांगले पदार्थ आणू नका. एकदा आमची म्हैस व्याली आणि तिच्या ओटीची वाखाणणी त्या गृहस्थाने केली. लगेच तिच्या आचळांतून दुधा ऐवजी रक्त येऊं लागलें. आम्हांस तेव्हा दृष्टीचा हा प्रकार खरा वाटे."

** ** **

## २ पद्धतशीर उद्योगाची पात्रता

मनुष्याने उद्योग नियमाने आणि पद्धतशीर केला तर त्याचा उदय होतो. सरदेसाई म्हणतात " आमची हीन स्थिती, आमचें अगाध अज्ञान, पाश्चात्यांच्या पुढे डोकें वर उचलण्याची आमची असमर्थता हे प्रकार माझ्या मनात उभे राहून मोठा उद्गेव वाटला. त्यातल्या त्यात माझा ऑक्सफर्डचा निवास स्मरणीय बनला. पद्धतशीर उद्योग करण्याची पात्रता मला आली. त्यासाठी खालील गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत.

(१) प्रकृतीची काळजी उत्तम प्रकारे घेऊन शारीरिक व मानसिक सुख वृध्दि होत राहील असा प्रयत्न करणे.

(२) उद्योग दोन प्रकारचा. एक स्वतःच्या पोटाचा हा मुख्य आणि दुसरा परहिताचा. ह्या दोहोत प्रमाणबध्दता असावी. शक्य असेल तेवढेंच काम आखून घेऊन तें नियमितपणें पुरें करावें. एकंदर आयुष्याची इतिकर्तव्यता ठरवून तिचा सारखा पाठपुरावा करीत जावा.

ह्या व्यतिरिक्त रोजच्या वर्तनाचे असे कित्येक सामान्य नियम मी ठरविले ते असे. घरात अभ्यासाची जागा स्वतंत्र ठेवावी. होता होईल तो राहतें घर बाहेर मोकळ्या हवेत ठेवावें. सकाळी निदान दोन तास कामाचे म्हणून पवित्र समजावेत. सकाळी दिसू लागल्यावर बिछान्यात पडून राहू नये. व्यायाम व आहार या दोन गोष्टीस अत्यंत जपावें. भोजन सावकाश व परिमित असावें. स्वतःचे व निकटवर्तियांचें वेळापत्रक ठरवून सर्वांनी आपापलीं कामें वेळेवर उरकावीं. हे सर्व नियम मी पुढें नेहमी पाळीत आलों. हेंच माझ्या उद्योगाचें व दीर्घायुष्याचें बीज होय. "

## २०. माझ्या आठवणी व अनुभव.

### १. एक सुधारणा करताना दुसऱ्या सुधारणेला अडथळा.

कर्मवीर विठ्ठल रामजी उर्फ अण्णासाहेब शिंदे हे समाजसेवक म्हणून प्रसिध्द आहेत. त्यांच्या बहिणीला हिंगणे येथील अनाथ बालिका श्रमात ठेवण्यात यावें असे त्यांना वाटे. त्याप्रमाणें अण्णासाहेब शिंदे, अण्णासाहेब कर्वे यांना भेटायला गेले. त्यावेळी त्यांना जो अनुभव आला तो ते पुढील प्रमाणे सांगतात..

" ह्या सुमारास प्रो. अण्णासाहेब कर्वे यांनी हिंगणे येथे अनाथ बालिका श्रमाची स्थापना नुक्तीच केली होती. त्यांच्याकडे मी माझ्या बहिणीसाठी भेटावयास गेलो होतो. शेणामातीने सारवलेल्या कुडाच्या भिंतीच्या एका खोपटीत प्रो. अण्णासाहेब जमिनीवर बसले होते. त्यांचे आश्रमांत ब्राम्हण जातीच्याच १०,१५ विधवा मुली होत्या. माझ्या बहिणीला आपल्या आश्रमांत घेता काय ? ह्या माझ्या प्रश्नाला" ब्राम्हणेतरांच्या मुलींना घेण्याचा हा काळ नाही, "असें प्रो. अण्णासाहेबांनी सांगितलें. आणि माझ्या बहिणीला आश्रमांत घेण्याचें साफ नाकारलें. ह्यामुळें माझी फार निराशा झाली. तत्कालीन महाराष्ट्रात एक सुधारणा करतांना दुसऱ्या सुधारणेला कसा अडथळा येई ह्याचें हे उदाहरणच आहे. "

***

## २ मराठा समाज पाठीच्या कण्या सारखा

शिवाजी उत्सव आता सर्वत्र साजरा होत असतो. परंतु पूर्वी तो सुरु करण्यासाठी अण्णासाहेब शिंदे यांना कशी खटपट करावी लागली तें पुढील उताऱ्यावरून दिसून येते. पृष्ठ २८६

" जेधे मॅन्शनमध्यें शिवाजी उत्सवाची पूर्वतयारी करण्याविषयी एक सभा भरली होती. तो उत्सव कसा राष्ट्रीय स्वरूपाने कसा करण्यात यावा ह्या विषयी सभेत भाषण करण्यासंबंधी मला आमंत्रण आलें. त्या वेळची परिस्थिती पाहून माझ्या मनानें घेतलें की महाराष्ट्रांत मराठा समाज हा बहुसंख्य असून महाराष्ट्राच्या पाठीचा कणा असल्यासारखा आहे. तेव्हा ह्या समाजाची जागृति तर एका बाजूने व्हावीच पण त्या जागृतीमुळें महाराष्ट्रांत फूट न पडावी. उलट ब्राम्हणापासून तों अस्पृश्यांपर्यंत हें जागृतीचें व ऐक्याचे लोण खाली उतरावें. आणि ह्या हेतूने मध्यवर्ती मराठ्यांना जागें करावें हा विचार माझ्या मनांत घोळू लागला. पुढे लौकरच ' मराठा राष्ट्रीय संघ' या नांवाची संस्था उघडण्यांत आली. या संघाचें एक जाहीर पत्रक छापून प्रसिध्द करण्यांत आलें."

## ३ जातीभेद असाच चालू राहिल तर

या प्रमाणें या ' मराठा राष्ट्रीय संघाच्या' वतीनें गुरुवार ता. ८ नोव्हेंबर १९१७ रोजी सायंकाळी शनिवारवाड्यापुढील भव्य पटांगणांत एक सभा भरली. तींत शहरांतील सर्व जातींचे, धर्मांचे व पंथांचे लोक उपस्थित होते. सभेस सुमारे दहा हजार पर्यंत लोकसमुदाय हजर होता. सभेचें अध्यक्षस्थान

अण्णासाहेब विठ्ठल रामजी शिंदे यांचेकडे होते. ते म्हणाले ...

" गेल्या दोन तीन महिन्यांत आपणामध्यें मागासलेले व पुढारलेले, ब्राम्हण व अब्राम्हण असे तट पाडण्याचे प्रयत्न होत आहेत. मागासलेल्या तटांत मराठ्यांचीही गणना होऊं लागली व त्यांचा स्वराज्यास विरोध आहे असें भासविण्यांत येऊं लागले. वस्तुस्थिती तशी नाही. ज्या मराठ्यांनी दोनशें वर्षांपूर्वीच स्वराज्य स्थापन करून त्याचा उपभोगही घेतला ते मराठे स्वराज्य मागण्यासही भितात हे केव्हांही शक्य नाही. "

त्याच सभेंत स्वराज्याच्या ठरावावर लोकमान्य टिळक यांचें भाषण झाले. ते म्हणाले ...

" जातीभेदाच्या अनिष्ठ तत्वाचा नवीन राज्यांतही शिरकाव करूं नका. आता आपल्याला पूर्वीचें स्वराज्य नको असून पाश्चिमात्य धर्तीवरील स्वराज्य पाहिजे. आपल्या जातीभेदामुळेंच येथें ब्रिटीश राज्य स्थापन झाले व तो जातीभेद असाच पुढे चालू राहणार असेल तर स्वराज्यांतही अशीच आमची अधोगती होईल. जातीभेदानें आमचें फार नुकसान झाले आहे. राष्ट्रीय सभेनें केलेली मागणी कोणत्याही एका जाती पुरती नसून तिच्यांत सर्व जातींच्या सर्व हितसंबंधांचे संरक्षण होईल. "

** ** **

******************************************

## २१ :-:-: मी व मला दिसलेलें जग. :-:-:-:

******************************************

### १ वाचनाने वाचन वाढत जातें.

श्रीपाद महादेव माटे म्हणतात की वाचनाने वाचन वाढत जातें. (९९) "इ.स. १९०७ हें वर्ष रिकामें सापडल्यामुळें मी त्याचा भरपूर उपयोग करून घेतला. निबंधमाला मी आधीच वाचलेली होती. मालेतील डॉ.जॉन्सनचें चरित्र मला फार आवडलें होतें. शास्त्रीबोवांच्या या चरित्रांत बॉस्वेलचें नांव अनेकदा आलेलें होतें. म्हणून मी बॉस्वेलने लिहिलेलें जॉन्सनचें मोठें चरित्र विकत घेतलें. आणि तें बारिक टाईपांत छापलेलें, मोठ्या आकाराचें पाचशें सातशें पानाचें चरित्र मी अगदी टिपून वाचून काढलें. वाचनानें वाचन वाढत जातें. या चरित्रांत इंग्रजी वाङ्‌मयांतील अनेक लेखकांची नांवें आलेली आहेत. त्यांचेंही काहीतरी वाचावें म्हणून मी इकडे तिकडे पाहू लागलों. तों तेव्हा विशेष चलन पावलेली मोर्ले सेरीजचीं पुस्तकें माझ्या हातीं लागलीं."

### २ तुमची रया गेलीच म्हणून समजा.

मनुष्याने कितीही नांवलौकिक मिळविला परंतु तो जर मास्तर असेल तर त्याला जेवढा मान द्यायला हवा तेवढा समान देत नाही. याबद्दलचा आलेला अनुभव लेखक या ठिकाणी सांगतात. (३८७) " अशा वेळीं माझ्यावर आणि माझ्या मुलांच्यावरही अजूनपर्यंत आपल्या कृपेची पाखर ठेवणाऱ्या एका उमद्या गृहस्थाची व माझी गाठ पडली. हे गृहस्थ म्हणजे प्रिन्सीपॉल करमरकर होत. त्यांनी मला शाळेंतून काढून १९१९ सालीं सर परशुरामभाऊ कॉलेजमध्यें घेतलें. याच्याही आधीं आता आपण निवृत्त होणार तर माटे यांना माझ्या

जागी घ्यावें असें प्रोफेसर पोतदार यांनी सुचविलें होतें. पण तेव्हा योग जमावयाचा नव्हता, इतकेंच. मी कॉलेजांत आलों आणि नवलाची गोष्ट ही की लोकांच्या दृष्टीने मी एकदमच मोठा झालों. ते मला विव्दान्ही म्हणू लागले. पण मागे जे एकदा मास्तरीच्या धंद्याविषयी सांगितलें होतें तेंच शेवटी खरें आहे. तुम्ही कितीही वाचा, कितीही लिहा, केवढेंही वक्तृत्व करा आणि सार्वजनिक कामांत कितीही स्वार्थत्याग करा; पण तुम्ही जर मास्तर असला तर तुमची रया गेली म्हणून समजा."

## २ प्रकाशनाचें धाडस केलें.

श्रीपाद महादेव माटे यांनी पुष्कळ लिहिलें. परंतु पुस्तकें स्वतः प्रकाशित केली नव्हती. तेव्हा तें धाडस त्यांनी करून पाहिलें. त्यांत त्यांना चांगली किफायत झाली. ते म्हणतात (३९०) "' याच्या मागोमाग ' आपापले हितगुज ' या नावाचें पुस्तक मी लिहिलें. आत्मचरित्रे वाचण्याचा मला फार छंद. म्हणून काही काही शेलक्या चरित्रांतून विशेष आकर्षक वाटणारी प्रकरणें मी भाषांतरिली व त्याचेंच हें पुस्तक बनविलें. ते व इतर ठिकाणी लिहिलेले काही निबंध मिळून ' साहित्य धारा ' नावाचा माझा पहिला निबंध संग्रह मी प्रसिद्ध केला. मागील अनुभवावरून मला कळून चुकलें होतें की थोडें साहस करून आपली पुस्तकें जर आपणच प्रसिद्ध केली तर मिळकतीच्या दृष्टीने आपला फार मोठा फायदा होतो. म्हणून हीं सारी पुस्तकें मीच प्रसिद्ध केली. आणि अपेक्षे प्रमाणें मला चांगला फायदा झाला. इकडे वृत्तपत्र लिखाणातून किफायत होतच होती."

४

## ताबूत बंदरी लागलें.

लहानपणचे लेखकाचे दिवस फार गरीबीत गेले. पुढे मोठ्या हिमतीने आणि निश्चयाने विद्याभ्यास करून लेखकाने हळूहळू आपली सांपत्तिक स्थिति सुधारली. त्याबद्दल लेखक म्हणतात ..(४०६)

" माझ्या आईने आमच्या वडिलांच्या मृत्यूनंतर सुमारे पंधरा वर्षे दारिद्र्याची जालीम कसरत सोशीतच काढली. या पंधरा वर्षांत तिच्या मनाची सर्व सामर्थ्ये दृग्गोचर झाली. आणि निराश्रित झालेल्या मुलांची आई म्हणजे काय याचा नमुना आईने दाखविला. पूर्वीचें स्मरण झालें म्हणजे मी एकटा असतांना मला अजूनही भडभडून येतें. स्वतः पराकाष्टेचे हाल सोसून हिने आम्हा भावांना एकत्र ओढून धरलें नसतें तर आमचे काय हाल झाले असते हें सांगवत नाही. इ.स. १८९७.९८ या वर्षी चमत्कारिक दुष्काळ पडले; आणि दादाला तर नऊ दहा रुपये पगार. आईनें दिवस कसे काढले असतील ते तिचे तिला माहीत, अथवा मला सुध्दां थोडेसें आठवतें.

दोन पोत्यांचें केलेलें एक रक्टें होतें. तें ती खाली घाली, उशाला कसला तरी बोळा घेई आणि अंगावर केवळ चौघडी घेऊन भर थंडीचे दिवस काढी. घरात पुरेसें धान्य नाही, म्हणून सहासहा महिने तिने एकदा जेवूनच काढले. आणि हें सारे आम्हा मुलांचा प्रतिपाळ व्हावा म्हणून. तितिक्षा म्हणजे सोशीकपणा आणि निपटून स्वार्थत्याग यांची कड बाईने लावली. आमच्या मराठीच्या पांचव्या पुस्तकांत ग्रेस दार्लिंग नांवाच्या एका स्त्रीने, पेट घेतलेलें एक लहान मोठ्या शर्थीने बंदरांत आणून लावलें अशी गोष्ट होती. आम्हा भावांची

जीविते सुखरूपतेच्या बंदरात आणून लावायचें वाईनी केलेलें कार्य ग्रेस डार्लिंगच्या कृत्या प्रमाणेंच अत्यंत धैर्याचें आणि थोरपणाचें होतें. सुदैवानें आमची जीवितें बंदराला लागलीं; आणि मग आम्ही भावांनी बाईला कसलेंही उणें पडू दिलें नाही. नव्हे तिला जितकें सुख देता आलें तितकें दिलें. या एका गोष्टीच्या स्मरणाने मात्र जुन्या आठवणींचें दुःख वितळून जातें.

## ५ माझी दिनचर्या.

स्वतःच्या दिनचर्ये बद्दल माटे म्हणतात ...

(४४६) " मला कसलेंही व्यसन नाही. दिवसाच्या काठी तीन वेळा केवळ अर्धा अर्धा कप चहा मी घेतो. स्वतःच्या वस्त्राभरणात मी फारसा पैसा घालवीत नाही. पण घरातील माणसांना मात्र मी काहीसा सढळपणाने खर्च करतो. पण मनात शोध करता करता या खर्चाचें कारण मला माझ्या लहान पणच्या दारिद्र्यांत सापडतें. ज्याचें लहानपण कदान्न खाऊन गेलें असेल, त्यांना चांगले दिवस आल्यावर काळावर परोक्ष सूड उगविण्याची वासना होत असावी असें वाटतें. माझ्या दोघा भावांचें असेंच झालें होतें. पहाटे ४.३० ते ५ वाजता उठण्याची आम्हीं पतिपत्नींना सवय आहे. तेव्हा पासून प्रातर्विधि स्नान इत्यादि आटोपल्यावर सात आठ वाजे पर्यंत मी मजकूर सांगतो व दृष्टि चांगली होती तों पर्यंत वाचनही करीत असे. पुढे दोन तास घरचें किंवा सार्वजनिक काम करावें, अशी माझी वहिवाट दोन वर्षांपर्यंत होती. दहा वाजता जेवणाचा नियम मी सहसा मोडू देत नाही. दुपारी जेवणा नंतरची विश्रांति झाल्यावर पुन्हा एकदोन तास मी मजकूर सांगतो व डोळे चांगले होते तेव्हा वाचनही करीत होतो. नंतर झाडावेलींचा समाचार, घरची किंवा सार्वजनिक कामें व संध्याकाळची सहल,

करणें हे प्रकार आटोपल्यावर सात साडेसातला जेवण ठरवतो. जर कोणी लेखक याही वेळी हाताशी सापडला, तर थोडाबहुत मजकूर त्याच्याकडून लिहून वा वाचून घेतो. रात्री साडेनऊच्या सुमारास झोपी जातो."

** ** **

२२

# जीवन प्रवाह

१

## शेतकऱ्याची योग्यता

श्री. माधवराव बागल शेतकऱ्याची योग्यता पुढील प्रमाणें सांगतात ...

(२१)" शिरोळ पेट्यातील बस्तवाडच्या सभेतील गोष्ट. मी शेतकऱ्यांना त्यांच्या योग्यतेची जाणीव देत होतो. मी म्हणालो " बाबा दुनियेचा खरा मालक तूच आहेस. खरा देव तूच आहेस. राजांचा राजा तूच आहेस. सर्व दुनिया केवळ तुझ्या श्रमावर जगत आहे. तुझ्या मदतीविना कोणालाही जगता येणार नाही. तू व्याज दिलें तर सावकार जगणार. तू खंड दिलास तर जमीनदारांची बडदास्त चालणार. तू कर दिलास तर राज्याचा गाडा सुरळीत चालणार. शिक्षणाचा खर्च तू चालवितोस. सगळ्यांच्या उड्या तुझ्या जिवावर ! सर्वांचा दाता रक्षणकर्ता अन्नवस्त्र पुरविणारा पोशिंदा तूच खरा परमेश्वर ! पण तुझी ओळख तुला नाही. "

माझ्या या बोलीने एका मुसलमान श्रोत्याला भावनावेग आवरता आला नाही. तो मोठ्याने " ओ ऽऽ खुदा ! ओ ऽऽ खुदा ! " असें म्हणत पायावर येऊन पडला. त्यानें माझ्या पायाला मिठी मारली. माझे पाय अश्रूंनी भिजवून काढले. डोळे अर्धोन्मिलित होते. अश्रुधारा चालल्या होत्या. हात जोडले होते. जणु समाधीच लागली होती त्याची. "

++ ++ ++

## २ वर्तमानपत्राचें स्वरूप धंदेवाईक.

श्री. माधवराव बागल म्हणतात की सध्याच्या वर्तमानपत्राचें स्वरूप धंदेवाईक असें आहे.

(२१७) "आजच्या बहुतेक पत्रांचें स्वरूप धंद्याचें झालें आहे. भांडवलवाला धंद्यासाठी पत्र काढतो. स्वतंत्र व्यक्ति पण पोटासाठीच पत्र काढते. अशाच पत्रांची संख्या अधिक आहे. पत्र जगविणें आणि आपला चरितार्थ व्यवस्थित चालविणें व करता आलें तर समाजकार्य करणें हेंच एक उद्दिष्ट प्रामुख्याने असल्यामुळे ध्येयासाठी मरण पत्करण्याचा व जेथून पैसे येतात तो झरा बंद करण्याचा अव्यवहारीपणा (!) कोणी करीत नाही. यामुळें जेथून जाहीराती मिळण्याची संभवता त्यांना दुखविण्याचें धाडस ते करीत नाहीत."

## ३ महात्मा फुले हे माझें दैवत.

महात्मा फुले यांच्या शिकवणीमुळे मला स्फूर्ति मिळाली असे श्री. माधवराव बागल म्हणतात (२९) "शाम चित्रपटाच्या निमित्तानें अत्र्यांच्या जाहीर सत्काराचे वेळी 'आता अत्र्यांनी महात्माफुले यांचा चित्रपट काढून महाराष्ट्राच्या बहुजन समाजाला उपकृत करावें असें माझ्या भाषणात मी म्हणालो. तेव्हां "मी तो चित्रपट काढीन आणि कोल्हापूरला तो दाखविल्या शिवाय राहणार नाही." असें अत्र्यांनीही तेथेच जाहीर केलें. तोच महात्मा फुले यांचा बोलपट आता करवीरीं आला होता. त्याचें

उद्घाटन करण्याचें भाग्य मला लाभलें होतें. मी स्वतःही तो पाहण्यास फार उत्सुक होतो. महात्मा फुले हे माझं दैवत होतं. त्यांच्याच विचाराने मला मार्ग दाखविला. त्यांच्या जीवनाने मला दिशा घालून दिली. सत्य शोधनाची तीव्र इच्छा त्यांनी निर्माण केली. इतर कोणत्याही पुढाऱ्यापेक्षा मी त्यांना मान देत आलों. त्यांचा बोलपट तयार व्हावा ही अनेक वर्षांची मनिषा. एवढं हृदयंगम, एवढ्या विविध प्रसंगांनी भरलेलं, रंजल्या गांजल्यांच्या उद्धारासाठी झटणारं असं दुसरं जीवनचरित्र अद्याप महाराष्ट्रांत मला दिसत नाही. इतर नेते झाले पण ते वरच्या वर्गाचे, त्यांनी वरच्या वर्गाचेच प्रश्न हातीं घेतले. महात्मा फुले यांनी हा भेदभाव ठेवला नाही. म्हणून हिंदुधर्मांतील सर्व जातींना ते बोधप्रद होते. एवढ्या थोड्या वेळांत तें सर्व जीवन, चित्रपटावर सारांशाने पण कोणताही महत्त्वाचा प्रसंग सुटू न देता आणण्याचं अवघड कार्य अगदी यशस्वीपणे अत्र्यांनी पार पाडलं होतं. सारे प्रसंग सुसंगत आले होते. शांताराम सारखं टेकनिक साधलं नसलं तरी चित्रपट पडला नव्हता."

++ ++ ++

२३ बहुरूपी

१ माझी मार्गदर्शक गुरुदेवता

चिंतामण गणेश कोल्हटकर आपल्या वडील बंधू बद्दल म्हणतात (३४)

" माझा अच्युतकाका या माझ्या प्रिय वडील बंधूला, माझ्या मार्गदर्शक गुरुदेवतेला माझ्या वयाची पंचविशी उलटे पर्यंत मी अरेजारेच म्हणत होतो ! माझा प्रेमळ भाऊच होता तो ! अच्युतकाकाचें लग्न झाल्यानंतर तो एल.एल.बी.च्या अभ्यासासाठीं मुंबईला गेला. सर्वजण त्याला एक भोळाभाबडा साधा जगाच्या व्यवहाराकडे पूर्ण अज्ञान असणारा असे मानीत. आणि उगीच मानीत नसत. या स्वारीचें वागणेंच तसें असें. हा अभ्यासाला बसला असता याला पिण्याकरितां दुधाचा पेला पुढे नेऊन ठेवला तरी हा आपल्या अभ्यासांत इतका मग्न असे की मांजर येऊन तें दूध पिऊन गेलें तरी याला त्याची दाद नसे. एखादा शब्द घोकायला सुरुवात केली की त्याचें पीठ इतकें पडें की दादांना शेवटी सांगावें लागे. " बाप्पा आता पुरे कर. त्या खांबाचा सुध्दा तो शब्द पाठ झाला !" धोतर किंवा कपडे लत्ते फाटले तर त्याची काळजी दुसऱ्याने करावी. हा कधी तोंडातून ब्र काढावयाचा नाही. ताटांत पदार्थ काय वाढले आहेत किंवा आपण काय खातों आहों व त्याची रुची कशी आहे हें त्याच्या ध्यानांत येत नसे. पदार्थाला तिखटमीठ कमी झालेलें दुसऱ्यांनी बोलून दाखविलें म्हणजे मग हा म्हणत असे "हो ! हो ! " व्यायाम करायला लागला म्हणजे व्यायामच करी. फिरायला गेला म्हणजे पांचसात मैल सहज जाऊन येई."

** ** **

२

## एकच प्याला लिहिणारा एकच
## राम गणेश गडकरी

'बहुरूपी' या ग्रंथात चिंतामण गणेश कोल्हटकर यांनी राम गणेश गडकरी या नाटककाराचें वर्णन मार्मिकपणें केलें आहे. (२९९ ते ३०१) " ज्या वर्णाने जग भारतीयांना ओळखते असा काळसर वर्ण, साधारण, ऊंची, किडकिडीत देहयष्टी, बारीक कंबर, उघडे पाहिले तर बरगड्यांचा सापळा जरा पुढे आलेला, हातांची लांबलचक निमुळतीं बोटें, शेवटचें पेर व नखें विशेष लुकलुकीत, जणु तुपा सारख्या स्निग्ध पदार्थाचा अवशेष त्यावर रेंगाळतो आहे, निमुळता चिंचोळा चेहरा, त्या मानाने कान मोठे व थोडे पुढे आलेले, नाकाची ठेवण बसकट, टोकाशी विशेष पसरट झालेली, डोळे पाहणाऱ्याच्या प्रथम डोळ्यांत भरण्यासारखे, त्यांत बुद्धीची चमक व बारिकसारिक गोष्ट टिपून घेण्यासाठी होणारी त्यांची जलद उघडझाप, भव्य कपाळ त्या मानाने डोके थोडें मोठेच, राठ केस, शेंड्याशी कापलेल्या छपरी मिशा, एकांतात एकटेपणाने विचाराच्या भरात जलदीने मिशा हातात धरून कुरतडण्याची चावण्याची सवय, घाईनें चालणें, प्रथम या मूर्तीकडे लक्ष जाताच डोळे, नाक, कान ही पाहणाऱ्याच्या चटकन लक्षात येत. पोषाख मध्यम वर्गीयाला साजेसा. ऊंच दिवारच्या बेंगलोरी टोपीची विशेष आवड. चहाचीही विशेष आवड. विडीचें अग्निहोत्र सदैव प्रज्वलित. (पुण्याच्या दत्ताच्या देवळाजवळील हिरव्या धाग्याची विडी विशेष आवडीची) काडी पेटविण्याची विशेष लकब म्हणजे उकिडवे बसून पायाच्या आंगठ्याखाली पेटी धरावयाची आणि मग त्यावर एका हाताने काडी पेटवावयाची. याचा फायदा एवढाच की वाचनाकरिता डाव्या हातात

जें पुस्तक किंवा वर्तमानपत्र असेल तें खाली ठेवावें लागत नसे. उठल्या बरोबर दुसरीकडे कोठेही न पाहता उशाशी श्री शंकराची व विठ्ठलाची अशा दोन ल्हानशा तसबिरी असत. त्यांचें दर्शन घेऊन मग रोजच्या व्यवहाराला सुरुवात होई. तोंड धुवून आल्यावर उकिडवी बैठक, खांद्यावर टॉवेल, इमर्सन इब्सेन सारख्या एखाद्या ग्रंथकाराचें वाचन आणि चहापानाला सुरुवात. बरोबर विडीचेही झुरके, दोन कप चहा पिऊन होई पर्यंत हा कार्यक्रम चालू. मग गोष्टींना सुरुवात. दिवसांतून दहाबारा कप चहा व पन्नास विड्यांचें बंडल. कमीतकमी एवढे साहित्य जरूर असें.

दिवसभरच्या विचारासाठीं एखाद्या मोठ्या ग्रंथकाराच्या ग्रंथाचें वाचन सकाळी उठल्यावरोबर आवश्य असे. तसेंच झोपतानाही गंभीर विचार विनिमयासाठी असेच एखाद्या बड्या ग्रंथकाराची ते अवश्य भेट घेत. दुपारच्या जेवणापूर्वी स्नानानंतर चापून चोपून धोतर नेसून होईपर्यंत 'कैलासराणा शिवचंद्र मौळी,' सारखीं शिवस्तोत्रें व नंतर शिवलीलामृतांतील अकराव्या अध्यायांतील काही ओव्यांचा त्यांचा नित्यपाठ होता. पुण्यास असले म्हणजे आवर्जून सोमवारीं श्री ओंकारेश्वराच्या दर्शनाला जात रोज कसब्याच्या गणपतीवरून जाता येताना किंवा दुसऱ्या एखाद्या प्रमुख देवस्थानावरून जात असताना चद्दिशी रस्त्यावरच पादत्राणें काढून त्यांचा त्या देवतेला नमस्कार घडत असे. देवाल्यांत जाऊन दर्शन घेतल्याचा पुरावा क्वचित्‌ कपाळींच्या अंगार्‍याने मिळत असे.

जेवणखाण बेताचेच, त्यांतल्या त्यांत तिखटमिठाची व मसाल्याची आवड. कधीकधी मद्यपान करीत. त्या गोष्टीची आवड होती पण आसक्ति नव्हती. त्यांना मद्यपानाची आवड असली तरी ती पुरवून घेण्याइतकी त्यांची

आर्थिक परिस्थिती अनुकूल नव्हती. गृहस्थ धर्माप्रमाणें स्वतःचें घर चालविण्याचा त्यांच्यावर बोजा होता. कुचेष्टेने प्रतिष्ठा वाढविण्याच्या दुष्ट हेतूने मरणोत्तर मत्सरग्रस्त समकालीन प्रतिष्ठितांनी अप्रतिष्ठा करण्याच्या हेतूने त्यांचा व्यसनी म्हणून फारच गवगवा केला. हजारो वर्षे हजारो दारूबाज दारू पिऊन मेले. अजून पिणारे पीत आहेतच. पण 'एकच प्याला' लिहिणारा एकच 'राम गणेश गडकरी' निघाला. दारूबाज गडकरी म्हणून जो जो निंदकांचा आरडाओरडा होऊ लागला तो तो 'एकच प्याला' नाटकाला प्रेक्षकांची जत्रा लोटू लागली.

मद्यपानाचे बाबतीत कांही निर्बंध ते कटाक्षाने पाळीत. कोणाही बरोबर आणि कोणत्याही दर्जाचें मद्य ते पीत नसत. एरव्हींच्या खाण्यांत सुद्धां त्यांचा हा चोखंदळपणा असे. महाराष्ट्राला अपरिचित असें कलकत्याकडचें किंवा पंजाबकडचें एखादें फळ तुम्ही त्यांना खाण्याचा आग्रह करू लागलात तर ते म्हणत "माझ्या कोठ्याला या फळाची सवय नाही, मी तें खाणार नाही." मद्यप्राशनानंतर झोपण्यापूर्वी दहापाच ग्रम घशांत बोटें घालून उलटी करीत व त्याचें समर्थन करतांना म्हणत "दारूच्या नशेंत झोपी गेल्यास त्याचा मेंदूवर परिणाम झाल्या वाचून राहणार नाही." त्यांच्या नशेंत सुद्धां सावधपणा असे."

## २ ज्याला गडकऱ्यांनी आपला म्हटला

कोल्हटकरांनी नाटककार गडकऱ्यांचा आणखी एक गुण पुढील प्रमाणें सांगितला आहे. " पुण्याचा मुक्काम संपण्यापूर्वी आमच्या व्यवस्थापक मंडळींपैकी जे आमच्या विशेष सलगीचे होते त्यांना चौघापांचजणांना साग्रसंगीत मेजवानीसाठी निमंत्रण दिलें. त्यांची बिऱ्हाडाची जागा ही जरा आडमार्गी होती. भोजनाच्या निमंत्रणाच्या वेळीच मी त्यांना सांगितलें की भोजनोत्तर घरी जाण्याच्या ..

परिस्थितीत नसलो तर माझी राहण्याची झोपण्याची व्यवस्था तेथेच झाली पाहिजे, व मास्तरांना ही गोष्ट कळता उपयोगी नाही. हे मध्यमक्याचे व्यवस्थापक माझ्याबद्दल विशेष आस्था व प्रेम दाखविणारे असल्यामुळे माझें म्हणणें त्यांनी मान्य केलें. ठरल्याप्रमाणें तीन चार तास आमची बैठक रंगली. साडे दहाच्या सुमाराला मंडळी परत घरी जाण्याला निघाली. मास्तरांनी माझी चौकशी करता ... यापूर्वी मी थोडावेळ तेथून गायब झालों होतों .. स्वतः घरी मला पोचविण्याची जिम्मेदारी घेऊन आमच्या व्यवस्थापकांनी मास्तरांसह सर्वांचा निरोप घेतला. पोहोचवावयाला येण्याचा त्यांनी आग्रह धरला पण मीच त्यांचा निरोप घेऊन त्यांना निग्रहाने परतविले. खाली उतरून मी वाट चालू लागलों. दहापांच पावलें पडली असतील नसतील एवढ्यांतच 'कोल्हटकर' अशी हाक आली. वळून पाहतो तो गडकरी मास्तर !

"मास्तर !" म्हणून मी जवळ जवळ रस्त्यावर कोसळलोच. माझ्या करिता वेळ अवेळ न पाहता मास्तरांनी तिष्ठत राहावें याचें मला मनापासून दुःख झालें. पुढे एकवेळ बोलतांना ते म्हणाले "तशा अवस्थेत तुम्ही मंडळींच्या बिऱ्हाडी जाणें योग्य नव्हतें. तुम्ही तरुण आहात. तुमच्या प्रतिस्पर्ध्यांना या गोष्टीचें भांडवल करून तुमची मानहानी करण्याची संधी दिल्यासारखें झालें असतें. तुम्हाला परस्पर तुमच्या घरीं न्यावे म्हणून मी तुम्ही खाली येण्याची वाट पहात होतो."

या विस्तृत हकीकतीवरून मुद्याची गोष्ट एवढीच की गडकरी मास्तरांनी ज्याला एकदा आपला म्हटला त्याच्यासाठी आपला मोठेपणा विसरून ते वाटेल तें करायला तयार असत. हा स्वभाववैशिष्ट्याचा पैलू वाचकांच्या लक्षांत यावा."

++ ++ ++

## ४ बहुरत्न्याने झोळी पसरलीच आहे.

स्वत:बद्दल बोलतांना कोल्हटकर म्हणतात ....

(४०७) " माझ्या सुहृदांना जेव्हां मी या काळच्या एकेक गोष्टी ऐकवी, तेव्हां ते मला हें सर्व लिहिण्याचा आग्रह करीत. मला वाटे, आपल्या सांगण्यात काही चूक तर होत नाही ना? एरवी इतक्या थोरामोठ्यांच्या गोष्टी ऐकून हें लिहिण्याचा आग्रह कसा करतात? माझ्या भोवतालच्या श्रेष्ठ पुरुषांच्या पुढे मी इतका लहान आहे, इतका ठेंगू आहे की त्या पुरुषांची उंचीही मला नीट न्याहाळता येत नाही. कळसाला तर दृष्टीही पोहोचत नाही. तेव्हां त्यांच्या उंचीचा गुण गौरव मी कसा काय करूं शकणार? सुहृदांचे म्हणणें " तुम्ही कोणत्याही शब्दांत कशाही भाषेत सांगितलेंत तरी तुमच्या कथानायकांचे तेज असें प्रभावी आहे की शब्दांचें किंवा भाषेचे कवच फोडून तें प्रकाशित झाल्याविना राहणार नाहीत.

लेखन समाप्ती नंतर मी पाहू लागलों, विचार केला, खरेंच आहे. एवढ्या सबंध ग्रंथात माझें काय आहे? आहे तें सर्व त्यांचेंच. त्यांचींच नाटकें, त्यांचींच मतें, त्यांच्याच सहवासांतील महत्त्वाच्या गोष्टी, क्वचित प्रसंगीं आपल्याकडून मत देण्याचा आगाऊपणा झाला असेल तेवढाच. तेवढ्यासाठीं वाचकांना नम्रपणें क्षमस्व म्हटलें म्हणजे झालें.

त्या थोरांची माझ्यापाशीं असलेली, माझ्या दरिद्री सावधानतेने सांभाळलेली विचारांची व स्मृतींची ठेव आज सुहृदांच्या आग्रहाने तुमच्या स्वाधीन करून मी मोकळा होत आहे. अशा प्रकारें आजवर जतन केलेलें, ज्याचें त्याला

देऊन टाकल्यावर हा बहुरूपी उघडा पडेल की काय याची चिंता वाटून त्या थोर नाटककाराच्या पुण्याईने स्वतंत्र भारताच्या राष्ट्रपतींकडून त्याचा सन्मान करवून त्याच्या अंगावर बहुमोल वस्त्र घातलें. या जगातील नाट्यक्षेत्रात भारतीय कलावंताचा जो परमोच्च मान तो मला लाभला.

या ग्रंथातील जें उत्कृष्ट तें कथा नायकाचें, रसाळ तें आग्रही सुहृदाचें आणि दर्पयुक्त म्हणजेच त्याज्य तें माझें. त्यासाठीं बहुरूप्याने आपली झोळी पसरलीच आहे. ॥

** ** **

## ..२४.  मला काय वाटतें ?

आधुनिक आत्मचरित्रापैकीं काहींची थोडी ओळख त्या आत्मचरित्र-कारांच्याच भाषेंत करून घेण्याचा आपण या प्रकरणांत आता पर्यंत प्रयत्न केला. मनुष्याच्या लेखनांत त्याचा स्वभाव प्रगट होतो असें म्हणतात. त्या प्रमाणे या प्रकरणांत वाचलेल्या उताऱ्यावरून अगदी ओझरता का होईना पण त्या आत्मचरित्र काराचा स्वभाव किंवा त्याच्या स्वभावांतील एखाद्या कप्प्याचें तरी दर्शन वाचकांना झालें असेल असा माझा क्यास आहे. आता या आत्मचरित्रांविषयीं मला काय वाटतें हें ही मी सांगितलें तर तें अनाठायी होईल असें वाटत नाही. कारण अमुक एका आत्मचरित्रापासून कोणता बोध घेतायेण्यासारखा आहे, अमुक एक आत्मचरित्र वाचनीय कसें आहे, अमुक एका आत्मचरित्रकाराने कशावर भर दिलेला आहे, अमुक एका आत्मचरित्रकाराकडून कोणती चूक घडली इत्यादि माहिती मी वाचकांना सांगितली तर ~~किंवा~~ तिचा त्यांना खात्रीने उपयोग होईल. अर्थात् ही माहिती मी त्या आत्मचरित्रांच्या आधारानेच सांगणार आहे हें सांगायला नकोच. आत्मचरित्रांची येथे दिलेली माहिती आणि त्या आत्मचरित्राविषयीं मला काय वाटतें म्हणून सादर केलेलें वर्णन सर्वतोपरी पूर्ण आहे असें बिलकूल नाही. परंतु त्यामुळें जर वाचकांची जिज्ञासा वाढून तें आत्मचरित्र वाचण्याची त्यांना इच्छा झाली तर माझा हेतु सफल झाला असें म्हणायला हरकत नाही.

### : १ :  अ रु णो द य.

या आत्मचरित्रांतील पुढील उतारा पहा (१) "बाबा पद्मनजी कोसार राहणार मुंबई यांहीं गेल्या २० वे तारखेस ख्रिस्ती धर्म [illegible]गावास

अरुणोदय .. पुनर्मुद्रण ऑगस्ट १९५५ .. बाबा पदमनजी पृष्ठ २१०

स्वीकारला. हें वृत्त वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेंच आहे. .......सर्व मनुष्यास आबाबल्यापरी शहाणपणाचा ताठा असतोच आणि हा क्रम दीर्घ काळा पासून चालत आला आहे. तेव्हां बाबा पदमनजीने लिहिलें याचा मोठा हर्ष मानावा असें नाही. परंतु आपण जें करितों तेंच लोकांनी आचारावें हें बोलणें बरीक उपहास्पद होय. (ज्ञानप्रकाश) "

अशात-हेने ज्ञानप्रकाशकारांनी सुरुवातीसच बाबा पदमनजी हे कासार आहेत असें म्हणून पुढे त्यांच्या मतांची मातब्बरी निरोपयोगी ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. आणि कारण काय तर बाबा पदमनजींचें बोलणें गर्वाचें आहे म्हणून. परंतु अशा त-हेनें हिंदुधर्मांतून इतर धर्मांत जाणारे शिकले सवरलेले लोक घमेंडखोर किंवा 'वेडे' म्हणून हें प्रकरण निकालात काढण्यासारखें नाही. आम्ही ज्ञानप्रकाशकरांना दोष देत नाही. कारण त्या वेळी समाजांत सुशिक्षितांची संख्या फारच थोडी होती.

परंतु गेल्या पन्नास पाऊणशे वर्षांत शिक्षणाचा प्रसार होऊन आज सुशिक्षितांची संख्या वाढली आहे. तसेंच आपण स्वतंत्र होऊन तेरा वर्षें लोटली आहेत. परंतु आजच्या घटकेसही काश्मीरपासून तर कन्याकुमारीपर्यंत आणि सिंधपासून तर आसाम पर्यंत रानोमाळ राहणाऱ्या आदीवासी, भिल्ल, कातकरी, इत्यादि असंख्य वन्य जातींत ख्रिस्ती धर्म प्रसाराचें मिशनऱ्यांचें काम किती झपाट्याने चालू आहे याचा हिंदुधर्मांतील विचारवंतांनी विचार करावा. परधर्मीयांच्या प्रचारा विरुद्ध निव्वळ नाकडोळे मोडण्यात अर्थ नाही. त्यांचें संघटनाचातुर्य, पैशाचें प्रलोभन, जगांतील सर्व भागांतून मिशनऱ्यांच्या कार्याचें पसरलेलें सुसंबद्ध जाळे आणि मुख्य म्हणजे या प्रचारासाठी अहोरात्र तळहातावर

शिर घेऊन स्वार्थत्यागाने कार्य करणारे त्यांचे कार्यकर्ते जोवर आपण आपल्या समाजांत निर्माण करणार नाही तोंवर हिंदुधर्माला लागलेली ही गळती थांबणार नाही हें आपण पक्कें लक्षांत ठेवावें. मुख्य म्हणजे हिंदुधर्मांतील झाडुन सर्व जातींना फुलांच्या हाराप्रमाणें एकत्र गुंफण्याचें कांहीच साधन नाही. उलट फुटीर वृत्ति, एकमेकांचा व्देष आणि एकमेकांना कमी लेखणें यातच आपण फुशारकी मारतो. यामुळे हिंदुधर्म हिंदुस्थानांतच हळुहळू अल्पसंख्य होतो की काय असें भय वाटू लागलें आहे. अर्थात् या विषयीं काय उपाय योजना करावी हें सविस्तर सांगण्याचें हें ठिकाण नव्हें. तरीही या गोष्टींचा नामनिर्देष करणें आणि विचारवंतांना व सामाजिक कार्यकर्त्यांना इषारा देणें हें अगदी आवश्यक वाटल्यावरून येथे आम्ही मुद्दाम सांगितलें आहे.

## २ दादोबा पांडुरंग.

दादोबा पांडुरंग यांचें आत्मचरित्र मोठे मार्मिक असें आहे. समाजाच्या उन्नतीसाठी वेळोवेळी जे विचार सुचतील ते लिहून ठेवावेत कारण "इतकेंही जर येथे केलें नाही तर येथे जनाचा आणि पुढे ईश्वराचा अपराध केल्यासारखें होईल." म्हणजे समाजाच्या कल्याणासाठी आपणास सुचलेले सुविचार लिहून ठेवलेच पाहिजेत अशी जबर जास्त इच्छा त्यांना नसती तर प्रकृति ठीक नसतांनाही त्यांनी हें लिहून ठेवण्याचें कार्य केलें नसतें. इतकेंच काय पण त्यावेळी प्रकाशनाबाबत अनेक अडचणी असून त्यांच्या हयातींत आत्मचरित्र प्रकाशित होण्याची बिलकूल शक्यता नसतांनाही त्यांनी उतार वयांत टाचणें लिहून ठेवलीं. यावरून त्यांच्या ठिकाणची समाजसेवेची तळमळ अधीकच उठून दिसते.

त्यांचा स्वभाव भीडस्त होता. त्यामुळें त्यांचें सांपत्तिक नुकसान झालें हें त्यांनी अगदी मोकळ्या मनाने सांगितलें आहे. म्हणजे आत्मचरित्रकाराने तटस्थता स्वीकारून एखाद्या न्यायाधिशाप्रमाणे त्याने आपल्या कृत्यांचा न्याय निवाडा केला पाहिजे आणि हें जाहीर करण्याचें मनःसामर्थ्यही त्याजजवळ असायला पाहिजे. हें दादोबांच्या जवळ खचित होतें. (१) त्यांचा स्वभाव भिडस्त नसता आणि त्यांना सांपत्तिक अडचणींना तोंड द्यावें लागलें नसतें तर ते महाराष्ट्रातले राजा राममोहनरॉय झाले असते. " राजाराम मोहनरॉय प्रमाणें दादोबा यशस्वी झाले नाहीत याचें कारण त्यांची गरीबी होय. राम मोहनची वडिलोपार्जित इस्टेट होतीच. शिवाय दहा वर्षे त्यांनी इतकी जमीन घेऊन ठेवली की दरवर्षी त्यांना दहा हजारांचे उत्पन्न येई. त्यामुळें राजाराम मोहन रॉय मध्ये एक प्रकारची तडफ व बेफिकीर झुंजारवृत्ती दिसून येते. मिशनरीही त्यांचे आश्रित असत. परंतु दादोबा गरीबीत जन्मले आणि गरिबीतच वारले. त्यामुळें आर्जवांत व सगळ्यांशी नमून वागण्यात त्यांचा जन्म गेला. "

दादोबांच्या आत्मचरित्रांतून दिसणारी तिसरी महत्त्वाची बाब अशी की त्यांची सूक्ष्म निरीक्षणशक्ति ही होय. त्यांनी लिहिलेलें एखाद्या प्रसंगाचें वर्णन वाचतांना तें दृश्य मनःचक्षूसमोर उभें राहतें. त्यावरून त्यांचें भाषेवरही प्रभुत्व होतें यांत शंका नाही.

या दृष्टीने त्या काळीं इंग्रज राज्यकर्त्यांनी जंगलांतील वाटेंत मधून मधून भिल्ल लोकांचेच पहारे बसवून त्यांच्या करवी प्रवाशांना लुटारू आणि डाकू लोकांपासून उपद्रव होऊं नये असा बंदोबस्त केला, हें वर्णन उल्लेखनीय आहे.

स्वातंत्र्य मिळून आज तेरा वर्षे लोटलींत तरीही मध्यप्रदेशांतील

(१) दादोबा पांडुरंग .. संपादक व चरित्रलेखक .. श्री. अनंत काकबा प्रियोळकर पृष्ट २७२.

चंबळ नदीच्या किनाऱ्यावरील भिंड मुरेना इत्यादि भागातील लुटारू आणि दरोडे खोरांचा बंदोबस्त सरकारला करता आला नाही. अशावेळी पूर्वी ब्रिटिशांनी अशा लुटारूंचा बंदोबस्त कसा केला होता हें विचारांत घेण्यासारखें आहे.

इत्यादि अनेक कारणामुळे दादोबांचें आत्मचरित्र पहिल्या श्रेणींत गणलें गेल्यास नवल तें काय !

## २ आमच्या आयुष्यातील आठवणी.

न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांच्या पत्नि श्रीमती रमाबाई रानडे यांनी या आठवणी लिहिल्या आहेत. त्या मोठ्या हृद्य आहेत. या पुस्तकाला नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी प्रस्तावना लिहिली आहे. ती सर्वच मोठी बोधप्रद आहे. येथे अगदी थोडासाच भाग देतो. म्हणजे 'आमच्या आयुष्यातील आठवणी,' या आत्मचरित्राचें वेगळें मूल्यमापन करायची आवश्यकता नाही.

(१) " हें पुस्तक वाचणाराचें मनावर ज्या कित्येक गोष्टींचा ठसा उमटल्याशिवाय राहणार नाही, त्यांपैकी एकदोहोंचा येथे उल्लेख करणें जरूर वाटते. पाश्चात्य समाजांत पुष्कळ कुटुंबांत पतिपत्नीमध्ये पराकाष्ठेचें प्रेम आढळतें पण त्यांचा परस्परभाव बहुतेक बरोबरीचा असतो. पण तशा तऱ्हेचेच प्रेम उभयतामध्ये असता पत्नीने पतीच्या सेवेस आपणास सर्वस्वी वाहून घेऊन त्यातच धन्यता मानावी हा पूर्वेकडील स्त्रियांचा व त्यातही हिंदुस्थानातील स्त्रियांचा विशेष मनोधर्म आहे. हा मनोधर्म हजारो वर्षांच्या संस्काराचें व

---

(१) आमच्या आयुष्यातील आठवणी. प्रस्तावना लेखक ..गोपाळ कृष्ण गोखले २० एप्रिल १९१०.

परंपरेचें फल आहे व त्याचें अत्यंत मोहक स्वरूप या पुस्तकांत दिसून येत आहे. नवें शिक्षण, नव्या कल्पना व नवी परिस्थिती यांनी विचारास व आयुष्यक्रमास नवें वळण लागलें असताही वहिनीबाई सारख्या स्त्रियांचा हा मनोधर्म आहे तसाच कायम राहतो, यापासून पुष्कळ बोध घेता येण्यासारखा आहे.

दुसरी गोष्ट वाचकांच्या विशेष लक्षांत येईल ती ही की जी पिढी आता बहुतेक जात चालली आहे, तिला स्त्री शिक्षण वगैरे समाजसुधारणेचे बाबतींत ज्या अडचणी सोसाव्या लागल्या त्या संबंधाची होय. सध्याच्या पिढीस या अडचणींची फारशी कल्पना नाही व काही काळाने त्या अजिबात नाहीशा होतील हें स्पष्ट दिसत आहे. तथापि आरंभीच्या लोकास त्या पासून कसा दुःसह त्रास झाला व त्यांनी तो सोसून समाजावर केवढे उपकार केले याची आठवण आपणामधून जाऊं देणे केव्हांही इष्ट होणार नाही. ही आठवण कायम ठेवण्याचें कामीं प्रस्तुत ग्रंथाचा उत्कृष्ट उपयोग होईल व याही दृष्टीने तो लिहिल्याबद्दल श्री. वहिनीबाईंचें अभिनंदन करणें जरूर आहे. "

## ४ निवेदन.

' निवेदन ' या आत्मचरित्राचे लेखक धर्मानंद कोसंबी यांना आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी मोठी कळकळ वाटत होती. कोणत्याही सुसंस्कृत मातापित्यांना तशी वाटणें स्वाभाविक आहे. कारण शिक्षणाशिवाय मनुष्याचें जीवन व्यर्थ आहे. आज हिंदुस्थानांतील शिक्षणाचें शेकडा प्रमाण पाहता सुशिक्षित लोकांनी अडाणी लोकांच्या उध्दारासाठी किती कार्य करायला पाहिजे याची कल्पना येते. कारण आपल्या या खंडप्राय देशाची सर्वतोपरी उन्नती शिक्षणावर

आणि सच्चारित्र्यावर अवलंबून आहे.

या आत्मचरित्रावरून निदर्शनास येणारी दुसरी महत्त्वाची बाब ही की आळसामध्यें आपल्या मुलांनी आयुष्य घालवू नये म्हणून धर्मानंदांना वाटणारी काळजी ही होय. कारण माणसाचा सर्वांत मोठा शत्रु आळसच होय. आणि आपल्या देशांतील पुष्कळ लोक आपला पुष्कळसा वेळ आळसांत आणि चकाट्या पिटण्यात घालवितात ही मोठी लाजीरवाणी गोष्ट आहे. देशाचें भवितव्य उज्वल होण्याच्या दृष्टीने दीर्घोद्योगी लोकांची संख्या वाढली पाहिजे. कारण वैयक्तिक आणि राष्ट्रीय भरभराट मग ती कोणत्या का क्षेत्रांत असेना सतत उद्योग केल्याशिवाय होणार नाही. हें आपणा सर्वांना जितक्या लौकर समजेल आणि त्या प्रमाणें आपण प्रत्यक्ष कृतीला लागू तितकें चांगलें.

## ५ आत्मवृत्त

डॉक्टर धोंडो केशव उर्फ अण्णासाहेब कर्वे यांचें आत्मवृत्त उत्कृष्ट आहे. एक मनुष्य दृढनिश्चय, कळकळ आणि सतत उद्योग यांच्या जोरावर काय करू शकतो याचें मूर्तीमंत उदाहरण म्हणजे अण्णांचे आत्मचरित्र होय. या आत्मचरित्रांत पाना पानावर लेखकाची कळकळ आणि आत्मीयता दिसून येते. म्हणजे 'आपण एक सामान्य गृहस्थ आहोत आणि आपण केलें तें इतरांनाही करता येणें शक्य आहे,' असेंच त्यांनी ध्वनित केलें आहे.

फुलें कोणतीही असलीं तरी त्यांची टवटवी, नाजुकता आणि त्यांचा रंगीबेरंगीपणा पाहून आपण मोहित होतों. त्यांतच त्या फुलांना सुगंध असेल तर तीं आपणास हवी-हवीशीं वाटतात. तसेंच हें आत्मचरित्र आहे. भाषा साधी आणि

सोपी आहे. म्हणजे सामान्य मनुष्याने अण्णांचें आत्मचरित्र वाचायला घेतलें तरी त्यालाही कंटाळा येणार नाही.

यातच अण्णांनी हें सर्व आत्मवृत्त नम्रतेनें सांगितलें आहे. खरा विव्दान् मनुष्य नम्र असतो. त्यामुळें या आत्मवृत्ताची गोडी अविट आहे. या आत्मवृत्तापासून सामान्य मनुष्यालाही स्फूर्ति मिळते आणि वाटतें की आपणही काहीतरी करूं या. एखाद्या स्त्रीचें लावण्य इतकें अप्रतिम असतें की ते साध्या पोषाखातही उठून दिसतें. उलट एखाद्या स्त्रीनें कितीही डामडौल केला तरी ती सुंदर नसल्याने तिच्या नटण्यामुरडण्याला कृत्रिमपणाचा वास येतो. अण्णांच्या आत्मचरित्रांत कोठेही ओढून ताढून आणलेली भाषा नाही. जें काही घडलें ते सांगायचें आहे या धोरणाने सांगितल्यामुळें आत्मवृत्त अधिकच आकर्षक झालें आहे.

या आत्मवृत्तांतील आणखी एका गुणाचा उल्लेख येथें करावासा वाटतो. तो म्हणजे अण्णांची सांगण्यातली सचोटी. तुम्हांला या साडेपांचशें पृष्टांच्या आत्मवृत्तांत कोठेही अतिशयोक्ति आढळणार नाही. सर्व वर्णन आपण वाचीत असतांना या गोष्टीचा पुन्हा पुन्हा प्रत्यय येतो. काही माणसें खूप बोलतात पण तें काय बोलले हेंच समजत नाही. आणि काही माणसें न बोलतांनाही त्यांच्या चेहऱ्यावरून आणि कृतीवरून लोकांना जें काही समजायचें तें लोक समजून जातात. म्हणजे संबंध आत्मवृत्तांत कोणत्याही तऱ्हेचें अवडंबर नाही. या आत्मवृत्ताच्या उत्कृष्टतेबद्दल बोलायला लागलों तर पांच पन्नास पृष्ठें होतील इतकें मला सहज सांगता येईल. परंतु इतकी जागा नाही. मी फक्त एवढेंच सांगतों की आपल्या मराठी भाषेंत अण्णांचें आत्मवृत्त आहे याचें

आपणासर्वांना मोठें भूषण आहे. मला नर मराठींतील पांच उत्कृष्ट आत्मचरित्रांची नांवें सांगायला सांगितली तर या आत्मवृत्ताचा समावेश मी मोठ्या आनंदाने करीन.

आपण ज्या समाजांत राहतों त्याचें ऋण आपण फेडावें अशी ज्यांना ज्यांना इच्छा आहे त्यांनी त्यांनी अण्णाचें आत्मवृत्त अवश्य वाचावें असें येथें मुद्दाम सांगावेसें वाटतें.

६

## माझें पुराण.

' माझें पुराण ' हें आनंदीबाई कर्वे यांचें आत्मचरित्र आदर्श असें आहे. पुस्तकाच्या अथपासून तर इतिपर्यंत सत्य घटनांची बैठक आहे. त्याशिवाय मला " गूळ फार आवडत असे आणि मी बोटाने खरडून चोरून खात असे ' असें लेखिकेने कबूल केलें नसतें.

या आत्मचरित्रांतून प्रत्ययास येणारा दुसरा महत्वाचा भाग हा की आपल्या मुलामुलींच्या उद्धारासाठी बायकांनीच कंबर कसली पाहिजे " असा लेखिकेने स्वानुभवाने सांगितलेला महत्त्वाचा उपदेश हा होय. आयुष्याचा जोडीदार सुयोग्य मिळाला आणि त्याच्या बरोबर आयुष्य सुखांत गेलें म्हणजे आयुष्याची इतिकर्तव्यता झाली असें स्त्रीयांनी समजू नये. उलट मुलांच्या भलाईसाठी आणि त्यांच्या मनावर चांगले संस्कार करण्यासाठी स्त्रीयांनी आयुष्यभर उद्योग करावा. वेळ आळसांत घालवू नये. आपल्या मुलांचें भविष्य उज्वल व्हावें म्हणून स्वतः लेखिकेने किती खस्ता खाल्या यांचें प्रत्यंतर आत्मचरित्रांत पुष्कळ ठिकाणी आहे.

वाटयाला येईल तें काम मोठ्या निष्ठेने करणें, आपल्या वागण्याने मुलांच्या मनावर वाईट परिणाम होऊ नये म्हणून खबरदारी घेणें, त्यांना शिक्षणाची गोडी लावणें, घरात सुख, शांती आणि समाधान नांदेल म्हणून दक्षता घेणें, कोणाचेही मिंधे राहू नये म्हणून जवळ दोन पैसे बाळगून असणें अशा अनेक गोष्टी सर्वांनी शिकण्या सारख्या आहेत. आपली पुराणा बद्दलची भावना अशी की पुराणात भाकडकथा या असतातच. परंतु 'माझें पुराण' या आत्म चरित्रांत भाकडकथा बिलकूल नाही. उलट हें आत्मचरित्र प्रत्येकाने एकवेळ तरी वाचावें असें निक्षून सांगावेंसें वाटतें.

## ७ माझी कहाणी

'माझी कहाणी' हे पार्वतीबाई आठवले यांचें आत्मचरित्रही 'माझे पुराण' प्रमाणेंच हृद्य आहे. वयाच्या पंचविशीनंतर पार्वतीबाईंनी शिकायला सुरुवात केली. आणि तरीही त्यांनी मोठ्या चिकाटीनें शिक्षण घेऊन इंग्रजी भाषेचेंही थोडें फार ज्ञान संपादन केलें. त्यासाठी त्यांना अनेक आपत्तींना तोंड द्यावें लागलें. तरीही त्यांनी त्यांतूनच मार्ग काढला. विद्या मिळविण्यासाठी माणसाने लाजू नये. 'लोक काय म्हणतील ?' याचा बाऊ करू नये. कारण शिक्षणा शिवाय सुविचारांची जोपासना व्हायला वाव मिळणार नाही.

मात्र कोणत्याही कार्यांत माणसाची प्रबळ निष्ठा ही पाहिजेच पाहिजे. त्याशिवाय मनुष्य हालअपेष्टा सहन करू शकणार नाही. ही निष्ठा, तळमळ आणि त्याग करण्याची तयारी पार्वतीबाईंच्या जवळ नसती तर त्यांच्या हातून काहीच कार्य झालें नसतें. म्हणूनच त्यांचें आत्मचरित्र वाचनीय असें आहे.

** ** **

८

## स्मृति चित्रें.

लक्ष्मीबाईंनी लिहिलेली 'स्मृतिचित्रें' खरोखर अप्रतिम आहेत. त्यांना साहित्यलक्ष्मी ही पदवी खरोखरच शोभते. स्मृतिचित्रांत अमुक एक चांगली गोष्ट नाही असें नाही. पानापानावर सत्यता आहे. कोणताही प्रसंग फुगवून सांगितलेला नाही. त्यांच्या प्रांजलपणाला तर सीमा नाही. एक अशिक्षित हिंदु स्त्री पतीच्या सहवासांत राहता राहता सुशिक्षित कशी होते, विचारांनी आणि कृतीने पुरोगामी कशी बनते, स्वखुशीने ख्रिस्ती धर्म कां स्वीकारते, रंजल्यागांजलेल्यासाठी तिळतिळ कशी तुटते, पतीच्या आयुष्यांतील घटना आणि त्या अनुषंगाने स्वतःच्याही जीवनांतील घटना सांगण्यांत कशी तन्मय होऊन जाते, त्या तन्मयतेमुळेंच जीवनांतील भावतरंग सहज सोप्या भाषेतजणु काही पुन्हा सजीव होऊन पुन्हा आपल्याशी कसे बोलू लागतात, दुःखाच्या प्रसंगांतून जातानाही त्यांच्या स्वभावांतील मूळचा विनोद पुन्हा पुन्हा वर कसा डोकावतो, त्यामुळें दुःखाने हताश होऊन न जाता करारी स्त्रीला शोभेसें वर्तन त्यांच्या हातून कसे घडतें, आणि त्यांना 'स्मृति चित्रें' सांगण्याची तळमळ लागल्यावर उतार वयांतही त्यांनी केलेला प्रचंड उद्योग पाहिला म्हणजे मन थक्क होऊन जातें. म्हणूनच लक्ष्मीबाईंनी 'स्मृतिचित्रें' मराठी भाषेत लिहिल्या बद्दल कुणाही महाराष्ट्रीय मनुष्याला अभिमान वाटल्या वाचून राहणार नाही. त्यांच्या आयुष्याचा चित्रपट पाहतांना आपणास कंटाळा म्हणून वाटत नाही. उलट तो पुन्हा पुन्हा पाहावसा वाटतो. इतकी स्मृतिचित्रांची गोडी अवीट आहे. म्हणूनच एका लेखकाने म्हटलें आहे की स्मृतिचित्रांच्या सारखा

आत्मचरित्रपर ग्रंथ जगाच्या भाषेतही असेल की नसेल शंकाच आहे. तेव्हां सांगायचा मुद्दा असा की 'स्मृति चित्रें' किती चांगली आहेत हें सांगता येणें कठिण आहे.

मंगलदायक अशा प्रातःकाळचें वर्णन कोणी आणि कसें करावें? शरद पौर्णिमेच्या वेळी चांदण्याची जी अवर्णनीय शोभा आपण अनुभवतो तिचें वर्णन कुठवर करावें? हिमालयाच्या अत्युच्च शिखराचें किंवा महासागराचें ~~वर्णन~~ वर्णन खरोखर कोणाला करता येईल का? तसेंच या स्मृतिचित्रांचें आहे. वाचकांनी तीं 'स्मृतिचित्रें' स्वतः पाहावींत, एवढेंच सांगितलें म्हणजे पुरे. अशा तऱ्हेनें सर्व गुणांनी युक्त आणि म्हणूनच मराठींतील सर्वोत्कृष्ट आत्मचरित्र लिहिल्याबद्दल साहित्यलक्ष्मी लक्ष्मीबाई टिळक यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत.

## ९ माझें क्रीडाजीवन

'माझें क्रीडा जीवन' हें पी. विठ्ठल यांचें आत्मचरित्र क्रिकेट सारख्या लोकप्रिय खेळाबद्दल असल्याने तें आपलें चित्र एकदम वेधून घेतें. जीवनात मनुष्य व्यापार, उद्योग, शेती, एखादा सहकारी कारखाना किंवा इतर अनेक क्षेत्रांत उद्योग करीत असतो. परंतु शिक्षण आणि लेखनकला अवगत नसल्याने अशा अनेक व्यक्तींना आपले अनुभव सांगता येत नाहीत. या दृष्टीने पी. विठ्ठल यांचें आत्मचरित्र मोठें मार्मिक असें आहे. फारसें शिक्षण झालेलें नसतांनाही आणि परिस्थिती सर्वस्वी विरोधी असूनही केवळ स्वतःच्या कर्तबगारीवर मनुष्य किती मोठा नांवलौकिक मिळवू शकतो याचें उत्तम उदाहरण म्हणजे पी. बाळू, पी. शिवराम आणि पी. विठ्ठल यांचें क्रीडाजीवन हें होय.

हे तिघेही बंधु उच्च वर्णियांतील नसल्याने त्यांना क्रिकेट सारख्या आंतरराष्ट्रीय खेळांतही किती मनस्ताप सोसावा लागला आणि त्यांचा किती अपमान झाला हें वाचले म्हणजे आपल्या हिंदु समाजांतली जातीयता आणि जातीयव्देष या मुळे कर्तबगार व्यक्तींना आपल्या गुणांची वाढ करून घ्यायला योग्य वाव मिळत नाही हें स्पष्ट होतें. आपल्या सद्गुणाबद्दल आणि कर्तबगारी बद्दल आपली समाजाने वाहवा करावी असें जें प्रत्येक व्यक्तीला वाटतें ती वाह-वाही कोणी करित नाही, उलट खालच्या जातींतील मनुष्याला आपली बहुतेक शक्ति अपमानाचें, निरुत्साहाचें आणि नाउमेदीचें शल्य सहन करण्यातच खर्च करावी लागते. त्यामुळें त्यांना वर येणे मुष्कीलीचें होऊन जाते. म्हणून आपल्या समाजाचें फार नुकसान होत आहे. परंतु अजूनही समाजांत आर्थिक, सामाजिक आणि राजकीय समता आणि बंधुभाव स्थापण्याच्या बाबतीत आपल्या कडून व्हायला पाहिजेत तेवढे निष्ठापूर्वक प्रयत्न होत नाहीत उलट परधर्मीयांचे प्रयत्न या बाबतीत फार जोरदार आहेत हें पाहून मन विषण्ण होऊन जातें.

पी. विठ्ठल यांनी क्रिकेट खेळाडूंना काही सूचना केल्या आहेत. त्या मोठ्या उपयुक्त अशा आहेत कारण ते त्यांचे स्वानुभवाचे बोल आहेत. क्रिकेट मधील प्राविण्याबद्दलच त्यांची कीर्ति हिंदुस्थानांत आणि परदेशांत पसरली. म्हणून त्यांनी दिलेल्या सूचना क्रिकेट खेळाडूंनी लक्षात घेण्यासारख्या आहेत.

या आत्मचरित्राचा उल्लेखनीय आणखी एक गुण असा की उच्चवर्णीया कडून त्यांच्यावर जो अन्याय झाला आणि त्यांना जो मनस्ताप सहन करावा लागला त्याबद्दल लेखकाने उच्चवर्णीयाबद्दल कोठेही अपशब्द उच्चारला नाही. हें लेखकास मोठें भूषणावह आहे. उलट न्यायमूर्ति रानडे आणि लोकमान्य टिळक

यांचे करून पी.बाळ यांचा जो जाहीर सत्कार करण्यात आला त्याबद्दल लेखकाने स्वतःचा गौरव झाल्याचें सांगितलें आहे. म्हणूनच 'माझें क्रीडा जीवन' हें मोठें हृद्य आणि पहिल्या पंक्तींत बसणारे आत्मचरित्र आहे हें कोणासही मान्य करावें लागेल.

## १०  एका शिपायाचें आत्मवृत्त

जनरल नानासाहेब गणपतराव शिंदे यांचें हें आत्मचरित्र आहे. एवढे मोठे पांचशें पृष्ठाहून मोठें आत्मचरित्र वाचतांना कंटाळा येत नाही कारण लेखकाची निवेदन शैली आकर्षक आहे. क्वचित् काही ठिकाणी वर्णनांत अतिशयोक्ति असल्याचा भास होतो परंतु घटना मात्र सत्य आहेत हें नाकारता येत नाही.

नानासाहेबांनी अगदी लहानपणापासून दारूला न शिवण्याचें ठरविलें आणि तो नियम जनरल सारख्या हुद्यावर विराजमान झाल्यावरही पाळला हें खरोखरच लेखकास भूषणावह आहे. दारूच्या व्यसनामुळें अनेकांचे हाल कोणी कुत्रा खात नाही. आधीच दारू सारखे व्यसन, त्यांतच हालाखीची स्थिति, त्यांतच अज्ञानाचें भूत मानगुटीस बसलेलें म्हणजे मग त्या माणसाची आणि त्याच्यावर अवलंबून असणारांची स्थिती कशी दे माय धरणी ठाय होऊन जाते हें आजही प्रत्ययास येत आहे. यातून सुटका होण्याचा एकच रामबाण उपाय आहे आणि तो म्हणजे ज्ञानाची जोपासना हा होय. समाजांतल्या सर्व थरांतून विद्येचा झरा पाझरू लागला पाहिजे म्हणजे सुविचारांची पालवी फुटून समाजांतल्या सर्वांच्या जीवनांत ताज्या फुला फळा प्रमाणें टवटवी यायला वेळ लागणार नाही.

कारण जो मनुष्य खऱ्या शिक्षणाचे घोट दोन घोट पाणी प्याला आहे तो व्यसनांच्या आहारी जाणार नाही. उलट सद्‌विचारांची जोपासना करणें हाच स्वर्ग असें मानून त्या वर्तनातच स्वतःला धन्य समजेल.

या आत्मचरित्रांतील दुसरा उल्लेखनीय गुण असा की' ठरलेलें काम ठरलेल्या वेळी करण्याबद्दल लेखकाचा कटाक्ष ! नानासाहेब यांचें म्हणणें असें कीं या गुणामुळेंच त्यांचा उदय झाला. म्हणूनच त्यांना या गोष्टीचें महत्त्व फार वाटतें. हीच गोष्ट इतिहासकार गो.स.सरदेसाई यांनीही सांगितली आहे. हे दोघेही लेखक महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या आश्रयास होते. आणि दोघांनीही ठरलेलें काम ठरलेल्या वेळी करण्याचें महत्त्व वाखाणलें आहे. म्हणूनच वाचकांचेंही याबद्दल दुमत होईल असें वाटत नाही. हें आत्मचरित्र वाचकांनी अवश्य वाचावें हें येथे मुद्दाम सांगावेंसें वाटतें.

**११.** **गतगोष्टी अर्थात् माझी जीवनयात्रा.**

हें आत्मचरित्र साहित्य सम्राट नरसिंह चिंतामण केळकर यांचें आहे. त्यांच्या आत्मचरित्रातली पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे ' केळकरांची भाषा ' ही होय. सुरुवातीचीं काही पृष्ठें तर भाषेच्या सरसपणाच्या बाबतींत इतकी उत्कृष्ट आहेत की त्याची सर इतर आत्मचरित्राला येणे कठिण आहे. त्यामुळे तीं पृष्ठें वाचतांना आपण एकदम तन्मय होऊन जातो.

केळकरांच्या आत्मचरित्रांतून • प्रत्ययास येणारा दुसरा • नवल विशेष ' हा की ' केसरी ' ' मराठा ' या भारदस्त पत्रांचें संपादकत्व करूनही केळकरांनी

अनेक विषयावर अनेक पुस्तकें मोठ्या चित्ताकर्षक भाषेत लिहिलीं आहेत. लोकमान्य टिळक मंडालेच्या तुरुंगात असतांना ' केसरी ' आणि ' मराठा ' पत्रांचें संपादकाचें काम म्हणजे खिशांत विस्तव घेऊन वावरण्यासारखें होतें. परंतु केळकरांनी हें कार्य मोठ्या चिकाटीने आणि कौशल्याने केलें यांत संशय नाही. हें इतकेंही कार्य एखाद्यानें केलें असतें तर तो गौरवास पात्र ठरला असता. परंतु केळकरांची बुध्दि तीक्ष्ण आणि त्यांची लिहिण्याची हौस जबरदस्त म्हणूनच त्यांनी अनेक पुस्तकें लिहिलीं. त्यांना ' साहित्य सम्राट ' म्हणून लोकांनी जें गौरविलें तें योग्यच होय. केळकरांचें कोणतेही पुस्तक वाचायला घ्यावें तरत्यांत त्यांचें भाषाप्रभुत्व आणि माहीतीची विपुलता या गोष्टी चटकन प्रत्ययास येतात.

या ' गत गोष्टी ' ना शेवटी शेवटी आत्मसमर्थनाचें जें गालबोट लागलें आहे तें लागलें नसतें तर या गतगोष्टी उत्कृष्ट ठरल्या असत्या. पण तरीही हें आत्मवृत्त ' आहेत त्या साधनांत साधेल तें करावे ' हें केळकरांचें आवडतें तत्व प्रत्येकाच्या मनांत बिंबविण्यास समर्थ आहे यांत संशय नाही.

१२ माझी संसार यात्रा

हें इतिहासकार गोविंद सखाराम सरदेसाई यांचे आत्मचरित्र आहे. वडिलांच्या सांगण्यावरून त्यांनी लहानपणींच ' विष्णुसहस्त्रनाम ' हें स्तोत्र पाठ केलें. तें नित्य नियमाने ते म्हणत असत. एवढेंच काय पण उतार वयांतही रात्री झोपतांना मनांत काही दुसरा विचार घोळत नसेल तर ते विष्णुसहस्त्रनाम म्हणत असत. निव्वळ हें स्तोत्र म्हटल्याने आपला भाग्योदय झाला असें त्यांनी कोठेही म्हटलें नाही. परंतु हें स्तोत्र दररोज स्नानानंतर म्हटल्याने

' आपला भाग्योदय होणार आहे ' असा विचार त्यांच्या मनांत यायला अवसर मिळाली असेल असें वाटतें.

मनुष्याच्या जीवनांत निष्ठा किंवा श्रध्दा नसेल तर त्याच्या हातून कोणतेंही कार्य आपुलकीने होणार नाही. कारण निष्ठा नसेल तर तो त्याग करणार नाही, निष्ठा नसेल तर तो वेळेचा सदुपयोग करणार नाही आणि निष्ठा नसेल तर आपण समाजाचे आपल्या परीने पांग फेडले पाहिजेत या विचाराने प्रवृत्त होऊन तो काही कार्य करणार नाही. वास्तव निष्ठेचें मोल सांगता येण्यासारखें नाही. दिर्घोद्योग आणि नियमितपणा यांच्या जोडीस एक निष्ठा असेल तर मनुष्याचा उदय केव्हातरी झाल्याशिवाय खचित राहात नाही हें सरदेसाईंच्या आत्मचरित्रावरून सहजासहजी पटण्यासारखें आहे.

## १२ माझ्या आठवणी व अनुभव

कर्मवीर विठ्ठल रामजी उर्फ अण्णासाहेब शिंदे यांचें 'माझ्या आठवणी व अनुभव' हें आत्मचरित्र मोठें मार्मिक असें आहे. त्यांच्या हयातींत महाराष्ट्रांत ब्राम्हण आणि ब्राम्हणेतर हा वाद फार उग्र स्वरूपाचा होता. परंतु अण्णासाहेबांचें मत असें होतें की समाजांतील सर्व प्रकारच्या लोकांची उन्नति झाली पाहिजे. सर्व समाज एकजीव झाला पाहिजे. या साठीच आपण जाती मोडल्या पाहिजेत. कारण जाती म्हणजे हेवेदावे, भांडणें आणि एकमेकांचा तिरस्कार करणें. या मुळेंच आपली पूर्वी फार अधोगती झाली. या साठी आपण जातीयवादी धोरण सोडून दिलें पाहिजे. त्या काळच्या मानाने अण्णासाहेबांचे विचार फारच पुरोगामी होते असें दिसून येतें.

त्यांच्या 'आठवणी व अनुभवावरून' प्रत्ययास येणारी दुसरी महत्त्वाची गोष्ट ही की त्यांनी आपलें सर्व जीवन समाजसेवेंत घालविलें. कोणत्याही देशाचा मोठेपणा तेथील लोकांच्या स्वार्थत्यागावरून, उद्योगावरून आणि महत्त्वाकांक्षेवरून दिसून येतो. अण्णासाहेबांच्या आणि त्यांच्या सारख्याच थोर पुरुषांच्या त्यागामुळे बहुजनसमाजांत आज प्रगती होत असलेली दिसत आहे. त्या वेळी बहुजन समाजांत शिक्षणाची गोडी नव्हती. अस्पृश्यांचे हाल तर विचारूच नका. अशा विरोधी परिस्थितीतही अस्पृश्यांच्या उद्धारासाठी अण्णासाहेबांनी किती खस्ता खाल्या हें पाहिलें म्हणजे त्यांच्याविषयी आदर वाटतो आणि आपण आपोआपच विनम्र होतो. त्यांच्या कार्याचें मोल त्या वेळच्या लोकांना कळलें नाही, तें आज अधिकाधिक पटत आहे. अर्थात् हें बरोबरच आहे. मनुष्य जितका जवळ असतो तितका त्याचा मोठेपणा आपल्या लक्षांत येत नाही.

अण्णासाहेबांच्या 'आठवणी व अनुभवांचा' आणखी एक विशेष हा की त्या वेळच्या समाज सुधारणेच्या विरुद्ध असणाऱ्या लोकांवर यांनी कोठेही कोरडे ओढले नाहीत. त्यांच्या 'आठवणी व अनुभवांत' त्यांच्या मोठेपणाला साजेशीच भाषा सर्वत्र आढळते. म्हणूनच 'माझ्या आठवणी व अनुभव' या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत डॉ. वि. भि. कोलते यांनी काढलेले उद्गार किती यथार्थ आहेत ते पाहा "आपल्या सामाजिक कार्यामध्ये आलेले सगळ्या प्रकारचे अनुभव आत्मचरित्रपर आठवणी सांगणाऱ्या लेखकाने अवश्य नमूद करून ठेवायला पाहिजेत. त्यावरून समाजसेवकांना मार्गदर्शन तर लाभतेच पण शिवाय

मानवी स्वभावाचें सूक्ष्म ज्ञान करून घेण्याला मदत होते. अण्णासाहेबांसारख्या स्वभावतःच सात्त्विक पुरुषाची मनःशांती ढळण्याला कारणीभूत झालेले हे प्रसंग तितकेच दुःखदायक असले पाहिजेत. आणि मनात आणले असते तर त्यांना ते सरसतेने रंगवून वाचकांची सहानुभूती आपल्याकडे सहज खेचून घेता आली असती. पण अण्णासाहेब या मोहाला बळी पडले नाहीत. त्यांनी आपली लेखणी त्यापासून अत्यंत संयमाने अलिप्त ठेवली आहे ! "

यातच 'माझ्या आठवणी व अनुभव' या आत्मचरित्राचा मोठेपणा आहे हें सांगायला नकोच.

## १४ मी व मला दिसलेलें जग.

हें प्रोफेसर श्रीपाद महादेव माटे यांचे आत्मचरित्र म्हणजे त्यांच्या विशिष्ट भाषाशैलीचा उत्कृष्ट नमुना होय. जुन्या उपयुक्त शब्दांना माटे उजळा देऊन त्यांचा असा काही उपयोग करतात की ते शब्द एकदम ' फिट ' असल्यासारखे वाटतात. या विशिष्ट भाषाशैलीच्या जोरावर सूक्ष्म भाव व्यक्त करण्याची माटे यांची भाषाशैली डौलदार अशी आहे. त्यामुळे त्यांचें आत्मचरित्र वाचनीय असें आहे.

परंतु महात्मा ज्योतिबा फुले यांचे विषयी माटे म्हणतात (१)
" ज्योतीराव फुले ह्यांच्या प्रतिपादनात हाच दोष होता. प्रत्येक गोष्टीचें टिपरूं त्यांनी ' ब्राम्हणवर्गाच्या माथीं ठेवलें. त्यांची दृष्टी जरा जास्त

(१) मी व मला दिसलेलें जग ... श्री.म.माटे पृष्ट २१६

चोक्स असती तर क्षत्रीय आणि वैश्य ह्यांच्या ऐतिहासिक जीवनाकडे त्यांनी जास्त कसोशीने पाहिलें असतें. पण त्यांनी स्वतःच म्हटल्याप्रमाणें ख्रिस्ती मिशनर्यांच्या आवारांत त्यांनी तंबू ठोकला होता. पाहू गेलें तर त्यांच्या रुचिहीन प्रतिपादनांतील तत्वें धुवून पुसून विचारांत घ्यावयास कोणालाही हरकत वाटली नसती. ही एक विचारांची निराळी दिशा आहे असें लोकांना वाटलें असतें. पण त्यांनी लिहिलेलीं बारीकसारीक पुस्तकें जशीच्या तशीं मूळ स्वरुपांत वाचलीं म्हणजे उद्वेग उत्पन्न होतो. सुधारणेचीं तत्वें आणि हिंदु समाजांतील एका जातीला व हिंदु धर्मांतील तत्वज्ञानराशीला कुत्यानिपट करुन लिहिण्याची उर्मी ही दोन्ही एकत्र नांदावीत ह्याचा विस्मय वाटतो."

प्रोफेसर माटे यांनी मांडलेले मुद्दे असे ....

(१) ज्योतिबांनी प्रत्येक गोष्टींचे टिपका म्हणजे दोष ब्राम्हणांच्या माथीं मारला.

(२) ज्योतिबांनी ख्रिस्ती मिशनर्यांच्या आवारांत तंबू ठोकला.

(३) ज्योतिबांचें प्रतिपादन रुचिहीन होतें. आणि

(४) ज्योतिबांच्या बारिक सारीक पुस्तकांच्या वाचनाने उद्वेग उत्पन्न होतो.

आज हजारों वर्षांपासून हिंदुसमाजांत विद्या ही ब्राम्हणांच्या जवळ होती. तेव्हां विद्येचा प्रसार करण्याचें काम अर्थातच त्यांचेंच होतें. परंतु विद्येचा प्रसार तर केला गेला नाही आणि आपण तेवढे मोठे आणि बाकीचे चटसारे खालच्या दर्जाचे असें ब्राम्हणांनी वर्तन केलें. त्यामुळे ज्योतिबा सारख्या निष्ठावंत कार्य-

कत्यांनी याचा दोष ब्राम्हणांना दिला हें खरें आहे. यांत अतिशयोक्ति असणेंही शक्य आहे. कारण शिक्षण घेण्यासाठी बाकीच्यांचे हात कोणी बांधून ठेवले नव्हते. परंतु ब्राम्हण शिक्षक इतरांना शिकण्यास उत्साह न देता निरुत्साही करीत होते हें मात्र माटे यांनाही नाकारता येणार नाही.

प्रोफेसर माटे म्हणतात की ज्योतिबांनी आपला तंबू मिशनऱ्यांच्या आवारांत ठोकला होता. होय, तेथे रोवला होता. खरा. पण कशासाठी ? तर मिशनऱ्यांचें समतेचें तत्त्व स्वीकारण्यासाठी आणि हिंदु समाजांत सुधारणा घडवून आणण्यासाठी. ज्योतिबा जर द्रष्टे नसते आणि हिंदु समाजाबद्दल जर त्यांना पोटतिडिक नसती तर ख्रिस्ती धर्म स्वीकारून ते मोकळे झाले असते. पण त्यांनी तसें काही केलें नाही. उलट महारमांगासहित सर्वांना शिक्षण देण्याचें आणि हिंदुसमाजांत समता स्थापन करण्याचें खडतर कार्य ते अखेरपर्यंत करीत राहिले.

प्रोफेसर माटे म्हणतात की ज्योतिबांचें प्रतिपादन रुचिहीन होतें. तें तसें असेलही कदाचित. पण तें सत्यावर आधारलेलें आणि स्पष्ट होतें हें कोणालाही नाकबूल करता येणार नाही.

आणि प्रोफेसर माटे यांचा चवथा मुद्दा असा की ज्योतिबांची पुस्तकें वाचल्याने उद्वेग उत्पन्न होतो. तेव्हां तें बरोबरच आहे. कारण की सत्य हें जर आपणास आवडणारें नसलें तर तें आपणास झोंबणारच.

शेवटी आम्हाला एवढेंच सांगावेंसें वाटतें की महात्मा ज्योतिबा फुले यांनी जें जें लिहिलें आहे तें तें कोणत्या परिस्थितींत लिहिलें आहे हें आपण शांतचित्ताने जोंवर पाहणार नाही तोंवर त्यांच्या कार्याचें खरें स्वरूप आपणास कळणार नाही. वास्तव ज्योतिबांच्या वेळी असलेल्या सामाजिक

स्थितीचा अभ्यास प्रथम झाला पाहिजे. म्हणूनच आचार्य प्रल्हाद केशव अत्रे काय म्हणतात ते पाहा (१)"महान पुरुषांचें राष्ट्र तोच महाराष्ट्र. या महाराष्ट्रांत आजवर डोंगरासारखी मोठी माणसें होऊन गेली आहेत. त्या पैकी महात्मा फुले एक होते. महाराष्ट्राच्या वैचारिक भूमींतील प्रसुप्त शक्ति ब्रिटिश अमदानीच्या गेल्या शतकांत प्रकर्षाने प्रत्ययाला आली. पाश्चात्य संस्कृतीच्या शिंपणाने त्या काळांत बुध्दिवादी माणसांचें वारे माप पीकच आपल्या महाराष्ट्रांत आलें. महात्मा फुले, न्यायमूर्ति रानडे, विष्णुबोवा ब्रम्हचारी, आगरकर, लोकहितवादी, चिपळूणकर, टिळक अशीं अनेक रत्नें त्या काळांत पैदा झाली. व्यक्तीचें कार्य हें त्याच्या काळच्या परिस्थितीची प्रतिक्रिया किंवा अटळ परिपाक असतो. म्हणून कोणत्याही व्यक्तीच्या कार्याचें योग्य मूल्यमापन करायचें तर त्याच्या काळांतील परिस्थिती आधी समजावून घेतली पाहिजे."

प्रोफेसर श्रीपाद महादेव माटे यांनी ' अस्पृष्टांचा प्रश्न ' पुस्तक लिहिलें आहे. त्यावरुन त्यांनी अस्पृश्यांच्या उध्दारासाठी खस्ता खाल्या असें दिसून येतें. तसेंच प्रोफेसर माटे यांनी एम.ए.च्या वेळी मला शिकविलेलें आहे हें सांगण्यांत मला मोठें भूषण वाटतें. परंतु तरीही महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्या विषयी प्रोफेसर माटे यांनी मांडलेले एकांगी विचार कोणालाही मान्य होण्यासारखे नाहीत, हेंही येथें सांगावेसें वाटतें. असो.

आज स्वातंत्र्यानंतर हिंदुधर्मातील सर्व जातींनी एकदिलाने वागून समता स्थापन करण्याची केवढी आवश्यकता आहे हें सांगायला नकोच. याच

---

(१)' महात्मा फुलें ' .. आचार्य प्रल्हाद केशव अत्रे. प्रकाशक ग.पां.परचुरे, मुंबई ४ प्रस्तावना.

विषयावर महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार सांगायला लागलो तर चार पाचशे पृष्ठें होतील, एवढे विचार माझ्या मनात आहेत. परंतु त्याची आवश्यकता नाही. सांगायचा मुद्दा एवढाच की जो पर्यंत आपण आपल्या धर्मात समता स्थापन करणार नाही तो पर्यंत आपले हेवे दावे बंद होणार नाहीत, आपली कूपमंडुक वृत्ति जाणार नाही, आपल्या जातीच्याच लोकांच्या भलाईसाठी दुसऱ्यांचे पाय मागे ओढण्याची वृत्ति आपण सोडून देणार नाही, सर्वांच्या भलाईत आपली भलाई आहे हा विचार आपल्या मनात जेवढ्या प्रमाणाने यायला हवा तेवढा येणार नाही, प्रत्येक प्रश्नाकडे सामाजिक आणि राष्ट्रीय दृष्टिकोनांतून आपण पाहू शकणार नाही आणि म्हणूनच आपल्या समाजाची व्हावी तेवढी प्रगति होणार नाही. हे कोठवर सांगावे ? या साठीं, निष्ठा, तळमळ, तपश्चर्या, त्याग या भावनेची फार फार आवश्यकता आहे. बाकीच्या धर्मातील लोकांची त्यांच्या लोकांविषयी वागणूक आणि आपल्या धर्मातील लोकांची एकमेकां विषयीची वागणूक पाहिली की मन विषण्ण होऊन जाते. परंतु आता यातूनच मार्ग काढला पाहिजे.

आज स्वातंत्र्यानंतर हिंदुधर्मातील सर्व जातींनी एक दिलाने वागून समता स्थापन करण्याची केवढी आवश्यकता आहे हें सांगायला नकोच. वास्तव समाजातल्या सर्व थरांतील सर्व विचारवंतांनी आपापल्या मगदुरी प्रमाणें या पवित्र कार्यासाठीं वाहून घ्यावे. कारण आपल्या हिंदुधर्मात समता स्थापन होऊन सर्वांना आपापल्या गुणांचा उत्कर्ष करण्याची संधी प्राप्त झाली पाहिजे. त्याशिवाय आपल्यापैकीं कोणालाही खरे सुख लाभणार नाही हें आपण सर्वांनी पक्के ध्यानांत ठेवावे.

## १५ जीवन प्रवाह

श्री माधवराव खंडेराव बागल यांचें हें आत्मचरित्र आहे. ते पृष्ठ २१७ वर लिहितात " लिखाणांना काही पत्रांत स्थान मिळतें काहींत मिळत नाही. त्यांच्या ध्येय धोरणाला जमेल असेच लेख ते स्वीकारतात. स्वतःचे किंवा पक्षाचें पत्र नसल्यामुळें विचारांची बरीच कुचंबणा होते. पण लिखाणाचा मुख्य उद्देश प्रचार हाच असल्यामुळे मानापमान बाजूस ठेवावा लागतो. एकाने स्वीकारला नाही तर दुसऱ्याकडे असा कोडगेपणा करावा लागतो. येथे ना तेथे कोठेतरी लेखाला जागा मिळते. प्रचाराच्या समाधानापलीकडे यात काही फायदा मिळत नाही. मिळण्याची अपेक्षाही करीत नाही. पुस्तक रूपाने प्रसिद्ध होण्याजोगें बरेंच लिखाण शिल्लक आहे. पण पुस्तकरूपाने तें प्रकाशित करण्याची माझ्यांत शक्ति नाही. लिखाण जपून मात्र ठेवलें आहे. गोष्टी, कला व समाजवाद यावरचें लिखाण बरेंच आहे. माझ्या पश्चात कोणीतरी छापील या आशेनेच तें जपून ठेवलें आहे. "

म्हणजे श्री. माधवराव बागल यांच्या सारख्या थोर कार्यकर्त्यालाही सांपत्तिक स्थितिमुळे आपलें लिखाण पुस्तक रूपाने छापता येत नाही तर सामान्य माणसाच्या लिखाणाची काय दशा होते हें स्पष्टच आहे. जपानमध्यें कोणीही काही लिहिलें की तें प्रकाशित व्हायला अडचण पडत नाही. कारण लेखन हें ही एक मत व्यक्त करण्याचें फार मोठें साधन आहे. परंतु पैशाच्या अभावी श्री. बागलांचें लिखाण पडून असावें हें वाचून वाईट वाटलें. आज समाजांत

असे कित्येक धनवान आहेत की त्यांचा पैसा पडून आहे आणि इकडे बागलांना पुस्तक प्रकाशित करता येत नाही. यास्तव समाजांत आर्थिक समता स्थापन होऊन प्रत्येकाच्या विचाराला वाव मिळण्याची केवढी आवश्यकता आहे तें पाहा. आता या साठी काय करावें हे येथे सांगता येण्यासारखें नाही. परंतु जोंवर अशी स्थिती प्राप्त होणार नाही तोंवर कित्येक लोकांची विचार व्यक्त होण्याच्या अभावी मुस्कट दाबी होत राहणार एवढें निश्चित.

या आत्मचरित्रांतून प्रत्ययास येणारा दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा की इतिहासाचार्य वासुदेव शास्त्री खरे यांनी एके ठिकाणी आपल्या देशाच्या भवितव्या-संबंधी व्यक्त केलेलें मत. आज आपणाला स्वराज्य मिळून तेरा वर्षे लोटलींत तरी जवळ जवळ पन्नास वर्षांपूर्वी त्यांनी सांगितलेले विचार आजही किती मननीय वाटतात तें पाहा.

(१) " मराठे व इंग्रज या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत वासुदेव शास्त्री खरे म्हणतात ' आमचा पुणे सातारा इंग्रजांनी कां घेतला आणि त्यांचा मद्रास कलकत्ता आम्ही कां घेऊं शकलों नाही याचा संक्षेपाने येथपर्यंत विचार केला. देशाभिमान शून्यता, समूहरूपाने कार्य करण्याची नालायकी, आळस, हेळसांड, दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिण्याची सवय, इत्यादि दुर्गुण आमच्या समाजाच्या अंगी जे खिळले आहेत तेच आमच्या स्वराज्य नाशाला कारणीभूत झाले आहेत. असल्या दुर्गुणांनी खिळखिळे झालेले पौरस्त्य राष्ट्र सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्राशी विरोध प्राप्त झाला असता टिकाव धरू शकत नाही. हिंदुस्थान जर इंग्रजांनी घेतलें नसतें तर तें फ्रेंचांनी घेतलेंच असतें. प्रवाहांत पडलेली भांडीं एकमेकावर आदळलीं असता त्यांतलें कोणतें फुटावयाचें मातीचें की लोखंडाचें हें ठरलेंच आहे.

(१) जीवन प्रवाह - श्री. मा. ल. बागल पृष्ठ २४९ - श्री. वि. स. खांडेकर यांची प्रस्तावना.

हल्लीचा काळ असा आला आहे की आम्ही पाश्चात्यांची बरोबरी तरी करावी, नाहीतर त्यांचे मजूर तरी होऊन राहावें. राजकारण, उद्योगधंदे, कलाकौशल्य, भौतिक शास्त्रांचा उपयोग, प्रत्येक गोष्टींत हीच स्थिती आहे. जर आम्हास पाश्चात्यांची बरोबरी करण्याची हिंमत असेल तर हे दुर्गुण आम्ही टाकले पाहिजेत. पूर्वी स्वराज्य होतें तें याच दुर्गुणामुळे गेले. हें समजून जर आम्ही सावध झालों नाही तर नवीन स्वराज्य मिळून सुद्धा व्यर्थच आहे. हाच इतिहास डिंडिमाचा घोष प्रत्येकाच्या कानीं घुमत राहिला पाहिजे. " हें त्यांचें म्हणणें खरें नाही का ?

१६      बहुरूपी

हें आत्मचरित्र चिंतामण गणेश कोल्हटकर यांनी लिहिलें. या ग्रंथाला राष्ट्रपतिपदक मिळाल्यामुळें याचा बराच बोलबाला झाला. बहुरूपीकारांनी अनेक नाटककारांचा परिचय करून दिला आहे. त्या सर्वांत राम गणेश गडकरी यांच्या विषयी लिहिलेली माहिती मोठी चटकदार आणि हृद्य आहे. बाकीच्यांच्या विषयी लिहितांना कोठे कोठे लेखकाने तारतम्य दाखविलें नाही असें नाइलाजाने म्हणावें लागतें.

पुढील उतारा पहा ..

(१) " तात्यासाहेबांनी आपल्या आयुष्यांत करावयाचें तें केलें. मिळवावयाचें तें मिळविलें. आयुष्याची सुरुवात ' न.चिं. ' म्हणून केली. पुढे नरसोपंत झाले. तेच पुढे तात्यासाहेब म्हणून ओळखले जाऊ लागले. शेवटी अपेक्षे-

(१) बहुरूपी - चिंतामण गणेश कोल्हटकर .. पृष्ठ १२१

प्रमाणेंच सर्वांचे ' तात्या ' झाले. साहित्यक्षेत्रात ' सम्राट ' पदावर चढले. त्या सम्राटपदीं चढताना त्यांच्या दिग्विजयी घोड्याच्या टापाखालीकाही लोक घायाळ झाले असले तरी तिकडे लक्ष न देता आमच्या सारख्यांनी त्यांचा गुणगौरव व जयजयकार करणें हेंच योग्य व स्तुत्य. "

आता खरोखर या वर्णनाची काही आवश्यकता होती का ? म्हणूनच आत्म चरित्रकार हा सहृदयी असला पाहिजे हें आपण मागें पाहिलेंच आहे.

' बहुरूपी ' या ग्रंथात अनेक लहान मोठ्या नाटककारांचें आणि त्यांच्या नाटकांचें वर्णन आलेलें आहे. परंतु त्यात आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांचा किंवा त्यांच्या नाटकांचा उल्लेख नाही. म्हणून मी एक पत्र आचार्य अत्रे यांना पाठविलें, आणि त्या पत्रात असें विचारलें कीं ' बहुरूपी ' ग्रंथात तुमचा उल्लेख कां नाही तें कळवाल काय ? माझ्या पत्राला उत्तर म्हणून ता. १४.२.१९६० रोजीं आचार्य अत्रे यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात उत्तर पाठविलें. त्यात ते लिहितात ...

" आपण विचारलेल्या प्रश्नाला मी आपल्या माहितीसाठीं उत्तर पाठवितों. प्रसिद्धीसाठी पाठवितों. चिंतामणरावांची आणि माझी मैत्री १९२० सालापासून होती. पण त्यांचा स्वभाव अत्यंत अहंमन्य होता. गडकऱ्यांचें सर्व काय केवळ आपल्याला कळतें अशी त्यांना घमेंड होती. म्हणून गडकऱ्यांचा मी ' शिष्य ' म्हणून प्रसिद्धी पावलो, त्यांच्यावर वर्षानुवर्षें व्याख्यानें दिलीं, ह्याबद्दल त्यांना मनांतून वैषम्य वाटत होतें. नाटक लिहिण्याबद्दल मला त्यांनी कधी तरी रस्त्यावर उभ्या उभ्या विनंती केली असेल. पण त्यांच्या नाटक मंडळीचें एखादें नाटक पाहण्यासाठीं सुद्धा आमंत्रण दिलें नाही. पण मी त्याची परवा केली नाही. १९४१ साली माझ्या ' वसंतसेने ' तील ' शकारा ' च्या

भूमिकेसाठी मी त्यांना चौदा महिने रु. ५०० ( द. म. ) देत होतों. चित्रपटाच्या सृष्टींत मला मिळालेल्या यशाबद्दल त्यांच्या मनांत डंख होता. तरीपण १९४४.४५ पर्यंत त्याबाबत वादाला तोंड फुटलें नव्हतें. पुढे त्यांनी एका व्याख्यानांत माझ्या नाटकावर प्रतिकूल हल्ला चढविला. अर्थात् त्या त्यांच्या टीकेंत व्देष आणि मत्सर ह्या भावनेपेक्षा दुसरें कांहीच नव्हतें. तेव्हां त्या टीकेला उत्तर देतांना मीही त्यांची गय न करता त्यांची खरमरीत हजेरी घेतली. तेव्हां पासून तो त्यांच्या मृत्यूपर्यंत त्यांचें आमचें हें भांडण चालूच होतें. माझ्यावर टीका करण्याची कोणतीही संधी ते वाया घालवीत नसत. पुढे पुढे आम्ही एकमेकांशी बोलत ही नसूं. चिंतामणरावांच्या विरुध्द तों पर्यंत मला बोलावयाचें कधी कारण नव्हतें. उलट त्यांना माझ्या कंपनींत भारी पगाराची नोकरी देऊन त्यांच्यावर उपकारच केले. पण चिंतामणराव हे स्वभावतःच दुष्ट आणि वक्र मनोवृत्तीचे होते. एवढें सांगितल्यानंतर तुमच्या प्रश्नाचें उत्तर मिळेल. ॥

यावरुन काय तथ्य काढावयाचें तें वाचकांनीच ठरवावें. कारण चिंतामणराव आज हयात नसल्याने याबाबतचें त्यांचें म्हणणें कळायला मार्ग नाही.

** ** **